


जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठीत सवय

■ अमरावती, मंगळवार १९ मे २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठे १०

# NEET पेपरफुटी:RCC क्लासेसच्या शिवराज मोटेगावकरला 9 दिवसांची CBI कोठडी

**■ 10 दिवस आधीच मिळवला होता पेपर ■ टोळीतला सक्रिय सदस्य असल्याचे समोर**




**पुणे/प्रतिनिधी-** पेपर फुटी प्रकरणी मोटेगावकर क्लासचे संचालक शिवराज मोटेगावकर यांना सीबीआयने ताब्यात घेतले होते. रात्रभर तब्बल ११ तास सीबीआय कार्यालयात मोटेगावकरांची चौकशी करण्यात आली. त्यानंतर अखेर मोटेगावकर यांना सीबीआयडून अटक करण्यात आली आहे. राज्यभरात मोटेगावकर यांच्या आरसीसी कोचिंग क्लासेसच्या शाखा आहेत. डॉक्टर-इंजिनिअर बनवणारा क्लासमालक म्हणून मोटेगावकरची ओळख आहे. त्याला ९ दिवसांची सीबीआई कोठडी मिळाली आहे. १० दिवस आधीच त्यानी नीटचा पेपर मिळविला असून तो यात सक्रीय सदस्य असल्याचे समोर आले आहे.

क्लालेसच्या विद्यार्थ्यांचीही आता सीबीआयकडून चौकशी सुरु करण्यात येत आहे. गेल्या काही तासांपासून काही पालक त्यांच्या पाल्यांसोबत सीबीआय कार्यालयात आले आहेत. विद्येच्या माहेरघरातच या प्रकरणात प्रसिद्ध क्लासच्या प्राध्यापकांची चौकशी होत असल्याने अनेक सवाल उपस्थित होउ लागले आहेत. मोटेगावकर क्लासेस मधून असंख्य विद्यार्थ्यांनी शिक्षण घेतले आहे. अनेक विद्यार्थी या क्लासमुळे चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले आहेत. मात्र आता या पेपर फुटी प्रकरणात खुद्द संचालकांनाच इतके केल्याने शिक्षण वर्तुळात अनेक चर्चांना उधाण आले आहे. मोटेगावकर सरांच्या क्लासच्या विद्यार्थ्यांना जेईई आणि नीट परीक्षेत उत्तम गुण मिळत असल्याने त्यांचा हा क्लास राज्यभरात लोकप्रिय झाला होता. अनेक पालक आपल्या मुलांना प्रचंड शुल्क भरु न या क्लासला घालत होते. आता याच मोटेगावकर सरांना नीट पेपरफुटी प्रकरणात अटक झाल्याने एकच खळबळ उडाली आहे. त्यांच्या या क्लासकडे डॉक्टर आणि इंजिनिअर घडवणारी फॅक्टरी म्हणून पाहिले जायचे. राज्यभरात आरसीसीच्या शाखा पुणे, नाशिक, औरंगाबाद, नांदेड, सोलापूर, कोल्हापूर आणि अकोला यांसह अनेक शहरांत विस्तारल्या आहेत. नीट पेपरफुटीत मोटेगावकरांचे पी.व्ही.कुलकर्णीसोबत मोटेगावकरचे घनिष्ठ संबंध होते. त्यांनी मोटेगावकरने परीक्षेपूर्वीच प्रश्न मिळवून उत्तरांसह मुलांपर्यंत पोहोचवले आहेत. त्यांच्या मोबाईलमध्ये पेपरफुटीचे अनेक पुरावे समोर आले आहेत. सीबीआयकडून मोबाईलमधील डेटा, चॅट्स, काल रेकॉर्ड्सचा शोध सुरु आहे.

## मोटेगावकरने स्वतःच्या मुलासाठी NEET पेपर फोडला?

**नवी दिल्ली :** देशभरात खळबळ उडवून देणा-या 'नीट' पेपरफुटी प्रकरणात अत्यंत धक्कादायक माहिती समोर आली आहे. लातूरमधील नामांकित 'आरसीसी' कोचिंग इन्स्टिट्यूटचा संचालक शिवराज मोटेगावकर याला दिल्लीच्या विशेष न्यायालयाने ९ दिवसांची सीबीआय कोठडी सुनावली आहे. तत्पूर्वी सीबीआयने ताब्यात घेतल्यानंतर गेल्या दोन दिवसांच्या कसून चौकशीत मोटेगावकरच्या विरोधात अत्यंत भक्कम आणि महत्त्वाचे पुरावे हाती लागले आहेत. अधोरेखित करण्यासारखी बाब म्हणजे शिवराज मोटेगावकर याने स्वतःच्या मुलासाठी NEET पेपर फोडल्याचा संशय सीबीआयला आहे. सीबीआयने लातूर येथे केलेल्या तपासादरम्यान शिवराज मोटेगावकर याच्या घरावर छापा टाकला होता. या झाडाझडतीत सीबीआयला त्याच्या घरातून 'केमिस्ट्री' (रसायनशास्त्र) विषयाची नीट परीक्षेची मूळ प्रश्नपत्रिका हस्तगत करण्यात यश आले. दोन दिवसांपूर्वी लातुरात प्रा. कुलकर्णी याला सीबीआयने अटक केली. एनटीएमध्ये (परीक्षा प्रक्रिया) कुलकर्णी याच्याकडे महत्त्वाची जबाबदारी होती. त्यानेच ही प्रश्नपत्रिका मोटेगावकर याला दिल्याचा संशय आहे. दुसरीकडे मोटेगावकर याच्या घरातच थेट प्रश्नपत्रिका सापडल्याने त्याचा या पेपरफुटीतील थेट सहभाग आता उघड झाला असून त्याच्या अडचणीत मोठी (पान २ वर)

## 'आमच्या बुकलेटमधील 180 पैकी 180 प्रश्न नीट परीक्षेत...'

*मोटेगावकरच्या RCC क्लासमधले स्टिंग ऑपरेशन VIDEO व्हायरल*

**नाशिक:** नीट पेपर फुटी प्रकरणी आरसीसी क्लासचे सर्वेसर्वा शिवराज मोटेगावकरला अटक झाल्यामुळे राज्यभरात खळबळ उडाली. याचं एका स्टिंग व्हिडीओ व्हायरल झाला आहे. यामध्ये नीटच्या परिक्षेत कोणते प्रश्न विचारले जात, याबद्दल आरसीसी क्लासचा कर्मचारी ठामपणे सांगतोय. या व्हिडीओची पुष्टी न्यूज १८ मराठीने केली नाही, पण हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. नीट पेपरफुटी प्रकरणात आरसीसी क्लासचे संचालक शिवराज मोठेगावकरला अटक झाल्यानंतर आता नाशिकमधून आणखी एक खळबळजनक माहिती समोर आली आहे .काही विद्यार्थी आरसीसी क्लासच्या शाखेत प्रवेशासाठी गेले असता, तेथील मॅनेजमेंटने त्यांना धक्कादायक आश्वासन दिल्याचा दावा समोर आला आहे. आमच्या बुकलेटमधील (पान २ वर)

## कुलकर्णी जीवलग दोस्त, दोघांचे मिळून कांड

**नवी दिल्ली :** वैद्यकीय प्रवेशासाठी अनिवार्य असलेल्या नीट परीक्षेच्या पेपरफुटी प्रकरणाची महाराष्ट्रातील मुळे खणून काढण्यात सीबीआयला यश आले आहे. लातूरमधील नामांकित क्लास चालक





शिवराज मोटेगावकर याला सोमवारी केंद्रीय अन्वेषण विभाग अर्थात सीबीआयने अटक केली. नीट पेपरफुटी प्रकरणात मोटेगावकर याचा सक्रीय सहभाग असल्याचे पुरावे सीबीआयला मिळाले आहेत. मोटेगावकर याच्या घरी सीबीआयने धाड टाकून महत्त्वाचे लॅपटाप, मोबाईल आणि महत्त्वाची कागदपत्रे जप्त केली आहेत.आरसीसी क्लासच्या एकूण नउ शाखा असून, मुख्य शाखा लातूरमध्ये आहे. शिवराज मोटेगावकर हा एनटीएशी (परीक्षा प्रक्रिया) संबंधित असलेले रसायनशास्त्राचे (केमिस्ट्री) शिक्षक पी. व्ही. कुलकर्णी (पान २ वर)

## मनीषा मांढरेला 14 दिवसांची 'सीबीआय' कोठडी



**पुणे/प्रतिनिधी-** नीट पेपरफुटी प्रकरणात पुण्याच्या मॉडर्न महाविद्यालयातील जीवशास्त्राच्या अध्यापक मनीषा गुरु नाथ मांढरे हिला केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाने (सीबीआय) अटक केली होती. अधिक तपासासाठी सीबीआय विशेष न्यायालयाने मांढरे हिला चौदा दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.परीक्षा प्रक्रियेशी संबंधित असल्याने मनीषा मांढरे हिचा वनस्पतिशास्त्र, प्राणिशास्त्र या विषयांच्या प्रश्नपत्रिकांशी संबंध होता. नीट पेपर फुटीचा प्रकार समोर येताच पुण्यातील बिबवेवाडी परिसरातून ब्युटीपार्लरचालक महिला मनीषा वाघमारे हिला अटक केली गेली. वाघमारे हिने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी मनीषा मांढरे हिला घरी बोलवले होते. तेथे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करू न प्रश्न व अचूक उत्तरांची माहिती (पान २ वर)

## स्थानिक स्वराज्य संस्थेच्या 16 जागांची निवडणूक जाहीर

**■ विधानपरिषदेसाठी 18 जूनला मतदान ■ 22 जूनला निकाल**

**मुंबई/प्रतिनिधी-** कोरोना आणि ओबीसी आरक्षणाच्या पेचामुळे लांबणीवर पडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका व त्यामुळे रखडलेल्या विधान परिषदेच्या १६ स्थानिक स्वराज्य प्राधिकारी मतदारसंघाच्या निवडणुकीला अखेर मुहूर्त लागला आहे. निवडणूक आयोगाने या जागांच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला. या निवडणुकीसाठी १८ जून रोजी मतदान होणार असून २२ जून रोजी निवडणुकीची मतमोजणी होउन निकाल जाहीर केले जातील. या निवडणुकीसोबत



महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या नागपूरच्या जागेसाठी पोटनिवडणूक होणार आहे.निवडणूक आयोगाने सोमवारी विधान परिषदेच्या १६ जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला. त्याचवेळी नागपूर स्थानिक स्वराज्य प्राधिकारी मतदारसंघासाठी पोटनिवडणूक घेण्याचे आयोगाने घोषित केले आहे. त्यामुळे नागपूर पोटनिवडणुकीसह एकूण १७ जागांसाठी एकाचवेळी मतदान होईल. निवडणूक होउ घातलेल्या मतदारसंघातील जागा १ जानेवारी २०२२ ते २९ ऑगस्ट २०२५ या दरम्यान रिक्त झाल्या होत्या. कोरोनाचे संकट, स्थानिक स्वराज्य संस्थांमधील इतर मागासवर्गाचे आरक्षण यामुळे प्राधिकारी मतदारसंघाची मुदत संपूनही त्यांच्या निवडणुका झालेल्या नव्हत्या. आता राज्यातील बहुतांश स्थानिक निवडणुका पार पडल्या आहेत.निवडणूक होउ घातलेल्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघात ७५ टक्के किंवा त्यापेक्षा जास्त मतदार आहेत. यासंदर्भात राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या निवडणुकांबाबतचा प्रस्ताव भारत निवडणूक आयोगाला सादर केला होता. या प्रस्तावाच्या आधारे निवडणूक आयोगाने विधान परिषदेच्या निवडणुकीचा कार्यक्रम आज घोषित केला. या निवडणुकीसाठी महापालिका, नगरपालिका, नगर पंचायत, कटक मंडळे आणि जिल्हा परिषदेचे सदस्य मतदान करणार आहेत.

**नागपूरची पोटनिवडणूक-**महसूल मंत्री आणि भाजपचे नेते चंद्रशेखर बावनकुळे हे २०२२ मध्ये नागपूर स्थानिक प्राधिकारी मतदारसंघातून निवडून गेले होते. मात्र, २०२४ मध्ये विधानसभेवर निवडून आल्यानंतर त्यांनी विधान परिषदेचा राजीनामा दिला. या जागेची पोटनिवडणूक होत आहे. नागपूरच्या जागेची मुदत १ जानेवारी २०२८ रोजी संपत आहे. त्यामुळे नागपूर पोटनिवडणुकीत निवडून येणा-या उमेदवाराला विधान परिषदेचा जेमतेम दीड वर्षाचा कालावधी मिळणार आहे.

**या मतदारसंघांसाठी होणार निवडणूक-** सोलापूर, अहिल्यानगर, ठाणे, जळगाव, सांगली-सातारा, नांदेड, यवतमाळ, पुणे, भंडारा-गोंदिया, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग, नाशिक, वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली, अमरावती, धाराशिव-लातूर-बीड, परभणी-हिंगोली आणि छत्रपती संभाजीनगर-जालना.

## सरकार काय झोपा काढते का?

**दोषींना फाशीची मागणी**

***धाराशिव*** : 'अशा पद्धतीने जर वारंवार पेपर फुटणार असतील, तर गरिबांच्या मुलांनी परीक्षा कशासाठी द्यायच्या? सरकार काय झोपा काढतंय



का?' अशा अत्यंत तिखट आणि आक्रमक शब्दांत प्रहार जनशक्ती पक्षाचे प्रमुख आणि आमदार बच्चू कडू यांनी आपला संताप व्यक्त केला आहे. नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणावरून त्यांनी केंद्र आणि राज्य सरकारवर जोरदार ताशेरे ओढले असून, या प्रकरणातील दोषींना थेट फाशीची शिक्षा देण्याची मागणी केली आहे. रविवारी आमदार बच्चू कडू हे कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी तुळजापूर येथे आले होते. देवीचे दर्शन घेतल्यानंतर त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी देशात गाजत असलेल्या 'नीट' पेपरफुटी प्रकरणावर विचारले असता, बच्चू कडू यांचा पारा चांगलाच चढला. गोरगरिबांची पोरं दिवस-रात्र एक करून, रक्ताचं पाणी करून अभ्यास करतात. गरीब मायबाप आपल्या पोटाला चिमटा काढून मुलांच्या शिक्षणासाठी पैसे उभे करतात. मात्र, ऐन परीक्षेच्या वेळी असे पेपर फुटतात. पेपर असा कसा फुटतो? यंत्रणा काय करत आहेत? जर परीक्षा पारदर्शक पद्धतीने घेता येत नसतील, तर गरिबांच्या लेकांनी परीक्षा द्यायच्याच कशासाठी?' असा उद्विग्न सवाल त्यांनी उपस्थित केला.

**दोषींना थेट फाशी द्या-** 'अशा पद्धतीने पेपर फुटत असेल आणि आम्ही लोकप्रतिनिधी म्हणून किंवा सरकार म्हणून काहीच करणार नसू, तर आमच्या असण्याला काय अर्थ आहे? त्यामुळे सरकारने या प्रकरणातील मुख्य आरोपींना थेट फाशीची शिक्षा दिली पाहिजे. सरकारने जर यांना फाशी दिली नाही, तर आम्ही त्यांना मारू,' असा थेट आणि खळबळजनक इशाराही त्यांनी दिला.

## 'तुम्ही शिकलात तर नोकरी मागाल'

**स्वामी अनिरूद्धाचार्यांचा घणाघात**

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** देशभरातील लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य टांगणीला लावणा-या नीट परीक्षा पेपर लीक प्रकरणावरून देशभरात संतापाचे वातावरण आहे. विद्यार्थी आणि



विरोधक रस्त्यावर उतरून आंदोलन करत असतानाच, आता या प्रकरणात अनेक महत्त्वाच्या लोकांकडूनही प्रतिक्रिया येत आहेत. प्रसिद्ध कथावाचक स्वामी अनिरुद्धाचार्य महाराज यांनी एका जाहीर कथेदरम्यान या विषयावर थेट भाष्य करत थेट सरकारच्या धोरणांवर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत.वृंदावन येथे आयोजित एका कथेदरम्यान, एका भाविकाने अनिरुद्धाचार्य यांना विद्यार्थ्यांच्या व्यथा ऐकवल्या. 'स्वामीजी, नीट परीक्षेचा पेपर लीक झाल्यामुळे देशभरातील लाखो तरुण कमालीचे अस्वस्थ आहेत. काही विद्यार्थ्यांनी तर नैराश्यातून (पान २ वर)

## ट्रक-कंटेनरच्या टक्करमध्ये 13 ठार

**■ पालघर जिल्ह्यात साखरपुड्याला जाणा-या व-हाड्यांचा मृत्यू ■**

मुंबई/प्रतिनिधी- पालघरमधील मुंबई अहमदाबाद महामार्गावर एका भीषण अपघात घडला आहे. साखरपुड्याला जाणा-या व-हाडाच्या ट्रकवर एक भरधाव कंटेनर येउन आदळला. या अपघातात आतापर्यंत १२ जणांचा मृत्यू झाला आहे. तर २५ पेक्षा जास्त लोक जखमी आहे. मृतांचा आकडा वाढण्याची भीती वर्तवली जात आहे. या अपघातात एक



दुचाकीस्वारही सापडला. मिळालेल्या माहितीनुसार, मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर धाणीवरी इथं दुपारच्या सुमारास हा अपघात घडला. डहाणूमधील बापू गाव आहे इथं राहणारा बालाराम दांडेकर याचा साखरपुडा होता. धाणीवर येथील एक मुलीशी होता. त्यामुळे सगळे दांडेकर कुटुंबीय, नातेवाईक आणि गावातील लोक हे आयशर ट्रकने जात होते. मुंबईकडे येणा-या या भरधाव कंटेनरवरील कंटेनर निघाला आणि तो विरु द्ध दिशेनं येणा-या व-हाडाच्या ट्रकवर आदळला. हा अपघात इतका भीषण होता की, ट्रकचा मागील भाग चक्काचूर झाला. याच आयशर ट्रकमध्ये ६० ते ७० व-हाडी प्रवास करत होते. कंटेनर आदळल्यानंतर आयशर ट्रक रस्त्याच्या बाजूला फेकला गेला. य अपघातात एक दुचाकीस्वारही सापडला. मृतांची संख्या जास्त असल्यामुळे ओळख अद्याप पटू शकली नाही. या अपघातात आतापर्यंत बारा जणांचा मृत्यू झाला असून २५ पेक्षा अधिक जखमी आहेत. घटनास्थळी सगळीकडे भयानक असं दृश्य होतं. रस्त्याच्या बाजूला व-हाडातील नातेवाईकांचा एकीकडे आक्रोश होता तर दुसरीकडे, जखमी लोकांना रुग्णवाहिकेत दाखल केलं जात होतं. घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी पोलीस आणि रु ग्णवाहिका दाखल झाल्या आहे. या अपघातातील जखमींवर सध्या चाचा येथील उपजिल्हा रु ग्णालय आणि रु ंदलवाडी येथील वेदांत रु ग्णालयात उपचार सुरू करण्यात आले आहेत.

**ट्रक आणि मॅजिकची जोरदार धडक**

## भीषण अपघातात 10 जणांचा मृत्यू

**लखीमपुर खिरी :** जिल्ह्यातील नॅशनल हायवे ७३० वर एक अत्यंत भीषण अपघात झाला आहे. ईसानगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बरेहटाजवळ प्रवाशांनी भरलेली टाटा मॅजिक आणि ट्रक यांच्यात जोरदार धडक झाली. या अपघातात टाटा मॅजिकमधील १० प्रवाशांचा मृत्यू झाला आहे, तर चार प्रवाशांची प्रकृती चिंताजनक आहे. जखमींना उपचारासाठी ईसानगर येथील सामूहिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले आहे. ईसानगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत राष्ट्रीय महामार्गावर सोमवार सकाळी ७ वाजता बरेहटाजवळ १४ प्रवाशांना घेउन एक टाटा मॅजिक लखीमपुरहून बहराइचच्या दिशेने जात होती. त्याच वेळी, बहराइचच्या बाजूने येणा-या एका भरधाव ट्रकशी तिची जोरदार धडक झाली. या भीषण अपघातात



टाटा मॅजिकमधील ८ प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला, तर सामूहिक आरोग्य केंद्रात उपचारादरम्यान आणखी दोन प्रवाशांनी आपला जीव गमावला.घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत शवविच्छेदन करण्यासाठी मृतदेह जिल्हा मुख्यालयात पाठवले आहेत. तसेच जखमींना उपचारासाठी ईसानगर सामूहिक आरोग्य केंद्रात दाखल केले आहे. धौरहरा क्षेत्राचे सीओ शमशेर सिंग यांनी सांगितलं की, आज सकाळी ७ वाजण्याच्या सुमारास ईसानगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बरेहटा गावाजवळ लखीमपुर-बहराइच हायवेवर हा रस्ता अपघात झाला. यामध्ये ट्रक आणि मॅजिकची समोरासमोर धडक झाली. या अपघातात एकूण १० लोकांचा मृत्यू झाला असून यामध्ये ७ पुरु ष आणि ३ महिलांचा समावेश आहे. तसेच या अपघातात ४ जण जखमी झाले असून त्यांच्यावर रु ग्णालयात उपचार सुरू आहेत. मृतांच्या नातेवाईकांना अपघाताची माहिती देण्यात आली असून या प्रकरणात पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे.

# परळी वैजनाथ, भीमाशंकर, देहू सहीत सहा तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी 993 कोटीचा निधी मंजूर!

**तीर्थक्षेत्र विकासकामे कालमर्यादेत पूर्ण करण्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांचे आदेश**

**मुंबई/प्रतिनिधी-** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी झालेल्या तीर्थक्षेत्र विकास आराखडा शिखर





समितीच्या बैठकीत सहा तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी ९९३ कोटी ७२ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. यामुळे संबंधित तीर्थक्षेत्रांचा कायापालट होणार असून भाविक, पर्यटकांना चांगल्या सुविधा मिळणार आहेत. तीर्थक्षेत्र विकासकामे दर्जेदार आणि कालमर्यादेत पूर्ण करण्याचे तसेच तीर्थक्षेत्र विकास आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी बैठकीत दिले.

आजच्या बैठकीत पुणे जिल्ह्यातील श्री क्षेत्र भीमाशंकर आदर्श गाव विकासासाठी १७२ कोटी रु पयांचा निधी मंजूर करण्यात आला. या विकास आराखड्याअंतर्गत अत्याधुनिक बस स्थानक आणि पार्किंग सुविधा करण्यात यावी. वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी विविध वळण रस्ते आणि रस्ते रु ंदीकरणाची कामे हाती घेण्यात यावीत. सध्या २.७ मीटर रु ंदी असलेले रस्ते ७ मीटरपर्यंत रुंद करावा. भक्त आणि पर्यटकांच्या सुविधांसाठी मंदिर परिसरात पादचारी मार्ग, कव्हर्ड कारिडार, फ लोअरिंग आणि एम्फीथिएटर, २५७ केएलडी क्षमतेचा सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प आदी योजना हाती घेण्याची सूचना फडणवीस यांनी बैठकीत केली.

**संत तुकाराम महाराज जन्मस्थानाच्या संवर्धनासाठी ४१ कोटींची तरतूद-** संत तुकाराम महाराज यांचे देहू येथील जन्मस्थान, वैकुंठगमन मंदिर परिसर तसेच भंडारा डोंगर परिसराच्या संवर्धन आणि विकासासाठी ४१ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. यामध्ये रस्त्यांचे सुशोभीकरण, स्वच्छता व्यवस्था, पिण्याच्या पाण्याच्या सुविधा, पार्किंग व्यवस्था, भाविकांसाठी निवास सुविधा तसेच माहिती केंद्र उभारणे, भंडारा डोंगर परिसरात हरित क्षेत्र संवर्धन, वृक्षारोपण आणि नैसर्गिक सौंदर्य अबाधित ठेवण्यासाठी उपाययोजना करण्यात याव्यात, असे निर्देश फडणवीस यांनी दिले.



**किल्ले अजिंक्यतारासाठी १३४ कोटी**

सातारा जिल्ह्यातील ऐतिहासिक किल्ले अजिंक्यताराचे जतन, संवर्धन आणि परिसर सुशोभीकरणासाठी १३४.८० कोटी रूपयांचा विकास आराखडा आहे. यामध्ये नियोजित असलेल्या पायाभूत सुविधांचा विकास, नियोजित प्रेक्षक गॅलरी, नवे पादचारी मार्ग आणि लँडस्केपिंग,राज सदरेचे पुनरु ज्जीवन, बुरूजांचे संवर्धन, पर्यटन आकर्षणे,अत्याधुनिक लटकता पूल,स्वच्छता आणि विश्रांती गृहांची कामे तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली वेळेत पार पाडावीत, असे फडणवीस यांनी सांगितले.

**संगम माहुली (सातारा) समाधी स्थळासाठी १३३ कोटींची तरतूद**

संगम माहुली समाधीस्थळ संवर्धनासाठी १३३ कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. याअंतर्गत महाराणी ताराबाई, महाराणी येसूबाई आणि छत्रपती शाहू महाराज यांच्या समाधी स्थळांचा जीर्णोद्धार (पान २ वर)



# बहिणाबाई चौधरी यांच्या कवितांचा कांचन सावंत यांनी सादर केला सुरेल नजराणा

## -अवघी डोंबिवली सूरसंगीतांनी न्हाऊन निघाली

**मुंबई/प्रतिनिधीः-**
खानदेश रत्न कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या अनमोल कवितांचा ठेवा कांचन संतोष सावंत हिच्या सुरेल व कसदार आवाजात उलगडत गेला. माझी माय सरसोती या गाण्याने सुरुवात झाली नंतर कशाला काय म्हणू नये हे अध्यात्मिक शिकवण सांगणारी गीत झाले. बिना कपाशीने उले त्यानंतर जीवनाची वाटचाल करण्यासाठी तत्त्वज्ञान सांगणारे वाटच्या वाटसरा आले. तसेच कर्मयोगी याचे जीवन सांगणारे अरे घरोटे घरोटे! आईच्या ममतेने व्याकुळलेले उचलला हारा. जन्ममृत्यूतील संघर्ष जीव देवाने धाडला संगीत उदय चितळे सर मुलतानी निसर्गात रमणाऱ्या बहिणाबाई



यांनी निसर्ग कवियत्रीच होतं. अरे खोप्यामध्ये खोपा पाठोपाठ येतं मन वढाय वढाय पाण्यागत असणाऱ्या मनाला शब्दात पकडणारे आखजीचा आखाजीचा हे अक्षय तृतीयेच्या सणाचं वर्णन करणार गीत येतं. परशुराम बेलदार या भक्तीमय गीत गायनाने समारोप झाला. रसिक प्रेक्षकांनी अतिशय मनःपूर्वक दाद देऊन कार्यक्रमाला रंगत आणली अधिक मासातील या अधिकाधिक आनंद देणाऱ्या कार्यक्रमात पाहुणे अशोक कुलकर्णी स्वामी सिरीयल चे प्रमुख भूमिका, जीवनविद्या मिशनचे कीर्तनकार भारुड मधुकर पांचाळ, जीवनविद्या मिशन चे संगीतकार भजन सम्राट ठीक सेन बानकर, प्रबोधनकार दशरथ शिरसाट, प्रसारक कीर्तनकार आबू परब, हरिश्चंद्र सरदार पत्रकार अनिकेत घमंडे यांच्या समवेत अनेक मान्यवर उपस्थित होते. या नितांत सुंदर कार्यक्रमाचे प्रयोजक होते कुलकर्णी ब्रदर्सचे श्रीरंग कुलकर्णी. कार्यक्रमाला चार चांद लावणारे निवेदन होते श्रीयुत दिनेश आडावदकर यांचे. अप्रतिम साथ संगत करून कुमारी कांचन संतोष सावंत हिच्या गाण्याला रसिक प्रेक्षकांपर्यंत पोहोचवणारे वादक व संगीत संयोजक उदय चितळे तबला मकरंद विष्णुपुरीकर, शिंदे डॉक्टर प्रमोद धोरे. तबलावादक व्यंकटेश कुलकर्णी ध्वनी व्यवस्थापक आनंद गोरे यांनी या सदाबहार कार्यक्रमाला परमोच्च बिंदू गाठला. अवघी डोंबिवली सूरसंगीतांनी न्हाऊन निघाली.

## १ व १० वरिल उर्वरित

### मोटेगावकरने स्वतःच्या मुलासाठी

वाढ झाली आहे.

सीबीआय सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, यावर्षी शिवराज मोटेगावकर याचा स्वतःचा मुलगा देखील बारावीत होता आणि त्याने नीटची परीक्षा दिली होती. त्यामुळे मोटेगावकराने स्वतःच्या मुलाला वैद्यकीय प्रवेशासाठी जास्तीत जास्त गुण मिळावेत, याच उद्धेशाने नीटचा पेपर फोडला असावा, यादृष्टीने सीबीआय आता कसून तपास करत आहे. मुलाच्या भविष्यासाठी आणि त्याला डाक्टर बनवण्यासाठीच मोटेगावकराने पेपरफुटीसारखा एवढा मोठा कायदेशीर धोका पत्करल्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. स्वतःच्या मुलासाठी प्रश्नपत्रिका मिळवल्यानंतर मोटेगावकरने याचा व्यावसायिक फायदा उठवल्याचा संशय सीबीआयला आहे. आपल्याकडे आलेल्या या प्रश्नपत्रिकेच्या आधारे त्याने लातूर आणि परिसरातील इतर गरजू विद्यार्थ्यांच्या पालकांशी संपर्क साधला. मुलांना नीट परीक्षेत हमखास यश मिळवून देतो, असे आमिष दाखवून त्याने अनेक पालकांकडून लाखो रुपये उकळल्याचा संशय सीबीआयला आहे.

### 'आमच्या बुकलेटमधील १८०

१८० पैकी १८० प्रश्न नीट परीक्षेत विचारले जातात. त्याची सिक्युरिटी देखील आम्ही देउ शकतो, असे सांगण्यात आल्याचा आरोप विद्यार्थ्यांनी केला आहे. इतकेच नव्हे, तर भारतभरातील प्रत्येक शासकीय आणि खासगी मेडिकल कालेजमध्ये तुम्हाला आमच्या क्लासचा विद्यार्थी दिसेल,असेही मॅनेजमेंटकडून सांगण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. नीट पेपरफुटी प्रकरणाचा तपास जसजसा पुढे जात आहे, तसेतसे कोचिंग नेटवर्क, विद्यार्थ्यांना दिली जाणारी गॅरंटी आणि संशयास्पद दावे यामुळे अनेक प्रश्न निर्माण होत आहेत. आता या दाव्यांमागे नेमकं सत्य काय? विद्यार्थ्यांना रिझल्टच्या नावाखाली काही वेगळंच दाखवलं जात होतं का? असा देखील प्रश्न उपस्थित होत आहे.

### कुलकर्णी जीवलग दोस्त,

याच्या जवळचा आहे, ज्याला दोन दिवसांपूर्वी लातुरमधून अटक करण्यात आली आहे. पीव्ही कुलकर्णी याला एनटीएमध्ये सेट करण्यात मोटेगावकर याचा हात असल्याचे सांगितले जाते.

नीट पेपर लीक प्रकरणाच्या सीबीआय तपासात मोठा खुलासा समोर आला आहे. तपास यंत्रणांच्या माहितीनुसार, आरोपी शिवराज मोटेगावकर याला २३ एप्रिल २०२६ रोजीच ?क्क्र-छक्र च्या केमिस्ट्री विषयाचे प्रश्न आणि उत्तरं मिळाली होती. म्हणजेच परीक्षा होण्यापूर्वीच प्रश्नपत्रिका त्याच्यापर्यंत पोहोचली होती. सीबीआयच्या छापेमारीत शिवराज मोटेगावकर याच्या घरात नीटची प्रश्नपत्रिका जशास तशी मिळून आली. रविवारी सीबीआयने शिवराज मोटेगावकर याच्या घरी धाड टाकून जवळपास १२ तास चौकशी केली होती.

तपासादरम्यान शिवराज मोटेगावकरच्या मोबाईल फोनमधून लीक झालेले प्रश्नही एजन्सींना मिळाले आहेत. शिवराजने इतर आरोपींसोबत मिळून अनेकांना लीक प्रश्नपत्रिका आणि उत्तरपत्रिकांच्या क?पी पुरवल्याचा आरोप आहे. शिवराज मोटेगावकर हा डक्क नावाचे कोचिंग इन्स्टिट्यूट चालवत असून, त्याच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर विद्यार्थ्यांपर्यंत प्रश्नपत्रिका पोहोचवण्यात आल्याचा तपास यंत्रणांना संशय आहे. सहआरोपी प्रल्हाद कुलकर्णी याच्यासोबतच्या संबंधांचीही चौकशी सुरू आहे.

### मनीषा मांढरेला १४ दिवसांची

दिल्याचे उघड झाले. त्यानंतर मांढरेला अटक करून तपास अधिकारी उपअधीक्षक पवन कुमार यांनी रविवारी मांढरे हिला दिल्लीतील विशेष सीबीआय न्यायालयात हजर केले.याप्रसंगी सीबीआयकडून अ‍ॅड. व्ही. के. पाठक आणि दर्शन लाल यांनी बाजू मांडली. या प्रकरणात मुख्य सूत्रधार प्रा. पी. व्ही. कुलकर्णी, तसेच ब्युटीपार्लरचालक महिला मनीषा वाघमारे हिला अटक केली आहे. आरोपी मांढरे ही परीक्षाप्रकियेशी (एनटीए) संबंधित आहे. विशेष मार्गदर्शनाच्या नावाखाली तिने विद्यार्थ्यांकडून पैसे घेतले होते. या प्रकरणात आतापर्यंत नउ आरोपींना अटक केली असून, सखोल तपास करायचा आहे. आरोपींची एकत्र चौकशी करायची आहे. तेव्हा तपासासाठी चौदा दिवसांची सीबीआय कोठडी देण्यात यावी, अशी विनंती अड. पाठक आणि अड. लाल यांनी केली. त्यावर विशेष न्यायाधीश रश्मी कुजूर यांनी मांढरेला चौदा दिवस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले.दरम्यान, नीट पेपरफुटी प्रकरणातील मुख्य सूत्रधार प्रा. पी. व्ही. कुलकर्णी याला सीबीआयने पुण्यातून शुक्रवारी अटक केली होती. कुलकर्णी हा रसायनशास्त्राचा अध्यापक असून, परीक्षा प्रक्रियेशी संबंधित होता. पुण्यातील बिबवेवाडी परिसरात ब्यूटी पार्लर चालविणारी मनीषा वाघमारे हिलादेखील यापूर्वी अटक केली होती. सीबीआयने जयपूर, गुरु ग्राम, नाशिक, पुणे, अहिल्यानगर परिसरातून आतापर्यंत नउ आरोपींना अटक केली आहे. त्यातील पाच आरोपींना सात दिवस पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

### 'तुम्ही शिकलात तर नोकरी

टोकाचे पाउल उचलत आत्महत्या केली आहे. लाखो रुपयांचा खर्च आणि अफाट मेहनत करूनही परीक्षा रद्द झाल्यामुळे प्रामाणिक आणि हुशार विद्यार्थ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. सरकार यावर ठोस पावले का उचलत नाही?' असा सवाल भाविकाने केला. या भावनिक प्रश्नाचे उत्तर देताना स्वामी अनिरुद्धाचार्य यांनी प्रशासनाचे वाभाडे काढले. ते म्हणाले की, 'सरकारची इच्छा आहे की तुम्ही वाचू नका, शिकू नका. कारण जर तुम्ही शिकलात-सुधरलात, तर तुम्ही सरकारकडे नोक-या मागायला लावाल. सरकारला तर असे वाटते की तुम्ही न शिकता महिना १००० ते ५००० रुपये त्यांच्याकडून घ्यावे आणि गप्प राहावे.'

पुढे बोलताना त्यांनी सध्याच्या परीक्षा पद्धतीवर जोरदार टीका केली. 'आज परिस्थिती अशी आहे की, तुम्ही अभ्यास करून परीक्षा देता आणि नंतर कळते की पेपर लीक झाला असून परीक्षा रद्द झाली आहे. आता पुढची परीक्षा कधी होईल, हे कोणालाच माहीत नाही. तोपर्यंत तरुणांचे वय निघून गेलेले असते. वयाची मर्यादा संपल्यामुळे नंतर ते परीक्षेस पात्र राहतील की नाही, हा मोठा प्रश्न निर्माण होतो. आपल्या देशातील हा खूप मोठा घोटाळा आहे,' असेही अनिरुद्धाचार्य म्हणाले. नीट परीक्षांमधील गैरव्यवहार, ग्रेस मार्क्सचा वाद आणि पेपर लीकच्या प्रकरणांमुळे देशभरात सुप्रीम कोर्टापर्यंत लढा सुरू आहे. एनटीए या परीक्षा घेणा-या संस्थेवर सातत्याने प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत. परीक्षा रद्द होणे किंवा पुन्हा परीक्षा घेणे, यामुळे विद्यार्थ्यांवर प्रचंड मानसिक दबाव निर्माण झाला आहे.

### परळी वैजनाथ, भीमाशंकर, देहू सहीत

आणि लँडस्केप विकास केला जाणार आहे. याशिवाय, ऐतिहासिक संगमेश्वर मंदिर आणि घाटाचे संवर्धन, नवीन हँगिंग ब्रिज (झुलता पूल), वूइंग गॅलरी आणि सुसज्ज पाथ वेची निर्मिती करून या परिसराला जागतिक दर्जाचे पर्यटन स्थळ बनविण्यात येईल, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

**श्री क्षेत्र घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग विकास आराखडा (वेरुळ)साठी २१० कोटी रूपयांची तरतूद**

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वेरुळ येथील प्रसिद्ध घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग मंदिराच्या विकासासाठी सुधारित आराखडा तयार करण्यात आला आहे. या प्रकल्पाची एकूण किंमत आता २१०.४५ कोटी रुपये प्रस्तावित करण्यात आली असून, यामध्ये ५३.८२ कोटींच्या वाढीव निधीची मागणी समाविष्ट आहे. सध्या या ठिकाणी भाविकांसाठी अत्याधुनिक भक्त निवास, दर्शन बारी (प्रतीक्षागृह), शापिंग काम्प्लेक्स, फंक्शन हाल, घाट आणि १.६ किमीचा बा वळण रस्ता (बायपास रोड) यांसारखी कामे गतीने करावीत, असे निर्देश फडणवीस यांनी दिले.

**श्री क्षेत्र परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग मंदिर परिसरासाठी ३०१.५४ कोटींची तरतूद**

श्री क्षेत्र परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग मंदिर परिसर मूळ आराखड्यातील पुढील नवीन कामांसाठी सुमारे ३०१.५४ कोटी रुपयांचा अतिरिक्त आराखडाही तयार करण्यात आला आहे. तीन टप्प्यात या मंदिराची कामे वेळेत पूर्ण करावीत. पहिल्या टप्प्यात प्रवेशद्वारे, डिजिटल रांग व्यवस्था, प्रतीक्षागृहे, अन्नछत्र, योग-ध्यान केंद्र आणि मंदिर परिसराचे सौंदर्यीकरण तर दुस-या टप्प्यात हरिहर आणि मार्कंडेय तीर्थांचे वैज्ञानिक पुनरुज्जीवन, घाट, सायकल ट्रॅक, दिव्यांगसुलभ सुविधा, फूड कोर्ट आणि सीसीटीव्ही सुरक्षा व्यवस्था उभारणे तर तिस-या टप्प्यात मेरू पर्वतावर भव्य शिवमूर्ती, शिवपुराण आणि वैदिक संग्रहालय, अ‍ॅम्फीथिएटर, लेझर लाईट अँड साउंड शो आणि ध्यानस्थळे विकसित करण्याची सूचना फडणवीस यांनी केली. सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार,वनमंत्री गणेश नाईक, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले,आमदार दिलीप वळसे पाटील, धनंजय मुंडे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल आदी उपस्थित होते.

### वरुड तालुक्यात हृदयद्रावक दुर्घटना

सुट्टीमुळे ती आई-वडिलांकडे सातनूर येथे आली होती.

१७ मे रोजी सकाळपासून ही तिन्ही भावंड अचानक बेपत्ता झाली होती. संध्याकाळपर्यंत मुले घरी न परतल्याने संतुलाल उईके यांनी नातेवाईक आणि ग्रामस्थांच्या मदतीने परिसरात शोधाशोध सुरू केली. मात्र, मुलांचा कोणताही मागमूस लागत नव्हता. अखेर रविवारी दुपारी एकच्या सुमारास सातनूर गावालगतच्या पुसली धरणाजवळ मुलांचे कपडे आढळून आले. त्यानंतर धरणात शोध घेतला असता तिन्ही चिमुकल्यांचे मृतदेह पाण्यात आढळून आले. ही माहिती मिळताच शेघाट पोलीस घटनास्थळी दाखल झाले.

प्राथमिक अंदाजानुसार, ही तिन्ही मुले धरणात अंघोळीसाठी गेली असावीत आणि पाण्याचा अंदाज न आल्याने त्यांचा बुडून मृत्यू झाला असावा, असा संशय व्यक्त केला जात आहे. एकाच कुटुंबातील तीन निष्पाप मुलांचा मृत्यू झाल्याने सातनूर गावासह संपूर्ण वरुड तालुक्यावर शोककळा पसरली आहे. उईके कुटुंबीयांचा आक्रोश पाहून उपस्थितांचे डोळे पाणावले. या प्रकरणाचा पुढील तपास शेघाट पोलीस ठाण्याचे ठाणेदार दीपक महाडिक यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक मंगेश शेगोकार करीत आहेत.

### १८ जून रोजी स्थानिक प्राधिकारी

निवडणुकीच्या कार्यक्रमानुसार, सोमवार, दि. २५ मे २०२६ रोजी अधिसूचना जारी करणे, १ जून रोजी नामांकने (उमेदवारी अर्ज) दाखल करण्याची अंतिम तारीख, २ जून रोजी नामांकनांची छाननी, ४ जून रोजी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख, १८ जून रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ पर्यंत मतदान, २२ जून रोजी मतमोजणी, २५ जून रोजी निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याची अंतिम तारीख आहे.

### मेळघाट विकासासाठी प्रशासनातील

या क्षेत्रातील सिकलसेल आणि कुपोषणमुक्त करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. कुपोषणमुक्तीसाठी पावसाळ्यापूर्वी आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या सक्त सूचना त्यांनी यावेळी दिल्या. मंत्री डॉ. उईके यांनी, आदिवासी क्षेत्राचा विकास करण्यासाठी प्रत्येकाने कार्य करणे गरजेचे आहे. शासनाची कामे प्रत्यक्षात दिसली पाहिजेत. त्यासोबतच नागरिकांना त्यांच्यासाठी असलेल्या योजनांची माहिती प्रकल्प कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात यावी. तसेच योजनांच्या लाभासाठी अर्ज प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे आणि लाभार्थ्यांची यादी अनिवार्यपणे लावण्यात यावी. बिरसा मुंडा कृषी योजनेत शेतकऱ्यांना विहिरीसोबतच सोलार सिस्टीम, पाईपलाईन, स्प्रिंकलर आणि मोटार पंपही देण्यात यावेत. यामुळे आदिवासी शेतकऱ्यांना पूर्ण लाभ मिळू शकेल. कृषी विद्यालयातील रिक्त पदे आणि इमारतीसाठी प्रयत्न करण्यात येतील. शासकीय आश्रम शाळांतील सुविधांबाबत चर्चा करण्यात आली. खारी आश्रमशाळा येथे वीज कनेक्शन आणि कमी दाबाच्या विजेची समस्या जाणवत आहे. याबाबत आश्रमशाळा आणि वसतिगृहांना स्वतंत्र डीपी बसविण्याचे निर्देश महावितरणला देण्यात आले. तसेच तारूबांदा गावात वाढीव वीज पोल तात्काळ उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले. रायपूर येथील आश्रमशाळेला जाण्यासाठी शाळा सुरू होण्यापूर्वी प्रशासकीय मान्यता देऊन रस्ता मंजूर करण्यात यावा. १५ जूनपूर्वी सर्व आश्रमशाळांमध्ये शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात यावी. तसेच प्रत्येक गावात स्मशानभूमी आणि त्यासाठी पक्का जोडरस्ता तयार करण्यात यावा, असेही डॉ. उईके यांनी सूचविले. यावेळी आमदार केवलराम काळे, प्रभुदास भिलावेकर, नगराध्यक्ष सुनिल चौथमल, आदिवासी विभागाच्या अपर आयुक्त आयुषी सिंह, मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी, उपविभागीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी सिद्धार्थ शुक्ला, आरोग्य उपसंचालक तसंगतुषार वारे, रमेश मावसकर उपस्थित होते. बैठकीपूर्वी डॉ. उईके यांचे धारणी येथील विश्रामगृह येथे आदिवासी परंपरेनुसार गदली सुसुन नृत्याने स्वागत करण्यात आले. तत्पुर्वी डॉ. उईके यांनी सकाळी तारूबांदा येथील कांद्रीबाबा हनुमान मंदिर भेट दिली.

### धन्वंतरी रुग्णालयावर सहकार पॅनल

हाती सत्ता मिळवली. २१ संचालक मंडळाच्या रिक्त पदासाठी सहकार पॅनलने उभ्या केलेल्या १८ पैकी १८ ही उमेदवारांना मोठे मताधिक्य मिळाले.मतदारांनी सहकार पॅनलला कौल देत धन्वंतरी रुग्णालयावर सेवा देण्याची संधी दिली आहे. उल्लेखनीय म्हणजे सहकार पॅनलचे वैद्यकीय क्षेत्रातील मतदार संघात सहापैकी सहाही उमेदवार निवडणुकीपूर्वीच अविरोध निवडून आले होते. यामध्ये डॉ ओ.जी.मुंदडा, डॉ. अनिल रोहनकर, डॉ. आशिष साबू, डॉ. मनोज गुप्ता, डॉ. अविनाश लव्हाळे आणि डॉ. स्वप्नील शिरभाते यांचा समावेश होता. रविवार दिनांक १७ मे २०२६ रोजी झालेल्या निवडणुकीमध्ये जवळपास ४२ टक्के मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला यामध्ये सर्वसाधारण मतदारसंघातून राजेश गोयनका, डॉ. प्रमोद झाडे, अशोक ठाकरे अजय दातेराव,ओंकारराव बंड, प्रतापराव भुयार,गजानन रडके हे उमेदवार विजयी झाले आहे तर महिला राखीव मतदार संघामधून डॉ. मीनल मनीष देशमुख, वंदना प्रशांत वानखडे यांना विजयी घोषित करण्यात आले. इतर मागासवर्गीय प्रतिनिधी प्रवर्गातून प्रा. डॉ. अमित एकनाथराव गावंडे यांनी दणदणीत विजय मिळविला तर अनुसूचित जाती जमाती मतदारसंघातून प्राचार्य डॉ. संजय खडसे हे विजयी झाले.तर विमुक्त जाती भटक्या जमाती मतदारसंघातून अरुण विठ्ठलराव बांबल यांनी विजय प्राप्त केला. सहकार पॅनलचे सर्वच्या सर्वच उमेदवार विजयी झाले असून सहकार पॅनलने धन्वंतरीवर आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे. विविध संस्था मतदार संघातून द्यावयाच्या प्रतिनिधीमध्ये प्रकाश काळबांडे,मनीष कोरपे आणि संजय वानखडे हे उमेदवार विजयी झाले आहे.

पहिल्यांदाच झालेल्या अटीतटीच्या या लढतीमध्ये धन्वंतरी रुग्णालयावर सहकार पॅनलच्या निमित्ताने पुन्हा एकदा मतदारांनी संस्थापक उमेदवाराच्या नेतृत्वाला संधी दिली आहे. उल्लेखनीय म्हणजे अमरावती जिल्ह्यातील प्रतिष्ठित अनेक दिग्गजांनी या निवडणुकीसाठी आपले वर्चस्वपनाला लावले होते. सहकार पॅनल साठी सर्व स्तरातील मतदारांनी मोठे योगदान दिल्याने मोठा विजय प्राप्त झाला असे विजयी उमेदवारांनी मत व्यक्त करून निवडणुकीसाठी सहकार्य करणाऱ्या सर्वांचेच आभार मानले.

निवडणुकीचा निकाल घोषित होताच सहकार पॅनलच्या सर्व विजय उमेदवारांनी एकच जल्लोष केला. आज सकाळी ९ वाजता मतमोजणीला प्रारंभ झाला सायंकाळी चार पर्यंत चाललेल्या या प्रक्रियेनंतर विजयी उमेदवारांनी गुलालाची उधळण करत विजयाचा आनंद साजरा केला.

### तिन्ही आरोपी गुन्हे शाखेच्या

पंचनामा व प्राथमिक तपासानंतर गुन्हे शाखेच्या पथकाने गोपनीय बातमीदार, तांत्रिक विश्लेषण आणि स्थानिक माहितीच्या आधारे तपासाची चक्रे वेगाने फिरवली. त्यानंतर कुंड सरजापूर, वडाळी आणि मालटेकडी परिसरातून तिघा संशयितांना ताब्यात घेण्यात आले. पोलिसांनी चौकशी केली असता जुन्या वादातून आरोपींनी तेजस बिलबिले याच्यावर चाकूने छातीवर वार करून त्याची हत्या केल्याची कबुली दिली. तसेच कार्तिक दिगांबर बोरुडे (रा. माळीपुरा) याच्यावरही चाकूने हल्ला करून त्याला ठार मारण्याचा प्रयत्न केल्याचे समोर आले आहे. ताब्यात घेण्यात आलेले आरोपी मध्ये आकाश राजू बेलसरे (वय २७, रा. माळीपुरा, अमरावती), वैभव राजू बेलसरे (वय २५, रा.माळीपुरा, अमरावती) व राजू उत्तमराव बेलसरे (वय ५८, रा. माळीपुरा, अमरावती) यांचा समावेश आहे. सदर आरोपींना पुढील कारवाईसाठी खोलापुरी गेट पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही धडक कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, श्याम घुगे, रमेश धुमाळ तसेच सहायक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनात करण्यात आली. गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या विशेष पथकाने ही कारवाई यशस्वीरीत्या पार पाडली.

### गाडगेनगर हल्ला प्रकरणातील

इमरान खान गफ्फार खान या चार आरोपींना जामीन मंजूर करत त्यांची मुक्तता करण्याचे आदेश दिले.

माहितीनुसार, २७ जानेवारी २०२६ रोजी गाडगेनगर परिसरात 'बधाई' कार्यक्रमाच्या कारणावरून दोन तृतीयपंथीय गटांमध्ये वाद झाला होता. या वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. फिर्यादी गौरी पवार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार आरोपींनी तलवार व कोयत्याने जीवे मारण्याच्या उद्देशाने हल्ला केल्याचा आरोप करण्यात आला होता. या घटनेत तीन जण जखमी झाले होते. या प्रकरणी गाडगेनगर पोलिसांनी भारतीय न्याय संहिता (BNS) कलम १०९, ११८(२), १८९(२) तसेच आर्म्स अ‍ॅक्टअंतर्गत गुन्हा दाखल केला होता. सरकार पक्षाने न्यायालयात घटनेचा व्हिडिओ पुरावा सादर करत हा पूर्वनियोजित हल्ला असल्याचा दावा केला व जामिनाला विरोध दर्शविला होता. दरम्यान, आरोपींच्या वतीने बाजू मांडताना अ‍ॅड. हसीब मिर्झा यांनी हा प्रकार अचानक घडलेल्या वादातून झाल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. तपास पूर्ण झाल्यानंतर आरोपींना कारागृहात ठेवणे म्हणजे 'प्री-ट्रायल पनिशमेंट' ठरेल, असा युक्तिवाद त्यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या विविध निर्णयांचा दाखला देत केला. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने चारही आरोपींना नियमित जामीन मंजूर केला. या निर्णयाची अमरावतीच्या विधी क्षेत्रात चर्चा सुरू आहे.

# आपत्ती व्यवस्थापनासाठी सर्व यंत्रणांनी सतर्क राहा -विभागीय आयुक्त नयना गुंडे

## -जिल्हास्तरीय नियंत्रण कक्ष 24x7 तास कार्यान्वित ठेवा -विभागीय मान्सून पूर्वतयारी आढावा -'एल निनो'च्या पार्श्वभूमीवर प्रशासन सतर्क

**अमरावती/प्रतिनिधीः-**
पावसाळ्यात पुरामुळे बाधित होणाऱ्या गावांसाठी कायमस्वरूपी उपाययोजना राबवाव्यात. पुरग्रस्त, संपर्क तुटणाऱ्या गावांत तसेच आदिवासी क्षेत्रातील दुर्गम गावांत तत्काळ मदत पोहोचण्याच्यादृष्टीने प्रभावी नियोजन करावे. त्यासाठी सर्व स्तरांवरील संपर्क यंत्रणा, आपत्ती व्यवस्थापन कक्ष, बचाव पथके 24×7 तास कार्यान्वित ठेवून जिल्हा प्रशासनाने व संबंधित यंत्रणांनी नेहमी सतर्क राहावे, असे निर्देश विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी दिले. आपत्तीच्या प्रसंगावेळी नागरिकांना तत्काळ संपर्क साधण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन कक्ष, मदत पथकांचे संपर्क क्रमांक सर्व माध्यमांव्दारे जाहिर करावे, असेही त्यांनी सांगितले.

विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात आयोजित बैठकीत विभागीय आयुक्तांनी मान्सून पूर्व तयारीबाबत जिल्हा प्रशासनाकडून आज आढावा घेतला. यावेळी अपर आयुक्त संजय जाधव, कृषी सहसंचालक गणेश घोरपडे प्रत्यक्षरित्या तसेच पाचही जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी व संबंधित यंत्रणांचे प्रमुख दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून बैठकीला उपस्थित होते.

विभागीय आयुक्त गुंडे म्हणाल्या की, आगामी पावसाळ्याच्या दृष्टीने जिल्हा प्रशासनाने मान्सून पूर्वतयारी व अनुषंगीक उपाययोजना आपापल्या जिल्ह्यात करुन ठेवावी. पावसाळ्यात अतिवृष्टीमुळे व पुरामुळे काही गावांचा संपर्क तुटतो. त्यादृष्टीने बाधितांसाठी उंच ठिकाणी निवारा, भोजन व्यवस्था तसेच धान्य, औषधींचा साठा आदी मुलभूत सामुग्रींची तजवीज आधीच करून ठेवावी. दूषित पाण्यामुळे साथीचे आजार फैलू नयेत यासाठी जलस्त्रोतांची गुणवत्ता तपासण्याबरोबरच आवश्यक तिथे पर्यायी व्यवस्था करावी. पावसाळ्यात येणाऱ्या साथ रोगांपासून तसेच विंचू दंश, सर्प दंशापासून बचावासाठी आरोग्य विभागाने प्रत्येक आरोग्य केंद्रात इंजेक्शन व पुरेसा औषधी साठा उपलब्ध करुन द्यावा. अवकाळी पावसानंतर वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी 'महावितरण'ने प्रभावी नियोजन करावे. जिल्हास्तरावर नियंत्रण कक्ष 24×7 नेहमी कार्यान्वित ठेवावीत. 'एसडीआरएफ' तसेच 'एनडीआरएफ'ची बचाव



पथके स्थापन करुन बोट, लाईफ जॅकेट, दोरखंड आदी आवश्यक साहित्यानिशी सुसज्ज ठेवावी. बचाव पथकांचे प्रशिक्षण व मॉकड्रीलही जिल्हा प्रशासनाने घ्याव्यात. 'एल निनो' च्या पार्श्वभूमीवर आवश्यक सर्व उपाययोजना जिल्हा प्रशासनाने कराव्यात, अशा सूचना विभागीय आयुक्तांनी यावेळी दिल्या.

त्या पुढे म्हणाल्या की, प्रत्येक विभागाने आपापली जबाबदारी काटेकोरपणे पार पाडावी. आदिवासी दुर्गम गावांतील गरोदर मातांची काळजी घेण्यासाठी जवळपासच्या आरोग्य केंद्रात आवश्यक उपाययोजना करुन ठेवाव्याबाबत आरोग्य विभागाला सूचना केल्या. ब्रिटीशकालीन तलावांच्या नियंत्रणाबाबत जिल्हा परिषद प्रशासन व जलसंधारण विभागाने गाळ काढणे, संरक्षणात्मक बाबींची जाणीवपूर्वक कार्यवाही करावी. ग्रामीण भागात नदी खोलीकरण व पुर संरक्षण भिंतीची तपासणी व आवश्यकतेनुरुप दुरुस्त्या आताच करुन घ्याव्यात. महापालिका, नगरपालिका प्रशासनाने संबंधित शहरातील नाल्यांची साफ-सफाई व स्वच्छता, डासांचा प्रतिबंध आदी कामे तातडीने पूर्ण करावी. जीर्ण व शिकस्त असलेल्या जिल्हा परिषद शाळा व ईमारतींचे सर्वेक्षण करून सुरक्षिततेबाबत खातरजमा करावी. धरणातील जलसाठ्यांच्या नियंत्रणासाठी आवश्यक मनुष्यबळ नियुक्त करावे. नदीकाठावरील गावांत धोकादायक ठिकाणी (ब्लू लाईन, रेड लाईन) सीमांकन करावे. तसेच पूर प्रतिबंधक समिती स्थापन करावी. धरणातील पाणी सोडताना तहसीलदार, पोलीस व कंट्रोलरूमला २४ तास आधी कळवावे. सर्व प्रकल्पांची तातडीची दुरुस्ती करून घ्यावी. दुर्गम भागातील संपर्क न होऊ शकणाऱ्या ठिकाणी बिनतारी संदेश यंत्रणा कार्यान्वित करावी. हवामान खात्याकडून इशारे प्राप्त होताच सर्वदूर माहिती जलद गतीने पोहोचवावी, असेही निर्देश विभागीय आयुक्तांनी यावेळी दिले.

### श्वास बंद झाल्याने फाजिला

महिन्यात झाला होता. १५ मे रोजी पहाटे तिच्या सासरहून फोन आला कि, फाजिलाचा मृत्यू झाला आहे, तुम्ही तातडीने नागपूरला या, अशी माहिती देण्यात आली. तिला हृदयविकाराचा झटका आल्याचे सासरच्यांनी सांगितले. माहेरच्या मंडळींनी तातडीने नागपूर गाठले. सासरच्या वागणुकीवर आणि बोलण्यावर संशय आल्याने त्यांनी मुलीचा अंत्यविधी आम्ही आमच्या गावीच करू, असे सांगून फाजिलाचा मृतदेह अमरावतीत आणला. विशेष म्हणजे, नागपुरातून मृतदेह आणताना कोणत्याही रुग्णालयात किंवा पोलिस ठाण्यात या मृत्यूची नोंद करण्यात आलेली नव्हती.१५ मे रोजी अमरावतीच्या हैदरपुरा स्थित कब्रस्तान मध्ये फाजिलाचा दफनविधी झाला. त्यावेळी मुलीच्या गळ्यावर काही व्रण असल्याचे नातेवाइकांच्या निदर्शनास आले होते. त्यानंतर हा घातपाताचा प्रकार असावा, असा संशय व्यक्त करण्यात आला. नातेवाइकांनी १६ मे रोजी सायंकाळी थेट नागपुरी गेट पोलिस ठाणे गाठले आणि सासरच्या मंडळींवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. प्रकरणाचे गांभीर्य ओळखून ठाणेदार हनुमंत उरलागोंडावार यांनी मृतदेह कबरीतून बाहेर काढण्याची उपविभागीय दंडाधिकाऱ्यांकडे परवानगी मागितली. ती मिळताच रविवारी सायंकाळीच शासकीय रुग्णालयात त्याचे इन-कॅमेरा शवविच्छेदन करण्यात आले.शव विच्छेदनाच्या प्राथमिक अहवालानुसार फाजिलाचा मृत्यू हार्ट अटॅक ने नाही तर श्वास बंद झाल्यामुळे झाल्याचे समोर आले. यामुळे प्रकरणाला नवीन वळण आले आहे तर दुसरीकडे नागपूर पोलिसांनी फाजिलाचे पती आणि दिराला ताब्यात घेऊन चौकशी सुरू केली आहे.

### पीडीएमसी मध्ये परिचारिकांचे

होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अचानक निर्माण झालेल्या या परिस्थितीमुळे रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांमध्ये संभ्रमाचे वातावरण पसरले आहे.

माहितीनुसार सोमवारी दुपारच्या सुमारास पीडीएमसी मधील परिचारिका रुग्णालयाच्या आवारात एकत्र जमल्या आणि त्यांनी आंदोलनाला सुरुवात केली. या आंदोलनाबाबत रुग्णालय प्रशासनाला कोणतीही पूर्वकल्पना देण्यात आली नसल्याचे सांगण्यात आले आहे. त्यामुळे सुरुवातीच्या काही वेळेत प्रशासनालाही आंदोलन नेमक्या कोणत्या कारणावरून सुरू करण्यात आले आहे, याची स्पष्ट माहिती मिळू शकली नाही. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, गेल्या काही दिवसांपासून परिचारिकांमध्ये वेतन थकबाकी आणि पुनर्नियुक्तीच्या प्रश्नावरून नाराजी वाढत होती. यासंदर्भात परिचारिकांनी काही दिवसांपूर्वी अमरावती येथील कामगार आयुक्त कार्यालयात निवेदन सादर केले होते. या निवेदनात वेतनाशी संबंधित मुद्दे तसेच पुनर्नियुक्तीच्या मागण्यांचा उल्लेख करण्यात आल्याचे समजते. यानंतर कामगार आयुक्त कार्यालयाने पीडीएमसी प्रशासनाकडे या प्रकरणाचा सविस्तर अहवाल मागविला होता. मात्र त्या अहवालाची प्रतीक्षा न करता परिचारिकांनी थेट आंदोलनाचा मार्ग स्वीकारल्यामुळे प्रशासनासमोर नवे आव्हान निर्माण झाले आहे. रुग्णालय प्रशासन आणि परिचारिका यांच्यातील संवाद प्रक्रियेत नेमका कुठे तणाव निर्माण झाला, याबाबत विविध चर्चांना उधाण आले आहे. रुग्णालयात दररोज मोठ्या संख्येने रुग्ण उपचारासाठी दाखल होत असतात. अशा परिस्थितीत परिचारिकांचे अचानक आंदोलन सुरू झाल्यामुळे रुग्णसेवा विस्कळीत होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. विशेषतः अतिदक्षता विभाग, सामान्य वॉर्ड आणि आपत्कालीन सेवा यांवर याचा परिणाम होऊ शकतो, अशी चर्चा आहे.

### कंत्रादारांची थकीत १४.६६ कोटी

रखडली असल्याने कंत्राटदारांनी मजीप्रा कार्यालयावर आंदोलन पुकारले होते. सतत आठवडाभर आंदोलन करण्यात आल्याने मजीप्राची कामे प्रभावित होऊन अमरावती शहरातील पाणी पुरवठा सुद्धा विस्कळीत होण्याची गंभीर परिस्थिती निर्माण झाली. दरम्यान गेल्या १४ मे रोजी महाराष्ट्र विधान परिषद आमदार संजय खोडके यांनी मजीप्रा कंत्राटदारांच्या काम बंद आंदोलनाला भेट देऊन त्यांच्या मागण्या जाणून घेतल्या. जिल्ह्यातील कंत्राटदारांनी केलेल्या कामांचे मोबदले गेल्या एक वर्षापासून शासनाकडे थकीत होते. वारंवार पाठपुरावा करूनही तोडगा निघत नसल्याने कंत्राटदार बांधवांनी आक्रमक पवित्रा घेत संपाचे हत्यार उपसले होते. 'आम्ही केलेल्या कामाचे हक्काचे पैसे आम्हाला मिळावेत' आणि 'प्रलंबित देयकांशिवाय नवीन काम करणार नाही' अशी ठाम भूमिका संघटनेने मांडली होती. या गंभीर पेचप्रसंगात महाराष्ट्र विधान परिषद सदस्य - संजय खोडके यांनी लक्ष घालून कंत्राटदारांच्या मागण्या लवकरच मार्गी लावणार असल्याचे आश्वासन दिले. त्यांच्या प्रभावी मध्यस्थीमुळे मजीप्रा कंत्राटदारांनीं आपले आंदोलन स्थगित करत असल्याचे जाहीर केले. दरम्यान आ.संजय खोडके यांनी मंत्रालय स्तरावर पाठपुरावा केला असता प्रशासकीय हालचालींना वेग आला असल्याने अशातच आता मजीप्रा कंत्राटदारांची वर्षभरापासूनची थकीत देयके अदा करण्यासाठी १४.६६ कोटीची रक्कम मजीप्राच्या एसीबीआय खात्यात जमा करण्यात आली आहे. या संदर्भात आ.संजय खोडके यांच्या प्रयत्नाने मजीप्रा कंत्राटदारांना मोठा दिलासा मिळाला आहे.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ मंगळवार, १९ मे २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# निविष्ठांच्या सुरळीत पुरवठ्यासाठी अचूक नियोजन करा – पालकमंत्री

■ प्रतिनिधी | अकोला ■

**खरीप हंगामासाठी जिल्ह्यात बी–बियाणे, खते आदी निविष्ठांची कुठेही कमतरता भासू नये यासाठी अचूक नियोजन ठेवा. निविष्ठांचा काळा बाजार कुठेही होता कामा नये अन्यथा कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी आज येथे दिला.**

पालकमंत्री ॲड. फुंडकर यांच्या अध्यक्षतेत जिल्हास्तरीय खरीप हंगामपूर्व आढावा बैठक नियोजनभवनात झाली, त्यावेळी ते बोलत होते. खासदार अनुप धोत्रे, आमदार रणधीर सावरकर, प्रकाश भारसाकळे, हरिश पिंपळे, नितीन देशमुख, साजिद पठाण, जिल्हाधिकारी वर्षा मीना, जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी मुरली इंगळे आदी उपस्थित होते.

पालकमंत्री ॲड.फुंडकर म्हणाले की, जिल्ह्यात खते, बियाणे आदी निविष्ठांची कुठेही उणीव भासू नये म्हणून नियोजन सादर करताना योग्य व परिपूर्ण आकडेवारी असावी. निविष्ठांची तालुकानिहाय आवश्यकता व उपलब्धता स्पष्ट असली पाहिजे. तालुका नियोजन करताना लोकप्रतिनिधींच्या सूचना विचारात घेतल्या पाहिजेत. तशी तयारी करून व मान्यवर लोकप्रतिनिधींच्या सूचना विचारात घेऊन अचूक माहिती सादर करावी जेणेकरून राज्यस्तरीय बैठकीत पाठपुरावा करण्यात येईल. जिल्ह्यात सर्वदूर पुरवठा सुरळीत व्हावा. निविष्ठांचा काळाबाजार, लिंकिंग असे प्रकार झाल्यास कठोर कारवाई करण्यात येईल. ते पुढे म्हणाले की, कृषी विभागाकडून वेळोवेळी होणा-या कार्यवाहींची माहिती शेतकरी बांधवांना वेळेत झाली पाहिजे.



## खरीपपूर्व नियोजन बैठकीत आमदार साजिद खान पठाण आक्रमक

### बोगस बियाणे - खत विक्रेत्यांवर गुन्हे दाखल करा; शेतकऱ्यांना तातडीने कर्ज द्या

खरीप हंगाम २०२६ च्या पार्श्वभूमीवर बियाणे नियोजन, पुरवठा व विक्री संदर्भात सोमवारी नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय येथे जिल्ह्याचे पालकमंत्री ना. आकाश फुंडकर यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. बैठकीत अकोला पश्चिमचे आमदार साजिद खान पठाण यांनी शेतकरी प्रश्नांवर आक्रमक भूमिका घेत प्रशासनाला धारेवर धरले.

खरीप हंगामासाठी अकोला शहरासह ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना बियाणे व खताचा पुरेसा साठा उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी आमदार पठाण यांनी केली. बाजारात शेतकऱ्यांची लूट होऊ नये यासाठी बियाणे व खताची जादा दराने विक्री रोखण्यासाठी प्रशासनाने कठोर नियंत्रण ठेवावे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

बोगस बियाणे व खत विक्री करणाऱ्यांवर तातडीने कठोर कारवाई करण्यात यावी, तसेच अशा प्रकारांना पाठीशी घालणाऱ्या संबंधित कृषी केंद्रांवरही गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी त्यांनी बैठकीत लावून धरली. शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या कृषी अधिकाऱ्यांवरही फौजदारी कारवाई करण्यात यावी, असा जोरदार आग्रह त्यांनी व्यक्त केला.

बैठकीत पेरणीपूर्व कर्ज वितरणाचाही मुद्दा गाजला. अनेक शेतकऱ्यांना बँकांकडून वेळेवर पीककर्ज मिळत नसल्याची बाब आमदार पठाण यांनी निदर्शनास आणून दिली. बँक अधिकारी शेतकऱ्यांना विनाकारण त्रास देत असून कर्ज मंजुरीस टाळाटाळ करीत असल्याचा आरोप करत सर्व पात्र शेतकऱ्यांना तातडीने कर्ज उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी त्यांनी प्रशासनाकडे केली.

'शेतकऱ्यांना बोगस बियाणे व खत देऊन फसवणूक झाली तर आम्ही शेतकऱ्यांसोबत रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन उभारू,' असा इशाराही आमदार साजिद खान पठाण यांनी यावेळी दिला. विविध शेतकरी हिताच्या प्रश्नांकडे त्यांनी पालकमंत्र्यांचे लक्ष वेधत प्रशासनाने तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली.

## जनगणना २०२७च्या पहिल्या टप्प्याला प्रारंभ

### घरगणना मोहिमेला किन्हीराजा येथे सुरुवात



■ प्रतिनिधी | किन्हीराजा ■

भारत सरकारच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या जनगणना २०२७ मोहिमेच्या पहिल्या टप्प्यास १६ मेपासून सुरुवात करण्यात आली असून, घरगणना व घरांची मोजणी करण्याचे काम सुरू झाले आहे. देशाच्या विकास नियोजनासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या या राष्ट्रीय उपक्रमात नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन शासनाच्या वतीने करण्यात आले आहे. १ मेपासून जनगणना २०२७च्या अधिकृत प्रक्रियेला प्रारंभ झाला असून, १६ मे ते १४ जून या कालावधीत घरांची गणना करण्यात येणार आहे. या मोहिमेत घरांची माहिती, कुटुंबातील सदस्यांची संख्या, महिला-पुरुष, लहान मुले आदींची माहिती संकलित केली जाणार आहे.

किन्हीराजा परिसरात तलाठी, शिक्षक तसेच नियुक्त प्रगणक घराघरांत जाऊन माहिती संकलनाचे कार्य करीत आहेत.

जनगणना ही देशाच्या भविष्यातील विकास आराखड्याचा महत्त्वाचा पाया मानली जाते. त्यामुळे नागरिकांनी कोणतीही भीती किंवा संकोच न बाळगता अचूक माहिती द्यावी, असे आवाहन केंद्र व महाराष्ट्र शासनाकडून करण्यात आले आहे.जनगणना कार्य सुरळीत पार पडण्यासाठी नागरिकांनी प्रगणकांना योग्य सहकार्य करून या राष्ट्रीय कर्तव्यात आपला सहभाग नोंदवावा, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

## खुल्या प्रवर्गातील आर्थिक दुर्बलांसाठी मोफत ड्रोन प्रशिक्षण

■ प्रतिनिधी | वाशिम ■

शेतीपासून फोटोग्राफी, सर्वेक्षण, सुरक्षा आणि विविध तांत्रिक कामांमध्ये आज ड्रोनचा मोठ्या प्रमाणावर वापर होत आहे. ड्रोन चालवण्याचे व्यावसायिक प्रशिक्षण घेण्यासाठी सामान्यतः लाखो रुपये खर्च करावे लागतात. मात्र, महाराष्ट्र शासनाच्या अमृत संस्थेमार्फत खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील युवकांना हे प्रशिक्षण पूर्णपणे मोफत दिले जात आहे. विशेष म्हणजे प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर अधिकृत ड्रोन पायलट परवानाही प्रदान केला जातो. महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) ही महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था असून, खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी विविध कौशल्यविकास आणि उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम राबवते. त्याचाच एक भाग म्हणून 'अमृत ड्रोन मिशन' अंतर्गत ड्रोन ऑपरेटर (पायलट) प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे.

## पंडीत दिनदयाल उपाध्याय जिल्हा कार्यशाळेचे आयोजन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

पंडीत दिनदयाल उपाध्याय महाप्रशिक्षन अभीयान अंर्तगत वाशिम जिल्हा भाजपाच्या वतीने जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन दि १८ व १९ मे रोजी जिल्ह्यातील मंगरूळपीर येथील कृष्णा लॉन अँन्ड मॅरेज हॉल येथे आयोजीत करण्यात आले आहेत.सदर कार्यशाळेला वाशिम जिल्हा प्रभारी आ.रणधिर सावरकर,प्रदेश सरचीटनीस तथा विदर्भ प्रमुख आ.संजय कुटे समवेत मान्यवर उपस्थीत राहणार आहे.

जिल्ह्यातील मंगरूळपीर येथील कृष्णा लॉन अँन्ड मॅरेज हॉल येथे सोमवार १८ मे रोजी सकाळी ९:३० वाजता दोन दिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन पार पडणार आहे.या निवासी प्रशीक्षन वर्गात ११ वेगवेगळया विषयांवर सत्रे संपन्न होणार आहे.१८ मे रोजी सकाळी ९ वाजता सरल ॲप द्वारे नोंदनी सत्र नंतर उद्घाटन सकाळी १० वाजता,पहिले सत्र एसआयआर मतदार यादी शुद्धीकरन विषयावर जिल्हा प्रभारी आमदार रनधीर सावरकर यांचे प्रबोधन ,सकाळी ११ वाजता दुसऱ्या सत्रात आपले सिद्धांतीक अधीष्टान एकात्म मानव दर्शन,स्वांकृतीक राष्ट्रवाद,पंचनीष्ठा विषयावर अमरावती येथील शिवराय कुलकर्णी यांचे मार्गदर्शन,तीसरे सत्र दुपारी १२ वाजता इतीहास व विकास विषयावर दिनेश सुर्यवंषी यांचे मार्गदर्शन ,चौथे सत्र दुपारी १ वाजता कार्यकत्यांचा विकास ,वर्तन आणी अपेक्षा विषयावर नागपुर येथील डॉ राजीव पोतदार,पाचवे सत्र दुपारी ३ वाजता कार्यपद्धती विषयावर अमरावती येथील जयंत डेहनकर ,सहावे सत्र दुपारी सहा वाजता बुलढाणा येथील विनोद वाघ,सातवे सत्र दुपारी ४ वाजता सातव्या सत्रात स्थायी कार्यक्रम ,बुथ व्यवस्थापन,मन की बात ,आईटी विषयावर यवतमाळ येथील नितीन भुतडा ,सायंकाळी ५ वाजता आपल्या सरकारच्या गरीब कल्यांकारी योजना ,त्यांची अमंबजावनी मध्ये संघटनेची भुमीका व देशासमोरील आव्हाने विषयावर प्रदेश सरचीटनीस डॉ संजय कुटे यांचे मार्गदर्शन, रात्री ९ वाजता सांस्कृतीक कार्यक्रम,कवी संमेलन,गप्पा गोष्टी ,तर १९ मे रोजी सकाळी ६ ते ७ योग अभ्यास,सकाळी ९ वाजता पहिल्या सत्रात व्यवहारीक सत्र,सकाळी १० वाजता विचार परीवार विषयावर अमरावती येथील प्रा रवींद्र खोडेकर,तर ११ वाजता सोशल मीडीया,मीडीया,नवीन तंत्रज्ञान एआई,प्रभावी माहिती यंत्रना व संघटनेसाठी प्रतीमा या विशयावर खामगाव येथील सागर भाउसाहेब फुंडकर यांचे मार्गदर्शन लाभनार आहे.सदर कार्यशाळेला आजी,माजी सर्व लोकप्रतीनीधी ,जिल्हा पदाधीकारी ,जिल्हा मोर्चा अध्यक्ष व सरचीटनीस ,प्रकोष्ट जिल्हा संयोजक ,मंडळ प्रभारी ,मंडळ अध्यक्ष व सरचीटनीस ,जिल्हा परीषद अध्यक्ष ,नगरपरीषद अध्यक्ष व नगरसेवक आदी सर्व पदाधीकारी कार्यकर्ते उपस्थीत राहणार आहे.संघटन बळकट करण्यासाठी व पंडीत दिनदयाल यांचा एकात्म मानववाद विचार तळागळा पर्यंत पोहोचवन्यासाठी या दोन दिवसीय प्रशिक्षन कार्यशाळेला उपस्थीत राहण्याचे आव्हान वाशिम जिल्हा भाजपाच्या वतीने करण्यात आले आहे.

## ग्रामपंचायत वाईगोळला राज्यस्तरावर तृतीय पुरस्कार



■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यातील मानोरा तालुक्यातील ग्रामपंचायत वाईगोळला महा आवास अभीयान प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीन ग्रामवीकास व पंचायतराज विभाग कडुन राज्यस्तरावर तृतीय पुरस्काराने मुख्यमंत्री देवेंद्र फ डनविस व केंद्रीय कृषीमंत्री शिवरासींह चौहाण यांच्या हस्ते सातारा येथे १५ मे रोजी ग्रामपंचायत वाईगोळचे सरपंच उमेश राठोड व ग्रामविकास अधीकारी विद्या गोपालराव मारोटकर यांना प्रशस्तीपत्र देउन सन्मानीत करण्यात आले.सातारा येथील प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत ५ लाख घरांचे लोर्कापन व १० हजार कोटी निधी वीतरन राज्यस्तरीय कार्यक्रम अंतर्गत राज्यातील उतकृष्ट काम करणाऱ्या ग्रामपंचायत यांना सन्मानीत करण्यात आले.राज्यस्तरावर वाईगोळ ग्रामपंचायतला तृतीय क्रमांक मिळाल्याने जिल्ह्याचा गौरव वाढला आहे.सर्व ग्रामस्थ ग्रामपंचायत सदस्य कर्मचारी वृंद वरीष्ठ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शनामुळे हे यश प्राप्त झाल्यचे प्रतीक्रीया ग्रामपंचाय सर्पंच व ग्रामविकास अधिकारी यांनी दिली आहे.

## वाशिममध्ये 'वासंतिक व्याख्यानमाला- २०२६' चे आयोजन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यातील अधिकारी व कर्मचारी वृंदाच्या वतीने 'वाशिम वासंतिक व्याख्यानमाला-२०२६' चे आयोजन करण्यात आले असून, २० मे ते २४ मे २०२६ या कालावधीत विविध क्षेत्रातील मान्यवरांची व्याख्याने आयोजित करण्यात आली आहेत. वाशिमच्या ऐतिहासिक, सांस्कृतिक व साहित्यिक परंपरेत भर घालण्याच्या उद्देशाने ही पाच दिवसीय व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

व्याख्यानमालेचे पहिले पुष्प २० मे रोजी सायंकाळी ७ वाजता होणार असून, पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय, मुंबईचे संचालक डॉ. तेजस गर्गे हे 'शिवछत्रपतींचे किल्ले जागतिक वारसा – एक प्रवास' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत.

२१ मे रोजी प्रा. इंद्रजीत भालेराव यांचे 'शोध – कृषी संस्कृतीचा' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. २२ मे रोजी सायंकाळी ६.३० वाजता ज्येष्ठ साहित्यिक मा. बाबाराव मुसळे यांचा सत्कार व 'वाशिम जिल्ह्याचे वाङ्मयीन योगदान' या विषयावरील व्याख्यान होणार आहे. त्यानंतर रात्री ८ वाजता प्रा. प्रशांत मोरे यांचा 'आई तुझा हात – परिस' या विषयावरील काव्यगायनाचा कार्यक्रम रंगणार आहे.

२३ मे रोजी श्रीमती माधुरी यादवडकर या 'नव्या काळाच्या संदर्भातून : आनंददायी पालकत्व' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. तर २४ मे रोजी मराठी भाषा विभाग मंत्रालयाचे सचिव तथा वाशिम जिल्ह्याचे पालक सचिव डॉ. किरण कुलकर्णी हे 'अभिजात मराठी – दिशा आणि भवितव्य' या विषयावर व्याख्यान देणार आहेत. सर्व कार्यक्रम स्व. बाळासाहेब ठाकरे शेतकरी प्रशिक्षण केंद्र (आत्मा), काटा चौफुली, वाशिम येथे आयोजित करण्यात आले आहेत. व्याख्यानमालेस वाशिमकर नागरिकांनी सहपरिवार उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## मनिष डांगे यांच्या पाठपुराव्याला यश; ओळखपत्र मुदतवाढ



■ प्रतिनिधी | वाशिम ■

महाराष्ट्रातील दिव्यांगांना ३१ मार्च २०२६ पूर्वी वैश्विक ओळखपत्र युडी आयडी कार्ड सादर करण्याबाबत २७ मार्च २०२६ रोजी सामाजिक न्याय विभागाने शासन निर्णय पारित करुन कायमस्वरूपी दिव्यांग प्रमाणपत्र वैश्विक ओळखपत्र ज्या लाभार्थ्यांकडे नाही अशा सर्व लाभार्थ्यांना संजय गांधी योजनेचा लाभ बंद करण्यात येणार होता. याबाबत सामाजिक न्याय मंत्री महाराष्ट्र शासन, दिव्यांग कल्याण विभागाचे मंत्री यांच्याकडे जिल्हाधिकारी मार्फत मनसेचे मा. जिल्हाध्यक्ष मनिष डांगे यांनी पत्रव्यवहार करून वैश्विक ओळखपत्र काढण्याबाबत शासनाने मुदत वाढ देण्याची मागणी निवेदन देऊन लावुन धरली होती. या संदर्भात १५ मे २०२६ रोजी दिव्यांग सक्षमीकरण विभागाने वैश्विक ओळखपत्र युडी आयडी कार्ड काढण्याकरता, सक्षम प्राधिकऱ्याने दिलेले वैद्यकीय प्रमाणपत्र, एसएडीएम प्रणालीमध्ये देण्यात आलेल्या दिव्यांग प्रमाणपत्राचे युडी आयडी कार्ड वैष्णिक ओळखपत्र काढण्याकरता ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत मुदत वाढ दिल्यामुळे संजय गांधी योजनेच्या लाभार्थ्यांना लाभ मिळणार असल्यामुळे

## दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांनी मोफत कृत्रिम अवयव शिबिराचे आयोजन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

श्री भगवान महाविर विकलांग सहायता समिती, दिल्ली यांच्या जयपूर फुट कॅम्प अंतर्गत दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत कृत्रिम अवयव तसेच विविध सहाय्यक उपकरणांचे वितरण करण्यात येणार असून जिल्ह्यातील पात्र लाभार्थ्यांनी या शिबिराचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण कार्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

या उपक्रमाअंतर्गत दि. १८ मे २०२६ ते २५ मे २०२६ या कालावधीत तपासणी व साहित्य वितरण शिबीराचे आयोजन करण्यात आले. असून कॅम्पच्या व्हिल चेअर, चालण्याची काठी, कानाची मशिन, तिवई काठी (ट्रीपॉड), मानेचा बेल्ट, कमरेचा बेल्ट, मनगटाचा बेल्ट, टॉयलेट चेअर, चष्मा, वॉकर, गुडघ्याचा बेल्ट, कॅलीपर, शुज आदी विविध सहाय्यक साधनांचे मोफत वितरण करण्यात येणार आहे.शिबिराचे आयोजन पुढीलप्रमाणे करण्यात आले आहे.

१)निवासी मतिमंद मुलांची कवठा कार्यशाळा, ता. रिसोड, जि. वाशिम दि. १९ मे २०२६ वेळ: सकाळी १० ते सायंकाळी ५ संपर्क प्रमुख : रवि हरिमकर मो.क्र. ८८८८२०४३३७

२) जिल्हा परिषद हायस्कूल, ग्रामीण पोलीस स्टेशनच्या मागे, वाशिम दि. २१ मे २०२६ व २२ मे २०२६ वेळ : सकाळी १० ते सायंकाळी ५ संपर्क प्रमुख : कृष्णा सावसुंदर मो.क्र. ७३५०३३५५०७

३) गजानन महाराज मतिमंद विद्यालय, सिल्वर पार्क मंगलकार्य मंगलकार्यालयासमोर मुर्तिजापूर रोड, कारंजा, जि. वाशिम दि. २४ मे २०२६ व २५ मे २०२६ वेळ : सकाळी १० ते सायंकाळी ५ संपर्क प्रमुख : सचिन अवटिक मो.क्र. ९६०४४३७७९५

शिबिरासाठी लाभार्थ्यांनी आधार कार्डची झेरॉक्स प्रत

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह; सवड येथे प्रवेश प्रक्रिया सुरू

■ प्रतिनिधी | वाशिम ■

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्या अधिपत्याखालील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह, सवड येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

मागासवर्गीय प्रवर्गनिहाय रिक्त असणाऱ्या आरक्षित टक्केवारीनुसार समाजातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, अपंग तसेच अनाथ प्रवर्गातील विद्यार्थी प्रवेशासाठी पात्र राहणार आहेत.

शालेय विभागातील इयत्ता ८ वी, कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता ११ वी तसेच बिगर व्यावसायिक व व्यावसायिक महाविद्यालयातील प्रथम वर्षात प्रवेशित विद्यार्थी ऑनलाइन अर्ज भरू शकतात.

जास्तीत-जास्त पात्र विद्यार्थ्यांनी ऑनलाइन प्रवेश अर्ज सादर करून शासनाकडून उपलब्ध होणाऱ्या विविध सोयी-सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

प्रवेशाबाबत अधिक माहितीसाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह, सवड येथे प्रत्यक्ष भेट द्यावी. ऑनलाइन प्रवेशासाठी पोर्टल लिंक : hmas.mahait.org अशी माहिती गृहपाल एस. बी. डोंगरे यांनी दिली.

## ज्ञानभारतम प्रकल्पांतर्गत राष्ट्रीय हस्तलिखित सर्वेक्षण मोहिमेला सुरूवात

■ प्रतिनिधी | वाशिम ■

भारताला हस्तलिखितांचा फार मोठा वारसा लाभलेला आहे. पारंपारिक ज्ञान हे पिढीदर पिढी या हस्तलिखितांद्वारे प्रसारीत होत आलेले आहे. परंतू हे सर्व हस्तलिखिते जागोजागी विखुरलेल्या स्वरुपात आहेत. या हस्तलिखिताचे ज्ञानभंडार एकत्र करुन एकाच ठिकाणी उपलब्ध करुन देता यावे, या दृष्टीने केंद्र शासनाने ज्ञानभारतम् या प्रकल्पाची आखणी केली आहे.

या प्रकल्पाचा मुख्य उद्देश भारतातील मौल्यवान हस्तलिखित वारशाचे सर्वेक्षण, दस्तऐवजीकरण, संवर्धन, डिजिटायझेशन व प्रसार करणे हा आहे. भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या ज्ञानभारतम् या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांतर्गत देशव्यापी हस्तलिखित सर्वेक्षण मोहिमेला १६ मार्च २०२६ पासून प्रारंभ करण्यात आला आहे.




केंद्रीय अर्थसंकल्प २०२५ मध्ये जाहीर करण्यात आलेल्या या योजनेअंतर्गत देशभरातील शैक्षणिक संस्था, संग्रहालये, ग्रंथालये, धार्मिक संस्था तसेच खाजगी संग्राहक यांच्या सहकार्याने एक कोटीहून अधिक हस्तलिखितांचा शोध व नोंदणी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. तसेच भारताच्या समृद्ध ज्ञानपरंपरेशी संबंधित हस्तलिखितांचा राष्ट्रीय डिजिटल संग्रह निर्माण करून तो राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उपलब्ध करून देण्याचा केंद्र शासनाचा मानस आहे. यामध्ये हस्तलिखितांची मालकी ही संबंधीत संस्था, ग्रंथालय अथवा खाजगी संग्राहक यांचीच राहणार आहे. परंतू कोणाला स्वखुशीने ही हस्तलिखिते राज्य शासनाकडे सुपूर्द करावयाची झाल्यास शासन ती स्वीकारेल. या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य शासनाची महत्त्वपूर्ण भूमिका असून राज्यातील विविध सांस्कृतिक संस्था, विद्यापीठे, संशोधन संस्था, हस्तलिखित संग्रहालये तसेच विद्वान यांच्या सहकार्याने ही मोहीम राबविण्यात येणार आहे.

महाराष्ट्रासाठी राज्य नोडल संस्था म्हणून पुराभिलेख संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची नियुक्ती करण्यात आली असून राज्य नोडल अधिकारी म्हणून सुजितकुमार उगले, संचालक, पुराभिलेख संचालनालय कार्य पाहणार आहेत. तर अंजली ढमाळ, उपसंचालक, मराठी भाषा विकास संस्था, तथा अभिजात मराठी भाषा कक्षा, मराठी भाषा विभाग या सहनोडल अधिकारी म्हणून काम पाहणार आहेत. या सर्वेक्षणासाठी ज्ञानभारतम् प्रकल्पांतर्गत 'GyanBharatam' हे मोबाईल ॲप विकसित करण्यात आले असून त्याद्वारे हस्तलिखितांचे क्षेत्रीय मूल्यांकन, पडताळणी व दस्तऐवजीकरणाची प्रक्रिया पार पाडण्यात येणार आहे. या सर्वेक्षण मोहिमेत शैक्षणिक संस्था, ग्रंथालये, संग्रहालये, संस्कृत पाठशाळा, धार्मिक संस्था, संशोधक, पारंपरिक पंडित, तसेच एनसीसी, एनएसएस स्वयंसेवक, विद्यार्थी व वारसा संवर्धन संस्था यांचा सक्रिय सहभाग अपेक्षित आहे. या निमित्ताने आवाहन करण्यात येते की, आपल्याकडे जर काही हस्तलिखिते उपलब्ध असतील तर त्याची माहिती ज्ञानभारतम् या मोबाईल ॲप वर अपलोड करावी व या राष्ट्र कार्यात सहभाग नोंदवावा.असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. मोबाईल ॲप डाऊनलोड करण्यासाठी खालील लिंकचा वापर करावा. iOS - https://apps.apple.com/us/app/gyan-bharatam/id6756345232, Android - https://play.google.com/ store/apps/ detailsid=com.gyanbharatam. app, Website link - https://gyanbharatam.com/

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १७१ ■ मंगळवार, १९ मे २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

# वर्धा पुन्हा 'हॉट'; तापमान ४६.०५ अंशांवर

## यंदाच्या उन्हाळयात दुसऱ्यांदा उष्णतेचा उच्चांक; तीन दशकांपूर्वीचा विक्रम पुन्हा चर्चेत

**वर्धा जनमाध्यम :** विदर्भातील उष्णतेचे केंद्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वर्धा जिल्ह्याने पुन्हा एकदा तापमानाचा नवा उच्चांक नोंदवत राज्याचे लक्ष वेधले आहे. सोमवारी १८ मे रोजी जिल्ह्याचे कमाल तापमान तब्बल ४६.०५ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले. विशेष म्हणजे, याच उन्हाळ्यात दुसऱ्यांदा एवढ्या तीव्र उष्णतेची नोंद झाली असून, तब्बल तीन दशकांपूर्वीचा विक्रम पुन्हा चर्चेत आला आहे.



### कुठल्या वर्षी किती राहिले सर्वाधिक तापमान

२०१६ : ४५.०० अंश सेल्सिअस
२०१७ : ४५.०२ अंश सेल्सिअस
२०१८ : ४५.०८ अंश सेल्सिअस
२०१९ : ४६.०० अंश सेल्सिअस
२०२० : ४२.०९ अंश सेल्सिअस
२०२१ : ४३.०४ अंश सेल्सिअस
२०२२ : ४५.०५ अंश सेल्सिअस
२०२३ : ४३.०० अंश सेल्सिअस
२०२४ : ४२.०५ अंश सेल्सिअस
२०२५ : ४४.०७ अंश सेल्सिअस

यापूर्वी ३० एप्रिल १९९६ रोजी वर्ध्यात ४६.०४ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली होती. तो आतापर्यंतचा अधिकृत उच्चांक मानला जात होता. मात्र, यंदाच्या उन्हाळ्यात २७ एप्रिल रोजी तापमानाने ४६.०५ अंशांचा टप्पा गाठत जुना विक्रम मोडीत काढला. आता मे महिन्यातही त्याच पातळीवर तापमान पोहोचल्याने वर्धा पुन्हा 'हॉट' ठरला आहे.

यंदा होळी आणि धुलिवंदनानंतरच उन्हाचा तडाखा वाढू लागला होता. सुरुवातीला ढगाळ वातावरणामुळे तापमान काहीसे नियंत्रणात राहिले; मात्र एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यानंतर आकाश निरभ्र होताच सूर्याने आक्रमक रूप धारण केले. १२ एप्रिलपासून तापमानात सातत्याने वाढ होत गेली. २६ एप्रिलला ४६.०४ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आणि त्यानंतर अवघ्या एका दिवसात म्हणजे २७ एप्रिलला ४६.०५ अंश सेल्सिअस तापमान नोंदवत गत तीन दशकांतील विक्रम मोडला गेला.

मे महिन्यातही उष्णतेचा कहर कायम आहे. रविवारी १७ मे रोजी तापमान ४६ अंश सेल्सिअसवर पोहोचले होते, तर सोमवारी त्यात पुन्हा वाढ होऊन ४६.०५ अंशांची नोंद झाली. दुपारच्या वेळी रस्त्यांवर शुकशुकाट पाहायला मिळत असून, नागरिकांनी अत्यावश्यक कामांशिवाय घराबाहेर पडणे टाळले आहे. उष्ण वाऱ्यांच्या झळांनी जनजीवन विस्कळीत झाले असून, शेतकरी, मजूर आणि रस्त्यावर काम करणाऱ्या कामगारांना सर्वाधिक फटका बसत आहे.

दरम्यान, डॉक्टरांनी नागरिकांना दुपारच्या वेळेत बाहेर न पडण्याचा, भरपूर पाणी पिण्याचा आणि लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांची विशेष काळजी घेण्याचा सल्ला दिला आहे. हवामान खात्याने पुढील काही दिवस विदर्भात उष्णतेची लाट कायम राहण्याची शक्यता व्यक्त केली आहे. त्यामुळे वर्धेकरांना अद्याप तरी उकाड्यापासून दिलासा मिळण्याची चिन्हे दिसत नाहीत.

# विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाचा निवडणूक कार्यक्रम जाहीर

## वर्धा - चंद्रपूर - गडचिरोली स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाकरीता १८ जून रोजी मतदान

**वर्धा जनमाध्यम :** महाराष्ट्र विधान परिषदेच्या वर्धा - चंद्रपूर - गडचिरोली या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघासह भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधान परिषदेच्या १६ स्थानिक प्राधिकारी मतदार संघाच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार - वर्धा - चंद्रपूर गडचिरोली या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांतर्गत १८ मे २०२६ पासून आदर्श आचारसंहिता अमलात आली आहे.

असा आहे निवडणूक कार्यक्रम : १) अधिसूचनेची प्रसिद्धी - २५ मे २०२६, २) नामनिर्देशनपत्र स्विकारण्याची अंतिम तारीख - १ जून २०२६, ३) नामनिर्देशन पत्राची छानननी - २ जून रोजी, ४) उमेदवारी मागे घेण्याची अंतिम तारीख - ४ जून रोजी, ५) मतदानाचा दिनांक - १८ जून २०२६ रोजी, ६) मतदानाची वेळ - सकाळी ८ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत, ७) मतमोजणी दिनांक - २२ जून रोजी, व ८) निवडणूक प्रक्रिया संपुष्टात येण्याची तारीख - २५ जून २०२६ आहे.

भारत निवडणूक आयोगाने घोषित केलेल्या निवडणूक कार्यक्रमांनुसार वर्धा - चंद्रपूर - गडचिरोली स्थानिक प्राधिकारी मतदारसंघासाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी, चंद्रपूर तर सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून निवासी उपजिल्हाधिकारी चंद्रपूर, निवासी उपजिल्हाधिकारी वर्धा, निवासी उपजिल्हाधिकारी गडचिरोली आहेत.

वरील निवडणूक प्रक्रियेअंतर्गत उपरोक्त तिन्ही जिल्ह्यातील कार्यरत असलेल्या एकूण ४० स्थानिक स्वराज्य संस्थेतील ९७७ पात्र मतदार, मतपत्रिकेद्वारे आपले मतदान नोंदविणार असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी कळविले आहे.

# संजय गांधी व श्रावणबाळच्या लाभार्थ्यांना हयात प्रमाणपत्रासाठी ॲप सुविधा

**वर्धा जनमाध्यम :** केंद्र शासन पुरस्कृत योजनेतील लाभार्थ्यांना हयात प्रमाणपत्र मोबाईल ॲपद्वारे सादर करता यावे याकरीता बेनेफिसरी सत्यापण ॲप (BSA) ही ऑनलाईन प्रणाली विकसित केली आहे. याच धर्तीवर राज्य पुरस्कृत संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेतील लाभार्थ्यांना हयात प्रमाणपत्र सादर करण्यासाठी बेनेफिसरी सत्यापण ॲप वापर करुन डिजीटल हयात प्रमाणपत्र सादर करण्यास मान्यता दिली आहे. त्यामुळे देवळी तालुक्यातील लाभार्थ्यांनी या ॲपचा वापर करुन हयात प्रमाणपत्र सादर करावे, असे अवाहन देवळीचे तहसिलदार समर्थ क्षिरसागर यांनी केले आहे.

राज्य पुरस्कृत संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य योजनेतील वृध्द, विधवा, घटस्फोटीत महिला, परित्यक्त्या, अनाथ, अंपग, दुर्धर आजाराने ग्रस्त व्यक्ती इत्यादी लाभार्थ्यांना हयात प्रमाणपत्र सादर करावे लागतात. बेनेफिसियरी सत्यापण ॲपमुळे लाभार्थ्यांना वेळे हयात प्रमाणपत्र सादर करणे सोईचे होणार आहे.

# कृषी विभागाविरोधात 'भीक मागो' आंदोलन

## लाचखोरीच्या आरोपांनी कारंज्यात खळबळ; प्रहारचा प्रशासनाला इशारा

**कारंजा (घा.) जनमाध्यम :** पेट्रोल, डिझेल, खते, बियाणे आणि शेती उपयोगी साहित्याच्या वाढत्या दरांनी आधीच शेतकरी आर्थिक संकटात सापडला असताना, आता कृषी विभागात प्रत्येक कामासाठी शेतकऱ्यांकडून पैशांची मागणी केली जात असल्याचा गंभीर आरोप करत प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने सोमवारी कारंजा येथे 'भीक मागो' आंदोलन करण्यात आले. जयकुमार बेलखडे यांच्या नेतृत्वात झालेल्या या आंदोलनाने कृषी विभागातील कथित भ्रष्टाचाराचा मुद्दा ऐरणीवर आला आहे.

शेतकऱ्यांची विदारक अवस्था शासन आणि प्रशासनासमोर मांडण्यासाठी आंदोलनकर्त्यांनी अंगावर फाटके कपडे परिधान केले होते. हातात कटोरे आणि गळ्यात टापरे बांधून त्यांनी कृषी विभागाविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. प्रहारच्या कार्यकर्त्यांनी शहरातून मोर्चा काढत थेट कृषी विभागाच्या कार्यालयावर धडक दिली.

यावेळी आंदोलनकर्त्यांनी कृषी विभागातील अधिकारी आणि कर्मचारी शेतकऱ्यांची अडवणूक करून प्रत्येक कामासाठी लाच मागत असल्याचा थेट आरोप केला. शेतकऱ्यांकडून पैसे उकळणाऱ्या संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांना तात्काळ निलंबित करण्यात यावे, अशी मागणीही आंदोलकांनी केली.

शेतकऱ्यांवर अन्याय सहन केला जाणार नाही. सत्ता बाजूला ठेवूनही प्रहार रस्त्यावर उतरेल, असा सज्जड इशारा जयकुमार बेलखडे यांनी प्रशासनाला दिला. आंदोलनामुळे काही काळ कृषी विभाग परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

# वर्ध्यात पोलिसांचा 'ऑल आऊट' धडाका

## सराईत गुन्हेगारांची झोप उडाली; ६४ गुन्हे दाखल, १७ लाखांचा मुद्देमाल जप्त

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यात डोकेवर काढणाऱ्या गुन्हेगारीला चिरडण्यासाठी वर्धा पोलिसांनी 'ऑपरेशन ऑल आऊट'च्या माध्यमातून अक्षरशः धडाकेबाज कारवाईचा सपाटा लावला. पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात आलेल्या या विशेष मोहिमेत सराईत गुन्हेगारांवर पोलिसांनी थेट वज्राप्रहार करत तब्बल ६४ गुन्हे दाखल केले. एवढेच नव्हे तर १७ लाख ३० हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून गुन्हेगारीच्या अड्ड्यांनाच हादरा दिला.

१६ मे रोजी जिल्हाभर एकाच वेळी राबविण्यात आलेल्या या मोहिमेत ५६ पोलिस अधिकारी आणि ३७९ अंमलदार असे तब्बल ४३५ पोलिस कर्मचारी मैदानात उतरले होते. अवैध दारू विक्री, अंमली पदार्थांचा काळाबाजार, शरीराविरुद्धचे गुन्हे, मालमत्तेवरील हल्ले आणि बेकायदेशीर हत्यार बाळगणाऱ्यांवर पोलिसांनी चहुबाजूंनी कोंडीत पकडत जोरदार कारवाई केली. अवैध दारू विक्री करणाऱ्या २४० संशयितांची पोलिसांनी झाडाझडती घेतली. त्यात ६६ आरोपींकडे देशी, विदेशी आणि गावठी दारूचा साठा आढळून आला. परिणामी ६४ गुन्हे दाखल करण्यात आले. अंमली पदार्थांच्या व्यवहारात सहभागी असलेल्या ४५ आरोपींची तपासणी करण्यात आली. त्यापैकी ३५ आरोपी घरातच सापडले, तर एका आरोपीविरुद्ध एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा नोंदविण्यात आला. विशेष म्हणजे, अनेक दिवसांपासून पोलिसांना गुंगारा देणाऱ्या सात पाहिजे आरोपी आणि सात फरार आरोपींना या मोहिमेदरम्यान शोधण्यात पोलिसांना यश आले. दोन जणांवर जुगार कायद्यान्वये तर एका आरोपीवर हत्यार कायद्यान्वये कारवाई करण्यात आली.

### मद्यधुंद वाहनचालकांवर पोलिसांची कारवाई

'ऑपरेशन ऑल आऊट' अंतर्गत वाहतूक शाखेनेही जोरदार मोहीम राबवली. जिल्ह्यात ठिकठिकाणी नाकेबंदी करून वाहनांची तपासणी करण्यात आली. यावेळी ११ वाहन चालक दारूच्या नशेत वाहन चालविताना आढळून आले. त्यांच्याविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले. शिवाय वाहतूक नियम धाब्यावर बसविणाऱ्या ३५४ वाहनधारकांवर विविध कलमान्वये कारवाई करून पोलिसांनी बेफाम वाहनचालकांनाही चांगलाच दणका दिला.

# ऐन दुपारी महावितरण कार्यालयात अग्नितांडव

## अग्निशमन दल उशिरा; कर्मचाऱ्यांच्या धाडसाने सोलर प्लांट वाचला

**कारंजा (घाडगे) जनमाध्यम :** शहरातील महावितरण कार्यालय परिसरात सोमवारी दुपारी लागलेल्या भीषण आगीने काही काळासाठी संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. भर दुपारी अचानक लागलेल्या या आगीने काही क्षणांतच रौद्ररूप धारण केले आणि महावितरणच्या कोट्यवधी रुपयांच्या सौर ऊर्जा प्रकल्पावर संकट ओढवले. मात्र, अग्निशमन दल वेळेवर न पोहोचल्याने परिस्थिती अधिक गंभीर बनली असताना महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी जीवाची पर्वा न करता आगीत उतरून मोठा अनर्थ टाळला.

माहितीनुसार, दुपारी सुमारे तीन वाजताच्या सुमारास महावितरण कार्यालय परिसरातील मोकळ्या जागेत अचानक आग लागली. कडक उन्हासह सुरू असलेल्या जोरदार वाऱ्यामुळे आगीने काही क्षणांतच मोठा फैलाव घेतला. कार्यालयासमोरच उभारण्यात आलेला सोलर प्लांट धोक्याच्या विळख्यात येऊ लागल्याने कर्मचारी आणि नागरिकांची धावपळ उडाली. आग थेट सोलर प्लांटकडे सरकत असल्याने संपूर्ण वीज यंत्रणा धोक्यात येण्याची भीती निर्माण झाली होती.

# मध्यप्रदेशातून आरोपीच्या मुसक्या आवळल्या

## चोरीप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेची धडाकेबाज कारवाई; १.०८ लाखांचा मुद्देमाल

**वर्धा जनमाध्यम :** हिंगणघाट पोलिस ठाण्यांतर्गत दाखल झालेल्या चोरीच्या गुन्ह्याचा छडा लावत स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मध्यप्रदेशातील देवास येथून आरोपीला अटक केली. या कारवाईत पोलिसांनी १ लाख ८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात यश मिळविले. संजय सिंह उर्फ बुद्धेश्वर सिंह करवल (वय ४०, रा. राजगड, ता. मढीयान, जि. मिर्झापूर, उत्तरप्रदेश) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.



हिंगणघाट परिसरातून पैशांनी भरलेली पिशवी अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची तक्रार प्राप्त झाल्यानंतर पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. या प्रकरणाचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेकडून सुरू करण्यात आला. तांत्रिक विश्लेषण आणि सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पोलिसांनी आरोपीची ओळख पटविली. आरोपी संजय सिंह हा गुन्हा करून जिल्ह्याबाहेर पसार झाल्याची माहिती मिळताच पोलिसांचे विशेष पथक मध्यप्रदेशातील छिंदवाडा येथे रवाना झाले.

दरम्यान आरोपी रेल्वेने देवास येथे गेल्याची माहिती मिळाल्यावर पोलिसांनी देवास रेल्वे स्थानक परिसरात सापळा रचला. अखेर आरोपीला ताब्यात घेण्यात आले. चौकशीदरम्यान त्याने हिंगणघाट तसेच सेलू तालुक्यातील हिंगणी येथील चोरीच्या गुन्ह्यांची कबुली दिली. आरोपीकडून पोलिसांनी १.०८ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

ही कारवाई पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे आणि पोलिस निरीक्षक विनोद चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक आशिषसिंग ठाकूर, पोलिस उपनिरीक्षक ओमप्रकाश नागापुरे, अमरदीप पाटील, पवन पन्नासे, आशिष महेशगौरी, दीपक जंगले, रितेश कुन्हाडकर, मंगेश आदे, शुभम राऊत, सुगम चौधरी आणि अंकित जिभे यांनी पार पाडली.

# 'अच्छे दिन'च्या नावाखाली जनतेची लूट

## पुलगावात युवक काँग्रेसचा 'झालमुंरी'ने मोदी सरकारवर हल्लाबोल

**पुलगाव जनमाध्यम :** 'मोदी है तो मुमकिन है' म्हणत सत्तेत आलेल्या सरकारने आता सर्वसामान्यांच्या तोंडचा घास हिसकावून घेतला असून, गरीबांच्या लेकीच्या लग्नातील सोन्याचे स्वप्नही उद्ध्वस्त केले आहे, असा थेट आरोप करत वर्धा जिल्हा युवक काँग्रेसने पुलगावात आक्रमक आंदोलन छेडले. वाढत्या महागाईविरोधात आणि केंद्र-राज्य सरकारच्या आर्थिक धोरणांच्या निषेधार्थ सराफा व्यापाऱ्यांना 'झालमुंरी' वाटत युवक काँग्रेसने सरकारच्या कारभारावर सडकून टीका केली.



महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे अध्यक्ष शिवराज मोरे यांच्या आदेशानुसार अमित ददगाल यांच्या नेतृत्वात हे आंदोलन पार पडले. पुलगावच्या सराफा बाजारात झालेल्या या आंदोलनाने परिसरात चांगलीच खळबळ उडाली. यावेळी युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी मोदी सरकारवर जनतेला अच्छे दिनांचे स्वप्न दाखवून महागाईच्या खाईत ढकलले' असा घणाघात केला. पेट्रोल, डिझेल, खाद्यपदार्थ आणि सोन्याचे दर दिवसेंदिवस वाढत असताना सरकार मात्र निवडणुकांवर कोट्यवधींची उधळपट्टी करत असल्याचा आरोप करण्यात आला.

खेड्यातील गरीब बाप आपल्या लेकीच्या लग्नात एक छोटासा सोन्याचा दागिना द्यायचा विचार करतो; पण आज सोन्याचे भाव इतके वाढले की गरीबांच्या आवाक्याबाहेर सर्व काही गेले. हीच का तुमची विकासाची व्याख्या असा प्रश्न आंदोलनकर्त्यांनी केला.

सराफा व्यापाऱ्यांनाही या आंदोलनात सहभागी करून घेत युवक काँग्रेसने सरकारच्या धोरणांविरोधात व्यापारी वर्गातील असंतोषही पुढे आणला. ग्राहकांची क्रयशक्ती संपली असून बाजारपेठा ओस पडल्याची व्यथा व्यापाऱ्यांनी व्यक्त केली. एकेकाळी कोट्यवधींची उलाढाल करणाऱ्या बाजारात आज 'झालमुंरी' वाटण्याची वेळ आली, अशी बोचरी प्रतिक्रिया यावेळी व्यक्त करण्यात आली.

आंदोलनात महागाई हटवा, गरिबांच्या स्वप्नांची हत्या बंद करा, जनतेचा पैसा निवडणुकांत उधळणे बंद करा अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. सरकारने महागाईवर तातडीने नियंत्रण आणले नाही, तर आगामी काळात आणखी तीव्र जनआंदोलन छेडले जाईल, असा इशाराही युवक काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी दिला.

# तीर्थक्षेत्र विकासकामे दर्जेदार सुविधांसह कालमर्यादेत पूर्ण करावीत -मुख्यमंत्री

## महाराष्ट्रातील विविध तीर्थक्षेत्रे, गडकिल्ले आणि ऐतिहासिक स्थळांच्या विकासासाठी ९९३ कोटींच्या कामांना मान्यता

**मुंबई जनमाध्यम :** राज्यातील तीर्थक्षेत्रे, गडकिल्ले आणि ऐतिहासिक वारसा स्थळांच्या संवर्धनाला गती देत सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. विविध तीर्थक्षेत्र विकास आराखड्यांतर्गत सहा महत्त्वाच्या प्रकल्पांसाठी तब्बल ९९३.७२ कोटी रुपयांच्या निधीस मंजुरी देण्यात आली. ही कामे दर्जेदार पद्धतीने आणि निश्चित कालमर्यादेत पूर्ण करावीत, तसेच भाविक व पर्यटकांसाठी अत्याधुनिक सुविधा उभाराव्यात, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या शिखर समितीच्या बैठकीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, वनमंत्री गणेश नाईक, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

पुणे जिल्ह्यातील श्री क्षेत्र भीमाशंकरच्या सर्वांगीण विकासासाठी १७२.२२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. बसस्थानक, पार्किंग, रस्ते रुंदीकरण, पादचारी मार्ग, कव्हर्ड कॉरिडॉर, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प तसेच रोपवे सुविधा उभारण्याचा आराखडा मंजूर करण्यात आला असून मे २०२७ पर्यंत कामे पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. देहू येथील संत तुकाराम महाराज जन्मस्थान, वैकुंठगमन मंदिर आणि भंडारा डोंगर परिसराच्या संवर्धनासाठी ४१.७१ कोटी रुपयांचा आराखडा मंजूर झाला आहे. यात स्वच्छता, पिण्याचे पाणी, पार्किंग, निवास व्यवस्था आणि माहिती केंद्र उभारण्यावर भर देण्यात आला आहे.

सातारा जिल्ह्यातील ऐतिहासिक अजिंक्यतारा किल्ल्याच्या जतन व संवर्धनासाठी १३४.८० कोटी रुपयांची मंजुरी देण्यात आली. बुरुज संवर्धन, लँडस्केपिंग, प्रेक्षक गॅलरी, लटकता पूल आणि पर्यटन सुविधा उभारण्यात येणार आहेत. संगम माहुली येथील महाराणी ताराबाई, महाराणी येसूबाई आणि छत्रपती शाहू महाराज यांच्या समाधीस्थळांच्या संवर्धनासाठीही १३३ कोटी रुपयांचा प्रकल्प मंजूर करण्यात आला आहे.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग मंदिर विकासासाठी २१०.४५ कोटी रुपयांचा सुधारित आराखडा मंजूर करण्यात आला असून भक्तनिवास, प्रतीक्षागृह, शॉपिंग कॉम्प्लेक्स आणि बायपास रस्त्यांची कामे हाती घेतली जाणार आहेत.

तर बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग मंदिर परिसर विकासासाठी ३०१.५४ कोटी रुपयांचा अतिरिक्त आराखडा मंजूर करण्यात आला आहे. डिजिटल रांग व्यवस्था, योग केंद्र, घाट विकास, सायकल ट्रॅक, भव्य शिवमूर्ती, वैदिक संग्रहालय आणि लेझर लाईट अँड साऊंड शो यांसारख्या सुविधा उभारण्यात येणार आहेत. राज्यातील धार्मिक पर्यटनाला चालना देतानाच भाविकांसाठी आधुनिक सुविधा उपलब्ध करण्यावर सरकारचा भर असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

# नाश्ता करून घराबाहेर पडली अन् परतलीच नाही

## -कारडा गावावर शोककळा; आईने चिमुकल्यासह तलावात घेतली अखेरची झेप

**समुद्रपूर जनमाध्यम :** तालुक्यातील कारडा गाव सोमवारी एका हृदय पिळवटून टाकणाऱ्या घटनेने सुन्न झाले. संसारातील तणाव आणि मानसिक दबावाला कंटाळून एका विवाहितेने आपल्या तीन वर्षांच्या निष्पाप मुलाला कवेत घेत तलावात उडी मारून जीवन संपविल्याची दुर्दैवी घटना घडली. शीतल जगदीश कुंभेकर (वय ३०) व तिचा तीन वर्षीय मुलगा हिमांशू यांच्या मृत्यूने गावात हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सोमवारी सकाळी शीतल यांनी नेहमीप्रमाणे घरातील सर्वांसाठी नाश्ता तयार केला. कुणालाही संशय येऊ न देता त्या आपल्या मुलगा हिमांशूला घेऊन घराबाहेर पडल्या. मात्र, बराच वेळ उलटूनही त्या घरी परत न आल्याने कुटुंबीयांनी शोधाशोध सुरू केली. गावात चौकशी करण्यात आली, नातेवाईकांशी संपर्क साधण्यात आला; पण शीतल आणि हिमांशू यांचा काहीच मागमूस लागला नाही.

दरम्यान, दुपारी सुमारास घराजवळील तलावात दोन मृतदेह तरंगताना दिसल्याने एकच खळबळ उडाली.

ग्रामस्थांनी तत्काळ पोलिसांना माहिती दिली. ठाणेदार रवींद्र रेवतकर यांच्या नेतृत्वात पोलिस पथक घटनास्थळी दाखल झाले. ग्रामस्थांच्या मदतीने आई व मुलाचे मृतदेह तलावातून बाहेर काढण्यात आले. पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालय, समुद्रपूर येथे पाठविण्यात आले.

# नावात बदल

माझे पूर्वी JYOTI SANJAY DATE असे नाव होते. माझ्या आधार पॅन कार्ड वरील SUNITA SANJAY DATE हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे. पत्ता :- पांढरकवडा पोस्ट येळाकेळी जिल्हा वर्धा ४४२००१

# जनमाध्यम

e paper - www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठीत सवय

■ मंगळवार १९ मे २०२६


# पंतप्रधानांना मिळाला नार्वेचा सर्वोच्च सन्मान

## जगातील ३२ वा मानाचा पुरस्कार प्रदान



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** पंतप्रधाननरेंद्र मोदी यांनी आपल्या नावावर आणखी एका महत्त्वपूर्ण कामगिरीची भर घातली आहे. युरोपीय देश नार्वेने पंतप्रधान मोदींना आपला सर्वोच्च सन्मान, 'ग्रँड क्रास ऑफ द रायल नार्वेजियन ऑर्डर ऑफ मेरिट' प्रदान केला आहे. पंतप्रधान मोदींना मिळालेला हा ३२वा सर्वोच्च आंतरराष्ट्रीय सन्मान असून, तो आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचा वाढता प्रभाव दर्शवतो. सोमवारी मोदी नार्वेमध्ये दाखल झाले, जिथे ते तिस-या भारत-नार्डिक शिखर परिषदेत आणि अनेक द्विपक्षीय बैठकांमध्ये सहभागी होत आहेत. ओस्लोमध्ये आगमन झाल्यावर नार्वे सरकारने त्यांना हा प्रतिष्ठित सन्मान प्रदान केला. सरकारने म्हटले आहे की, 'ग्रँड क्रा' हा 'रायल ऑर्डर ऑफ मेरिट'चा सर्वोच्च दर्जा आहे, जो केवळ असाधारण योगदान देणा-या व्यक्तींनाच प्रदान केला जातो.या दौ-याचा सर्वात महत्त्वपूर्ण आणि लक्षणीय पैलू म्हणजे ४३ वर्षांनंतर एका भारतीय पंतप्रधानांनी नार्वेला भेट दिली आहे. या बहुप्रतिक्षित दौ-यामुळे नार्वेमध्ये राहणा-या भारतीय समुदायामध्ये उत्साह आणि आनंदाचे वातावरण आहे. या सन्मानानंतर पंतप्रधान मोदींनी 'एक्स' या सोशल मीडिया प्लॅटफार्मवर आपला आनंद व्यक्त केला. त्यांनी लिहिले की, 'ग्रँड क्रास ऑफ द रायल नार्वेजियन ऑर्डर ऑफ मेरिट' हा पुरस्कार स्वीकारताना मला सन्मानित झाल्यासारखे वाटत आहे. हा सन्मान भारताच्या जनतेला आणि भारत-नार्वेच्या दृढ मैत्रीला समर्पित आहे. हे जागतिक प्रगतीसाठी असलेल्या आपल्या सामायिक वचनबद्धतेचे द्योतक आहे.पंतप्रधान मोदी सध्या पाच देशांच्या अत्यंत महत्त्वाच्या परदेश दौ-यावर आहेत. या दौ-याची सुरुवात शुक्रवारी संयुक्त अरब अमिराती येथून झाली. तो देश सध्या इराण, अमेरिका आणि इस्त्रायल यांच्यात सुरू असलेल्या युद्धामुळे निर्माण झालेल्या तणावाचा सामना करत आहे. यानंतर, नेदरलँड्समार्गे पंतप्रधान मोदी सोमवारी तिस-या भारत-नार्डिक शिखर परिषदेसाठी आणि द्विपक्षीय बैठकीसाठी नार्वेमध्ये दाखल झाले, जिथे त्यांचे ऐतिहासिक स्वागत करण्यात आले. नार्वेनंतर ते स्वीडन आणि अखेरीस इटलीला भेट देणार आहेत.

# भारतात प्रत्येक नागरिकाला अभिव्यक्ती स्वातंत्र्याची हमी



ॲमस्टरडॅम : देशातील प्रसारमाध्यमांचे स्वातंर्त्य आणि अल्पसंख्याकाच्या हक्कांमध्ये घसरण झाल्याचे आरोप भारताने रविवारी पूर्णपणे फेटाळून लावले. भारत हा एक जिवंत लोकशाही असलेला देश आहे. येथे प्रत्येक नागरिकाला अभिव्यक्ती स्वातंर्त्याची हमी आहे असे भारताने म्हटले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी दोन दिवसीय नेदरलँड दौ-यावर होते. त्यावेळी तेथील पंतप्रधान राब जेटेन यांनी, भारतातील कथित परिस्थितीबद्दल चिंता व्यक्त केली होती. यासंदर्भात पत्रकारांनी प्रश्न विचारला असता, परराष्ट्र मंत्रालयाचे (पश्चिम) सचिव सीबी जार्ज यांनी स्पष्ट आणि सडेतोड उत्तर दिले.

प्रसारमाध्यमांशी बोलताना सीबी जार्ज म्हणाले, हा प्रश्न विचारणा-याच्या समजेच्या आभावामुळे आम्हाला उत्तर द्यावे लागत आहे. भारत हा १.४ अब्ज लोकसंख्या असलेला देश आहे. या देशाची संस्कृती ५ हजार वर्षं जुनी आहे. येथे प्रचंड विविधता आहे. जगात असा एकही देश नाही, जेथे हिंदू, बौद्ध, जैन आणि शीख धर्मांसारखे अनेक धर्म उदयाला आले असतील. ते आजही येथे वाढत आहेत. एवढेच नाही तर, भारत कदाचित मोजक्या देशांपैकी एक आहे, जेथे ज्यू समाजाला कधीही छळाला सामोरे जावे लागले नाही, असेही जार्ज यांनी सांगितले. नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकांचा हवाला देत जार्ज म्हणाले, भारताने लोकशाही मूल्यांशी कधीही तडजोड केली नाही. मात्र तरीही आर्थिक यश मिळवले. आम्ही गरिबीवर मात करण्यासाठी हिंसेचा नव्हे तर लोकशाहीचा मार्ग निवडला. आम्ही जगाच्या लोकसंख्येचा एक षष्ठांश भाग आहोत. मात्र, जगातील समस्यांचा भाग नाही. हेच भारताचे सौंदर्य आहे. अल्पसंख्याक समाजासंदर्भात बोलताना जार्ज म्हणाले, भारतात प्रत्येक अल्पसंख्याक समुदाय सुरक्षित आणि आनंदाने राहतो. स्वातंर्त्य मिळाले तेव्हा देशात अल्पसंख्यकांची लोकसंख्या ११ टक्के होती, जी आज २० टक्के पार गेली आहे. दरम्यान, पंतप्रधानांच्या दौ-यात, पंतप्रधान मोदी आणि डच पंतप्रधान रीब जेटेन यांच्यात धोरणात्मक भागीदारी वाढवण्यावर आणि विविध करारांवर स्वाक्ष-या झाल्या. तसेच, भारतासाठी नेदरलँड हा एक अत्यंत महत्त्वाचा भागीदार आहे, असे पंतप्रधान मोदी यांनी म्हटले आहे.

# अजब पोलीसांचा गजब तर्क!

# गाडीत डिझेल नाही, हरवलेल्या मुलीला शोधता येणार नाही




**नागपूर/प्रतिनिधी-** उपराजधानी नागपूरमधील पाचपावली पोलीस ठाण्याच्या हद्दीतून २१ वर्षांची तरुणी बेपत्ता झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. मात्र त्या पेक्षा ही धक्कादायक घटना पुढे घडली. या प्रकरणात पोलिसांच्या असंवेदनशील कार्यपद्धतीमुळे नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. मुलगी बेपत्ता झाल्यानंतर हवालदील झालेल्या कुटुंबीयांनी तातडीने पाचपावली पोलीस ठाणे गाठले होते. मात्र, मुलीचा शोध घेण्याऐवजी पोलिसांकडून 'आमच्या गाडीत डिझेल नाही, त्यामुळे शोधासाठी जाता येत नाही,' असे उत्तर देण्यात आल्याचा गंभीर आरोप पीडित कुटुंबाने केला आहे. एकीकडे महिला आणि मुलींच्या सुरक्षेसाठी शासन स्तरावर मोठ्या घोषणा केल्या जात आहेत. प्रत्यक्षात मात्र यंत्रणेचा सावळागोंधळ उघड झाला आहे. मुलीच्या नातेवाईकांनी दिलेल्या माहितीनुसार, बेपत्ता झाल्याची घटना घडल्यानंतरचा प्रत्येक क्षण अत्यंत महत्त्वाचा असतो. अशा संवेदनशील परिस्थितीत पोलिसांकडून तातडीने पावले उचलणे अपेक्षित होते. मात्र, पोलिसांनी केवळ गाडीत इंधन नसल्याचे तांत्रिक कारण पुढे केले नाही, तर 'मुलगी २१ वर्षांची आहे, ती स्वतःचे निर्णय घेउ शकते, तिला जिथे जायचे असेल तिथे जाउ शकते,' असे बेजबाबदार वक्तव्य करून प्रकरणाचे गांभीर्य कमी करण्याचा प्रयत्न केला.या घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी पोलीस प्रशासनाविरोधात आक्रमक पवित्रा घेतला आहे. 'हा केवळ एखाद्या कर्मचा-याचा निष्काळजीपणा नसून, संपूर्ण सुरक्षा यंत्रणेचे अपयश आहे,' अशी संतप्त प्रतिक्रिया नातेवाईकांनी दिली आहे. जर पोलिसांकडे गस्त घालण्यासाठी आणि तपासासाठी मूलभूत सुविधाच नसतील, तर सर्वसामान्यांनी सुरक्षेसाठी कोणाकडे दाद मागायची, असा थेट सवाल आता उपस्थित केला जात आहे. या प्रकरणी वरिष्ठ पोलीस अधिकारी काय कारवाई करतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.दरम्यान कुटुंबीय आणि नागरिक आक्रमक झाले. त्यांनी पैसे गोळा केले. ते पैसे त्यांनी पोलीसांना दिले. जर तुमच्याकडे डिझेलला पैसे नसतील तर हे पैसे घ्या आणि मुलीला शोधा असं नागरिकांनी सांगितलं. या घटनेनंतर पोलीसांची एकच धावपळ उडाली. शेवटी या बेपत्ता झालेल्या मुलीला शोधण्यात पोलीसांना यश आलं आहे. असं नागपूर पोलीसांनी सांगितलं आहे. प्रेम प्रकरणातून ती एका मुलासोबत गेली होती असं ही स्पष्ट करण्यात आलं आहे. मात्र इंधन टंचाईचं भयाण वास्तव या निमित्ताने समोर आलं आहे.



# व्ही. डी. सतीशन केरळचे मुख्यमंत्री

**हैद्राबाद/वृत्तसंस्था-** काँग्रेस नेते व्ही. डी. सतीशन यांनी केरळचे १३वे मुख्यमंत्री म्हणून पदभार स्वीकारला. राज्यपाल राजेंद्र विश्वनाथ अर्लेकर यांनी त्यांना आणि त्यांच्या संपूर्ण मंत्रिमंडळाला (२० मंत्री) पदाची शपथ दिली. ६१ वर्षांच्या कालावधीनंतर प्रथमच असा सोहळा पार पडला. यापूर्वी, राज्याचे तिसरे काँग्रेस मुख्यमंत्री आर. शंकर यांनी १९६२ मध्ये त्यांच्या संपूर्ण मंत्रिमंडळासह शपथ घेतली होती, परंतु १९६४ मध्ये अविश्वास ठरावानंतर त्यांचे सरकार कोसळले होते. राहुल गांधी आणि प्रियांका गांधी यांच्या व्यतिरिक्त, माजी मुख्यमंत्री पी. विजयन, भाजप नेते राजीव चंद्रशेखर आणि काँग्रेसशासित सर्व राज्यांचे मुख्यमंत्रीही या सोहळ्याला उपस्थित होते.

१९६२ मध्ये संपूर्ण मंत्रिमंडळाने शपथ घेतली होती. यापूर्वी, १९६२ मध्ये मुख्यमंत्री आर. शंकर यांनी त्यांच्या संपूर्ण मंत्रिमंडळासह शपथ घेतली होती. आज, ६४ वर्षांनंतर, केरळमधील सरकारमधील सर्व मंत्र्यांनी एकत्र शपथ घेण्याची ही दुसरी वेळ आहे. दरम्यान, शपथ घेतल्यानंतर मुख्यमंत्री सतीशन यांनी आपली पहिली मंत्रिमंडळ बैठक घेतली. या बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. केरळ मंत्रिमंडळात पहिल्यांदाच १४ आमदारांनी मंत्री म्हणून शपथ घेतली. यामध्ये सी. पी. जान आणि एन. शमसुद्दीन, के. एम. शाजी, पी. के. बशीर आणि व्ही. ई. अब्दुल गफूर, पी. सी. विष्णूनाथ, रोझी एम. जान, बिंदू कृष्णा, टी. सिद्दिकी, के. ए. तुळसी आणि ओ. जे. जनिश यांचा समावेश आहे. काँग्रेसने सभापती आणि उपाध्यक्ष ही पदे आपल्याकडे ठेवली आहेत. थिरुवनचूर राधाकृष्णन यांची सभापती आणि शनिमोल उस्मान यांची उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. केरळ विधानसभेत आमदारांच्या शपथविधीनंतर २२ मे रोजी सभापती निवडले जातील. राज्यपालांचे धोरणाभिषेक भाषण २९ मे रोजी होणार असून, राज्याचा अर्थसंकल्प ५ जूनपर्यंत सादर होण्याची शक्यता आहे.

# एसटी प्रवास महागणार

## परिवहन मंत्र्यांचे दरवाढीचे संकेत डिझेल दरवाढीमुळे महामंडळावर 124 कोटींचा अतिरिक्त आर्थिक भार



**मुंबई /प्रतिनिधी-** पेट्रोलियम कंपन्यांनी पेट्रोल आणि डिझेलच्या दरात वाढ केल्याने महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ अर्थात एसटीचे आर्थिक गणित बिघडले असून, दिवसाला ३३ लाख ७० हजार रुपयांचा अतिरिक्त बोजा पडत आहे. संभाव्य आर्थिक नुकसान भरून काढण्यासाठी एसटी महामंडळासमोर प्रवाशी भाडेवाढीशिवाय पर्याय राहिलेला नाही असे सांगत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दरवाढीची संकेत दिले आहेत. यामुळे एसटीचा प्रवासही महागणार आहे.आखाती युद्धामुळे आंतरराष्ट्रीय बाजारातले तेलाचे दर प्रचंड मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. पेट्रोल आणि डिझेलच्या दरात प्रति लिटर ३ रुपयांनी वाढ करण्यात आली आहे. या इंधन दरवाढीचा एसटीवर होणा-या परिणामाचा आढावा घेण्यासाठी सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रालयात बैठक झाली. डिझेलच्या दरात झालेल्या वाढीमुळे महामंडळावर वार्षिक सुमारे १२४ कोटी रुपयांचा अतिरिक्तआर्थिक बोजा पडणार असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.एसटी महामंडळाला दररोज सरासरी १०.८७ लाख लिटर डिझेलची आवश्यकता भासते. सध्या इंडियन ऑईल क?पोरेशनमार्फत डिझेलचा पुरवठा केला जात असून मागील आठवड्यात प्रति लिटर ८८.२१ रुपये असलेला दर आता वाढून ९१.३१ रुपये झाला आहे. या दरवाढीमुळे महामंडळाला दररोज अंदाजे ३३ लाख ७० हजार रुपयांचा अतिरिक्त खर्च सहन करावा लागत आहे. मासिक स्तरावर हा भार सुमारे १० कोटी तर वार्षिक सुमारे १२४ कोटी रुपयांपर्यंत जाणार असल्याची माहिती सरनाईक यांनी दिली.एसटी महामंडळ सध्या आर्थिक अडचणींचा सामना करीत असून एप्रिल २०२६ मध्ये महामंडळाला सुमारे ७६ कोटी रुपयांचा तोटा सहन करावा लागला आहे. वाढत्या इंधन खर्चाचा थेट परिणाम महामंडळाच्या आर्थिक स्थितीवर होत असून, भविष्यात प्रवासी भाडेवाढीचा निर्णय घेणे आवश्यक ठरू शकते, असेही सरनाईक म्हणाले. मात्र कोणतीही भाडेवाढ तातडीने लागू करण्यात येणार नाही. इंधन दरवाढीच्या अनुषंगाने भाडेवाढीचा प्रस्ताव राज्य परिवहन प्राधिकरणाकडे मान्यतेसाठी सादर करण्यात येणार आहे.संबंधित प्राधिकरणाची मान्यता मिळाल्यानंतरच अंतिम निर्णय घेण्यात येईल, असे सरनाईक यांनी सांगितले. एसटीने प्रवास करणा-या सर्वसामान्य प्रवाशांवर कमीत कमी आर्थिक भार पडावा यासाठी सरकार विविध पर्यायांचा विचार करीत असून, खर्च नियंत्रण तसेच महसूलवाढीच्या उपाययोजनांवर विशेष भर देण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले.

# औषधी विक्रेत्यांचा 20 मे रोजी देशव्यापी बंद

**मुंबई/प्रतिनिधी-** ऑल इंडिया केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनने बेकायदेशीर ऑनलाईन औषध विक्रीच्या विरोधात बुधवार, दि. २० मे रोजी देशव्यापी बंदचे आवाहन केले आहे. औषध विक्री व्यवसाय हा औषधे आणि सौंदर्य प्रसाधने अधिनियमांतर्गत चालवला जातो. औषधांची ऑनलाईन विक्री करण्यासंदर्भात अधिनियमात कोणतीही तरतूद नाही. तरीही केंद्र सरकारने इंटरनेटच्या माध्यमातून ऑनलाईन औषध विक्रीबाबतची सूचना जरी केली होती. मात्र, त्या सूचनेचे अद्याप कायद्यात रूपांतर झालेले नसतानाही देशात बेकायदेशीर ऑनलाईन औषध विक्री सुरु आहे. यासंदर्भात दिल्ली उच्च न्यायालयात याचिका दाखल असून दिल्ली उच्च न्यायालयानेही ऑनलाईन औषध विक्रीस स्थगितीही दिली आहे. असे असतानाही सरकार औषधी विक्रेत्यांच्या मागणीकडे सातत्याने दुर्लक्ष करत आहे.सरकारने कोरोनाच्या काळात औषधांच्या होम डिलिव्हरी देण्याबाबत विशेष सूट दिली होती. कोरोना संपूनही बराच काळ उलटला तरी याबाबतची अधिसूचना रद्द करण्यात आलेली नाही.

# देशात 'एल निनो'चे संकट अधिक गडद

## कृषी संशोधन परिषदेचा इशारा खरीप हंगामाला फटका बसण्याची शक्यता

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** देशातील खरीप हंगामावर यंदा एल निनोचा मोठा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. भारतीय कृषी संशोधन परिषद(आयसीएआर) अंतर्गत करण्यात आलेल्या एका अभ्यासांतर्गत, एल निनोमुळे मान्सूनवर मोठ्या प्रमाणात परीणाम होणार आहे. त्यामुळे याचा प्रामुख्याने खरीप पिकांवर परीणाम होणार आहे. त्यामुळे हिंदुस्थानातील अनेक भागांमध्ये खरीप पिकांचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घटणार आहे. अभ्यासानुसार, एल निनोच्या काळात देशातील अनेक जिल्ह्यांमध्ये भात आणि मक्याच्या उत्पादनावर सर्वाधिक परिणाम दिसून आला



आहे. सोयाबीन, कापूस, डाळी आणि तेलबिया पिकांना फार मोठा फटका बसण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. एल निनोचा परिणाम आंध्र प्रदेश, बिहार, छत्तीसगड, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, झारखंड आणि ओडिशा यांसारख्या प्रमुख तांदूळ उत्पादक राज्यांमध्ये सर्वाधिक दिसून आला आहे. या अभ्यासात असेही आढळून आले की अशा प्रकारच्या हवामानविषयक घटना घडत असताना ३६ जिल्ह्यांमध्ये ज्वारी आणि बाजरीच्या उत्पादनात प्रत्येकी १० टक्क्यांहून अधिक घट झाली आहे. २०२३ मध्ये एल्सेव्हियर द्वारे प्रकाशित क्लायमेट सर्व्हिसेस या नियतकालिकातील या अभ्यासात २००२, २००४ आणि २००९ या तीन एल निनो वर्षांचा आढावा घेण्यात आला आहे. भारतीय हवामान विभागाने यंदा सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज वर्तवला आहे. एल निनोमुळे मान्सूनवर मोठ्या प्रमाणात परीणाम होणार असल्याने, शेतक-यांची चिंता वाढली आहे. खरीप हंगाम मोठ्या प्रमाणावर पावसावर अवलंबून असल्याने पावसातील कमतरता थेट शेती उत्पादनावर परिणाम करू शकते. कृषी तज्ज्ञांच्या मते, उत्पादन घटल्यास अन्नधान्यांच्या किमती वाढण्याची शक्यता आहे. त्यातच खतांच्या वाढत्या किमती आणि जागतिक तणावामुळे शेती क्षेत्रासमोर दुहेरी आव्हान निर्माण झाले आहे.

# जगातील 390 अधिक प्रदूषित शहरांपैकी 138 भारतात

## नेचर सिटीजचा अहवाल जारी, शहरांच्या यादीत नाशिकचा समावेश



**बंगळूरू /वृत्तसंस्था-** भारतीय शहरांची वाढ ही प्रदूषणकारी जीवाश्म इंधनाच्या (पेट्रोल-डिझेल आणि दगडी कोळसा) वापराशी आणि त्यातून निर्माण होणा-या प्रदूषणाशी निगडित राहिली आहे. परिणामी शहरांमध्ये मोठ्या प्रमाणावर प्रदूषण वाढत आहे. जगभरातील ३९० अधिक प्रदूषित आणि अधिक समृद्ध शहरांपैकी १३८ शहरे (किंवा सुमारे ३५.४ऽ) भारतात आहेत, असे भीषण वास्तव नेचर सिटीज या नियतकालिकात प्रकाशित रिपोर्टमध-ये मांडण-यात आले आहे. विशेष म्हणजे चीनमधील (७१९ शहरे ) आणि इतर अनेक देशांनी स्वच्छ शहरीकरणाच्या बाबतीत आघाडी घेतली असल्याचेही या अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे.नेचर सिटीज या नियतकालिकात प्रसिद्ध झालेल्या एका अभ्यासामध्ये जगभरातील ५,४३५ शहरांचा अभ्यास करण्यात आला. २०१९ ते २०२४ या काळातील उपग्रहांचा डेटा, नायट्रोजन डायऑक्साइडचे प्रमाण आणि शहरांचे एकूण आर्थिक उत्पन्न यांचे विश्लेषण करून हा अहवाल तयार करण्यात आला आहे.संशोधकांनी वाहने, उद्योग आणि औष्णिक वीज प्रकल्पांतून निघणा-या नायट्रोजन डायऑक्साइडच्या उपग्रहीय नोंदी घेतल्या. त्यांची तुलना शहरांच्या जीडीपीशी केली. त्यानुसार शहरांचे स्वच्छ आणि श्रीमंत, प्रदूषित आणि श्रीमंत, स्वच्छ आणि गरीब आणि प्रदूषित आणि गरीब अशी वर्गवारी करण-यात आली. अभ्यासात समाविष्ट केलेल्या ९०२ भारतीय शहरांपैकी १५.३ऽ शहरांमध्ये २०१९ ते २०२४ दरम्यान एनओ२ च्या पातळीत झालेली वाढ चिंताजनक आहे. प्रदूषित आणि श्रीमंत श्रेणीत भारताचा वाटा जगात सर्वाधिक (३५.४ऽ) आहे. संशोधकांच्या मते ही अपयशी शहरे नसून वेगाने वाढणारी शहरे आहेत, पण त्यांची वाढ प्रदूषणासोबत होत आहे. तसेच, भारत प्रदूषित आणि गरीब या सर्वात चिंताजनक श्रेणीतही दिसला, जिथे आर्थिक प्रगती खुंटली आहे पण प्रदूषण वाढत आहे. जगभरातील ३९० शहरे अधिक प्रदूषित आणि अधिक श्रीमंत या श्रेणीत आली आहेत. म्हणजेच, येथे आर्थिक विकास तर झाला, पण सोबतीने प्रदूषणही वाढले. विशेष म्हणजे, या ३९० शहरांपैकी १३८ शहरे (सुमारे ३५.४ऽ) एकट्या भारतात आहेत. दिल्ली, मुंबई आणि कोलकाता यांसारख्या महानगरांनी स्वच्छ विकास दाखवला असला, तरी भारतातील इतर अनेक शहरे अजूनही वाहतूक, उद्योग आणि वीज निर्मितीसाठी कोळसा, पेट्रोल-डिझेलवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहेत. धक्कादायक बाब म्हणजे, जगातील पहिल्या १० प्रदूषित आणि श्रीमंत शहरांच्या यादीत महाराष्ट्रातील नाशिक शहराचा समावेश आहे.

# कोणत्याही देशाच्या सीमा बंद करू नका

## डब्ल्यूएचओने दिली सूचना

**जीनिव्हा/वृत्तसंस्था- :** जागतिक आरोग्य संघटनेने (डब्ल्यूएचओ) म्हटले आहे की कोणत्याही देशाने आपल्या सीमा बंद करू नयेत किंवा प्रवास आणि व्यापारावर निर्बंध आणू नयेत. अशी पावले सामान्यतः भीतीपोटी उचलली जातात आणि त्यांचा विज्ञानाशी काहीही संबंध नसतो. अशा निर्णयांमुळे लोकांची आणि मालाची वाहतूक अनधिकृत किंवा अनौपचारिक सीमा तपासणी नाक्यांकडे वळते, जिथे कोणतीही देखरेख नसते. यामुळे हा आजार पसरण्याचा धोका उलट अधिक वाढतो. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे, या निर्बंधांमुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला नुकसान पोहोचू शकते. तसेच सुरक्षा आणि लाजिस्टिक्सच्या (वाहतूक व व्यवस्थापन) दृष्टीने मदतकार्यावरही याचा वाईट परिणाम होउ शकतो.जागतिक आरोग्य संघटनेने (डब्ल्यूएचओ) रविवार दि. १८ मे रोजी इबोलाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे सार्वजनिक आरोग्य आणीबाणी घोषित केली आहे. काँगो आणि युगांडामध्ये ३०० हून अधिक संशयित रुग्ण आणि ८८ मृत्यूंची नोंद झाल्यानंतर ही घोषणा करण्यात आली. एक्स (ट्विटर) वरील एका पोस्टमध्ये डब्ल्यूएचओने माहिती दिली की, काँगोची राजधानी किन्शासा येथेही प्रयोगशाळेत पुष्टी झालेला एक रुग्ण आढळला आहे. किन्शासा हे शहर या प्रादुर्भावाचे मुख्य केंद्र असलेल्या पूर्व प्रांत इटुरीपासून सुमारे १,००० किलोमीटर (६२० मैल) दूर आहे. यामुळे हा आजार आणखी पसरण्याची भीती व्यक्त केली जात आहे. भारतीय तज्ज्ञांच्या मते घाबरून जाण्याचे कोणतेही कारण नाही, कारण इबोला हा कोविड-१९ सारखा हवेतून किंवा वेगाने पसरत नाही. तरीही, खबरदारी बाळगणे आणि आजाराचे लवकरात लवकर निदान करणे अत्यंत आवश्यक आहे. आरोग्य मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, नॅशनल सेंटर फार डिसीज कंट्रोल (एनसीडीसी) या परिस्थितीवर बारीक लक्ष ठेवून आहे. २०१४ मध्ये पाझिटिव्ह आढळलेल्या एका आंतरराष्ट्रीय प्रवाशाचा अपवाद वगळता, भारतात आतापर्यंत इबोलाचा एकही रुग्ण आढळलेला नाही, असेही मंत्रालयाने स्पष्ट केले आहे.



# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## गडबडलेली आघाडी

काँग्रेसप्रमाणेच द्रमुकसोबत निवडणूक लढवणाऱ्या माकप, भाकप आणि व्हीसीके या पक्षांनी अलीकडेच विजय यांच्या 'टीव्हीके' या नव्या पक्षाला पाठिंबा देण्याचा घेतलेला निर्णय हा निव्वळ राजकीय संधिसाधूपणाचाच नमुना असल्याचे दिसून येते. आजच्या घडीला माकप आणि भाकप यांचे राष्ट्रीय राजकारणातील महत्त्व मोठ्या प्रमाणात कमी झाले असल्याने त्यांच्या द्रमुकपासून दूर जाण्याला फारसे राजकीय वजन नाही; मात्र काँग्रेसचे विभक्त होणे हे विरोधी पक्षांच्या 'इंडिया' आघाडीला आणखी कमकुवत करणारे ठरणार आहे. वस्तुस्थिती अशी आहे, की या आघाडीतून बाहेर पडणाऱ्या पक्षांची संख्या सातत्याने वाढत चालली आहे. सर्वप्रथम संयुक्त जनता दल वेगळा झाला, त्यानंतर आम आदमी पक्षानेही स्वतंत्र वाट धरली. आता काँग्रेसच या आघाडीपासून अंतर राखताना दिसत आहे. काँग्रेस नेत्यांच्या मते निवडणुकीपूर्वीपासूनच ते 'टीव्हीके' सोबत जाण्याचा विचार करत होते; परंतु असा कथित 'पूर्वविचार' निवडणुकीनंतर जुनी आघाडी मोडण्याचे समर्थन ठरू शकत नाही. भविष्यात 'इंडिया' आघाडी आणखी विस्कळीत होण्याची शक्यता यामुळेच गडद झाली आहे. कारण इतर अनेक राज्यांमध्ये काँग्रेसचे मित्रपक्षांशी वारंवार मतभेद होताना दिसतात. उदाहरणार्थ, महाराष्ट्रात उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेसोबतचे तणावपूर्ण संबंध हे उघड वास्तव आहे. याशिवाय अलीकडील विधानसभा निवडणुकांमध्ये पश्चिम बंगाल आणि केरळमध्ये या आघाडीतील घटक पक्ष एकमेकांविरोधात लढताना दिसले. त्या, त्या राज्यांमध्ये काँग्रेसने या पक्षांवर टीका करत तोंडसुखही घेतले. या सर्व घटनांवरून असा निष्कर्ष काढण्यास पुरेशी कारणे आहेत, की ज्या आघाडीचे नेतृत्व काँग्रेस स्वतःकडे ठेवू इच्छिते, त्याच आघाडीच्या भवितव्याबाबत ती फारशी गंभीर नाही. आधीच या आघाडीचे भविष्य उज्वल दिसत नव्हते. आता त्यावर अधिक काळोख दाटताना दिसत आहे. द्रमुकसोबत निवडणूक लढवून। सत्तेचा लाभ मिळवल्यानंतर काँग्रेसने एका झटक्यात 'टीव्हीके' सोबत जाण्याचा घेतलेला निर्णय तिच्या राजकीय स्वार्थी वृत्तीचेच दर्शन घडवतो. तमिळनाडूमध्ये काँग्रेस आणि द्रमुक यांची युती पाच दशकांहून अधिक काळ टिकून होती; परंतु राजकीय फायद्यासाठी काँग्रेसने या दीर्घकालीन संबंधांनाही कोणतेही महत्त्व दिले नाही. त्यामुळे आता या आघाडीतील इतर घटक पक्षही योग्य संधी मिळताच काँग्रेसपासून दूर जाण्यास मागेपुढे पाहणार नाहीत, अशी शक्यता बळावत आहे.कोणतीही राजकीय आघाडी ही किमान समान कार्यक्रमावर आधारित असते; मात्र 'इंडिया' आघाडीच्या बाबतीत हा कार्यक्रम कागदावरच राहिला आहे. वर वर पाहता सर्व पक्ष लोकशाही वाचवण्यासाठी एकत्र आल्याचे सांगत असले, तरी जमिनीवरची परिस्थिती मात्र पूर्णतः वेगळी आहे. केरळमध्ये डावे पक्ष आणि काँग्रेस हेच मुख्य प्रतिस्पर्धी आहेत. तिथे ते एकमेकांविरुद्ध रक्ताची लढाई लढतात; पण दिल्लीत आल्यावर गळ्यात गळे घालतात. हीच स्थिती पश्चिम बंगालची आहे. तिथे ममता बॅनर्जीच्या तृणमूल काँग्रेसला शह देण्यासाठी काँग्रेस आणि डावे एकत्र येतात, तर राष्ट्रीय स्तरावर ममता बॅनर्जी 'इंडिया' आघाडीचा चेहरा बनण्याचा प्रयत्न करतात. मतदारांसाठी हा विरोधाभास अत्यंत गोंधळात टाकणारा आहे. तामिळनाडूमधील राजकीय घडामोडींनी 'इंडिया' आघाडीच्या पायालाच सुरूंग लावला. तामिळनाडूमध्ये द्रमुक आणि काँग्रेस यांचे नाते दशकांपासून जुने आहे; मात्र विजय यांच्या 'तमिलगा वेत्री कळघम' (टीव्हीके) या पक्षाच्या उदयानंतर समीकरणे बदलली. द्रमुकसोबत निवडणूक लढवून नंतर 'टीव्हीके' च्या सरकारमध्ये सहभागी होण्याच्या शक्यतेवर काँग्रेसने घेतलेली मवाळ भूमिका द्रमुकला रुचली नाही. द्रमुकचे आघाडीतून बाहेर पडणे हा केवळ एका राज्याचा प्रश्न नाही, तर 'इंडिया' आघाडीच्या दक्षिण भारतातील शक्तीवर झालेला मोठा प्रहार आहे. हिंदी पट्ट्यातील सर्वात महत्त्वाचे राज्य असलेल्या उत्तर प्रदेशमध्येही 'इंडिया' आघाडीमध्ये आलबेल नाही. समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनी काँग्रेसला दिलेला इशारा आघाडीतील अस्वस्थता स्पष्ट करतो. लोकसभेच्या वेळी दाखवलेली एकजूट विधानसभा किंवा पोटनिवडणुकांच्या वेळी का दिसत नाही, हा त्यांचा मुख्य सवाल आहे. काँग्रेसने अतिमहत्त्वाकांक्षा सोडून प्रादेशिक पक्षांना मोठ्या भावाची भूमिका द्यावी, ही समाजवादी पक्षाची मागणी आता निर्वाणीच्या इशाऱ्यापर्यंत पोहोचली आहे.'इंडिया' आघाडीला गेलेले तडे हे केवळ जागावाटपापुरते मर्यादित नाहीत, तर त्याचे मूळ खोलवर रुजले आहे. आघाडीचा सर्वमान्य नेता कोण, हा प्रश्न अद्याप अनुत्तरित आहे. प्रत्येक प्रादेशिक पक्षाला स्वतःला पंतप्रधानपदाचा दावेदार समजण्याची ओढ लागली आहे. काँग्रेस अद्याप स्वतःला मोठा भाऊ समजते, तर प्रादेशिक पक्षांना काँग्रेसची ताकद कमी झाली असून त्यांनी आपल्यासाठी जास्त जागा सोडाव्यात, असे वाटते. डावे, तृणमूल, समाजवादी पक्ष आणि काँग्रेस यांच्या विचारधारा पूर्णतः भिन्न आहेत. केवळ 'भाजप विरोध' हा एकमेव धागा त्यांना किती काळ जोडून ठेवणार, हा कळीचा मुद्दा आहे. मतदारांना 'पर्याय' हवा असतो, तेव्हा सक्षम आणि स्थिर पक्ष समोर असावा अशी अपेक्षा असते. आघाडीचे घटक पक्ष एकमेकांविरुद्धच दंड थोपटणार असतील, तर मतदारांचा विश्वास संपादन करणे कठीण जाईल. केरळ, बंगाल आणि उत्तर प्रदेशमध्ये मते विभागल्यास भाजपला मोठा फायदा मिळेल. नेत्यांनी हात मिळवले, तरी स्थानिक पातळीवरील कार्यकर्त्यांचे मन वळवणे कठीण असते. वर्षानुवर्षे एकमेकांविरुद्ध लढणारे कार्यकर्ते अचानक एकाच झेंड्याखाली कसे येणार, असा प्रश्न उपस्थित होतो.'इंडिया' आघाडी सध्या एका अशा वळणावर उभी आहे, जिथे एकत्र राहणे ही गरज नसून अपरिहार्यता आहे. द्रमुकसारखे मोठे पक्ष आघाडीमधून बाहेर पडत असतील आणि समाजवादी पक्षासारखे मित्रपक्ष इशारा देत असतील, तर आघाडीच्या नेतृत्वाने चिंतन करण्याची गरज आहे. राज्याराज्यांमधील परस्परविरोधी भूमिका आणि सत्तेसाठी सोयीचे राजकारण यामुळे आघाडीची तटबंदी कमकुवत झाली आहे. ही आघाडी वाचवायची असेल, तर त्यांना व्यक्तिगत आणि प्रादेशिक अहंकार बाजूला सारून एका ठोस आणि स्पष्ट कार्यक्रमासह जनतेसमोर जावे लागेल. अन्यथा, देशात एकत्र आणि राज्यांमध्ये विरोधात हे सूत्र या आघाडीच्या अस्ताचे कारण ठरेल.

# खरीप पिकांच्या भावात तेजी राहणार का?

देशातील बाजारात सध्या कापूस आणि सोयाबीनच्या भावात तेजी दिसून येत आहे. युद्धामुळे निर्माण झालेली स्थिती आणि जोडीला कमी उत्पादन यामुळे ही तेजी दिसत आहे. तर कडधान्यासह काही शेतीमालाचे भाव सध्याही दबावातच आहेत.

देशात सोयाबीनचा भाव आंतरराष्ट्रीय बाजाराच्या तुलनेत अधिक आहे. तर कापसाचा भाव आंतरराष्ट्रीय बाजाराच्या तुलनेत कमी प्रमाणात वाढला आहे. सध्या तरी कापूस आणि सोयाबीन या आपल्या दृष्टीने महत्त्वाच्या शेतीमालाच्या भावात युद्धामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे अपेक्षेपेक्षा जास्त तेजी दिसत आहे. या तेजीची पाळेमुळे आणि भविष्यातील परिस्थितीचा बारकाईने विचार केल्यास भावपातळी पुढील काळातही गेल्या वर्षभरापेक्षा अधिक राहण्याची शक्यता आहे.

### पांढऱ्या सोन्याला झळाळी

कापसाच्या भावात आलेल्या तेजीच्या कारणांचा आढावा घेऊ. एक तर युद्धामुळे कच्च्या तेलाच्या भावात वाढ झाली. त्यामुळे मानवनिर्मित कापड अर्थात पॉलिस्टर आणि रेयॉन महागले. परिणामी, आंतरराष्ट्रीय बाजारात कापड निर्मितीसाठी मानवनिर्मित धागा आणि कापसाचा धागा यांच्या वापराचे प्रमाण बदलत गेले. पॉलिस्टरचे भाव कच्च्या तेलाच्या भावासोबत ४० ते ५० टक्क्यांपर्यंत वाढले आहे. त्यामुळे कापड निर्मितीसाठी पॉलिस्टरचे प्रमाण कमी होत कापसाचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे कापसाच्या भावातही वाढ झाली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात कापसाचे भाव गेल्या दोन वर्षांतील उच्चांकी पातळीवर पोहोचले आहेत. युद्ध सुरू होण्याआधी कापसाचा भाव आंतरराष्ट्रीय बाजारात ६३ सेंट प्रति पाउंडच्या आसपास होता. गेले वर्षभर कापूस याच पातळीच्या भोवती फिरत राहिला होता. परंतु युद्धामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात पॉलिस्टरचे भाव वाढत गेले आणि कापसालाही आधार मिळत गेला. युद्धानंतर आंतरराष्ट्रीय बाजारात कापसाच्या भावात ४० टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे.

अमेरिकेतील कापूस उत्पादक पट्ट्यातील कमी पावसामुळेही भाववाढीला फोडणी मिळाली आहे. भारतात आधीच कापसाचे उत्पादनात घट आलेली होती. त्यातच आंतरराष्ट्रीय बाजारात कापसाच्या भावात चांगली तेजी आली. त्यामुळे कापसाचे भाव वधारले. परंतु आंतरराष्ट्रीय बाजाराच्या तुलनेत देशातील बाजारात झालेली वाढ कमी होती. देशातील बाजारात कापूस २५ ते ३० टक्क्यांपर्यंत वाढला. युद्धामुळे शेजारचे देश भारताकडून सूत आणि ती खोटी खरेदी करत आहेत. कापडालाही चांगली मागणी आहे. युद्धानंतर कापसाला मागणी वाढल्याने दरात तेजी आली आहे. युध्द सुरु होण्याआधी देशात कापसाचा भाव सरासरी आठ हजारांच्या दरम्यान होता. तो आता सरासरी नऊ हजारांवर गेला आहे. तर कमाल भावाच्या बाबतीत कापसाने यंदाही १० हजारांचा टप्पा गाठला आहे. पण भाव सध्याच्या पातळीवरून पुढे सरकला नाही. कापूस सरासरी नऊ हजार रुपये झाल्यानंतर कापसाला उठाव कमी झाल्याचे उद्योगांनी सांगितले. त्यामुळे तीन आठवड्यांपासून पातळीवर स्थिरावला आहे.

**देशातील बाजारात सध्या कापूस आणि सोयाबीनच्या भावात तेजी . दिसत आहे. पण तूर आणि हरभऱ्यासह इतर शेतीमालाच्या दरात वाढ झालेली नाही. यंदाच्या खरिपावर एल निनोमुळे कमी पावसाचे सावट आहे. या पार्श्वभूमीवर खरिपातील प्रमुख पिकांचे बाजारभाव काय राहतील, असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे.**

आंतरराष्ट्रीय बाजारातही कापसाने दोन वर्षांनंतर ८८ सेंट प्रति पाउंडचा टप्पा गाठला होता. शुक्रवारी कापूस भाव हंगामातील उच्चांकी दरावरून खाली येत बाजार ८० सेंटवर बंद झाला होता. आंतरराष्ट्रीय बाजारात दरवाढीला लगाम बसल्याचा परिणाम देशातील बाजारावरही दिसून आला. अमेरिकेत कापसाची लागवड सुरू आहे. लागवडीचा वेगही चांगला आहे. अमेरिकेत यंदा कापूस लागवड वाढत असली, तरी उत्पादकता कमी राहण्याची शक्यता आहे. जागतिक कापूस उत्पादनात २०२६-२७ मध्ये घट येण्याचा अंदाज अमेरिकेच्या कृषी विभागाने (यूएसडीए) व्यक्त केला आहे. अमेरिका, चीन, ब्राझील आणि ऑस्ट्रेलियात कापूस उत्पादन कमी राहणार असल्याचे म्हटले आहे. भारतात सध्या तरी उत्पादन काहीसे अधिक राहण्याचा अंदाज वर्तविला जात असला तरी कमी पावसाच्या सावटामुळे उत्पादन कमीच राहण्याची शक्यता आहे. जागतिक उत्पादनाचा अंदाज लक्षात घेऊन अमेरिकेत कापसाचा भाव ७३ सेंट प्रति पाऊंड अर्थात गेल्या वर्षपिक्षा अधिक राहण्याची शक्यता आहे. देशातही यंदा कापूस उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता असल्याने कापसाचा भाव हमीभावाच्या आसपास स्थिरावण्याची शक्यता आहे.

### सोयाबीनमध्ये तेजीचा कल

देशातील बाजारात सोयाबीनचा भाव गेल्या तीन वर्षातील उच्चांकी पातळीवर पोचला आहे. आंतरराष्ट्रीय बाजारातही सोयाबीन दोन वर्षांतील उच्चांकी पातळीवर गेले आहे. सोयातेलाच्या भावात वर्षभरात ५१ टक्के, तर युद्ध सुरू झाल्यानंतर ३० टक्के वाढ झाली आहे. सोयातेलाचा दर सध्या अडीच वर्षांतील उच्चांकी पातळीवर आहे.

आंतरराष्ट्रीय बाजारात सोयाबीनचा भाव २० टक्के वाढला; पण देशात ४० टक्क्यांनी भाव वाढला. यांचे महत्त्वाचे कारण म्हणजे यंदा देशातील उत्पादन कमी झाले होते. गेल्या हंगामातील शिल्लक सोयाबीनचे प्रमाणही कमी होते.



याचा सोयाबीनच्या भावाला आधार मिळाला. सध्या देशात सोयाबीनचा पुरवठा कमी आहे. जागतिक बाजारात नॉन जीएम सोयाबीन कमी प्रमाणात उपलब्ध आहे. त्यातच आयातीचा खर्च वाढलेला आहे. वाढलेल्या भावातही सोयापेंडची निर्यात चांगली सुरू होती. त्यामुळे देशात सोयाबीनच्या भावात तेजी आली. सध्या बाजारात सोयाबीनला प्रति क्विंटल सात हजारांच्या आसपास भाव मिळत आहे. पण वाढलेल्या भावात आता सोयाबीनला मागणी कमी येत असल्याचे प्रक्रियादारांनी सांगितले. त्यामुळे भावात काहीसे चढ-उतार सुरू आहेत. दरवाढीवर सध्या तरी मर्यादा दिसत आहेत.

### सोयाबीनचे विक्रमी उत्पादन?

नव्या हंगामात जागतिक बाजारात सोयाबिनचे उत्पादन विक्रमी पातळीवर पोहोचण्याची शक्यता आहे. ब्राझील, अमेरिका, अर्जेंटीना आणि चीनमध्ये सोयाबीन उत्पादन वाढीचा अंदाज आहे. ब्राझील यंदा विक्रमी १८६० लाख टन सोयाबिन उत्पादन घेईल, अशी शक्यता यूएसडीने व्यक्त केली आहे. जागतिक सोयाबीनचे उत्पादन विक्रमी ४ हजार ४१५ लाख टनांवर पोहोचण्याचा अंदाज आहे. तर वापरही वाढून ४ हजार ४०० लाख टन होण्याची शक्यता आहे. सोयाबीनचे गाळप विक्रमी ३ हजार ८३१ लाख टनांवर पोहोचण्याची चिन्हे आहेत. म्हणजे केवळ उत्पादनच नाही तर सोयाबीनचा वापरही विक्रमी पातळीवर राहण्याचा अंदाज यूएसडीएने व्यक्त केला आहे. सोयाबीनचे उत्पादन विक्रमी पातळीवर पोहोचल्यानंतरही सोयाबीनचा अमेरिकेतील बाजारातील सरासरी भाव गेल्या वर्षर्षीपेक्षा अधिक राहील, असेही यूएसडीएने म्हटले आहे. जागतिक पातळीवर उत्पादनाची अशी स्थिती असली, तरी देशात मात्र उत्पादन घटण्याचे चित्र आहे. यंदा 'एल निनो'मुळे कमी पावसाचे सावट आहे. त्यामुळे नव्या हंगामातील उत्पादन कमीच राहण्याची शक्यता आहे. असे झाल्यास सलग दुसऱ्या वर्षी सोयाबीन उत्पादन कमी राहणार आहे. त्यातच नव्या हंगामासाठी सोयाबीनचा शिल्लक साठा नगण्य आहे. त्यामुळे पुढील हंगामातही सोयाबीनचा पुरवठा टाईट राहण्याची शक्यता जास्त आहे. त्यामुळे सोयाबीनचा भाव गेल्या वर्षभराच्या तुलनेत अधिक राहण्याची शक्यता आहे. सोयाबीन पुढील काळात हमीभावाच्या पुढेच जास्त काळ राहण्याची शक्यता असल्याचे अभ्यासकांनी म्हटले आहे.

### कडधान्य बाजावर दबाव

देशातील कडधान्य बाजार सध्याही दबावातच आहे. हरभऱ्याची बाजारातील आवक चांगल्या प्रमाणात सुरू आहे. याचा दबाव दरावर आहे. तुरीची आवक सध्या कमी झालेली आहे. काही बाजारांमध्ये तुरीच्या भावात सुधारणाही दिसून आली आहे. पण अपेक्षित तेजी अद्याप दिसली नाही. तुरीचे उत्पादन सलग तिसऱ्या वर्षी कमी झालेले आहे. देशात साठा कमी प्रमाणात उपलब्ध आहे. असे असतानाही तुरीच्या भावात अपेक्षित वाढ झालेली नाही. तुरीचे भाव वाढण्यास सर्व परिस्थिती अनुकूल आहे. पण शेतकऱ्यांचा माल बाजारात येत आहे आणि सरकार आयातीसाठी आक्रमक धोरण राबवत आहे, या कारणांनी सध्या दबाव दिसून येत आहे. पण खरीप हंगामात तुरीची लागवड नेमकी किती होते, तसेच पीक वाढीच्या काळात परिस्थिती अनुकूल राहते का यावर बाजारातील गणिते ठरणार आहेत. परिस्थिती नव्या हंगामातील पिकाला पोषक नसल्याचे स्पष्ट झाल्यास तुरीच्या भावात आतापर्यंत अपेक्षित असलेली तेजी दिसू शकते, असे मत अभ्यासकांनी व्यक्त केले. हरभरा, उडीद, मूग आणि मसूरच्या भावालाही या परिस्थितीचा आधार मिळू शकतो, असा त्यांचा अंदाज आहे.

'एल निनो'चा पाऊसमानावर परिणाम दिसू लागल्यानंतर कडधान्यांसह सर्वच शेतीमालाच्या भावात वाढ होईल, असे जाणकारांनी सांगितले. पुढील वर्ष दीड वर्षात शेतीमालाचे भाव चांगले राहण्यासाठी पोषक स्थिती सध्या तरी दिसते आहे, असा त्यांचा होरा आहे. (साभार ॲग्रोवन)

**अनिल जाधव**

# पेपरफुटीचा अमानुष खेळ

**'नीट'सारख्या तीव्र स्पर्धेच्या व महत्त्वाच्या परीक्षेत पेपरफुटीसारखा प्रकार होणे, हा सर्वसामान्यांच्या जीवाशी आणि जीवनाशीही खेळ आहे. या परीक्षेतून डॉक्टर म्हणून थेट लोकांच्या जीवाचा ताबा आपण या विद्यार्थ्यांना देत असतो. यातले गांभीर्य केंद्र सरकारने लक्षात घेणे गरजेचे आहे.**

३ मे रोजी झालेली यूजी 'नीट' ही राष्ट्रीय वैद्यकीय सामायिक परीक्षा नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए)ने रद्द झाल्याचे ठरवून परत नव्याने परीक्षा घेणार असल्याचे जाहीर केल्यामुळे देशभरातील लाखो विद्यार्थी अनिश्चितता आणि निराशेच्या गर्तेत सापडले आहेत. अनेक राज्यांत ६०० मार्कांचे १४० प्रश्न हे परीक्षेच्या तीन आठवडे आधीच १० लाख रुपये प्रतिपेपर दराने विकले गेल्याचे उघडकीस आल्यावर हा निर्णय घेण्यात आला. सर्वांत धक्कादायक बाब म्हणजे 'नीट' परीक्षा घोटाळा हा तिसऱ्यांदा उघडकीला आलेला आहे. वैद्यकीय प्रवेशासारख्या सर्वसामान्यांच्या जगण्या-मरण्याशी संबंधित असलेल्या परीक्षेबाबतची पारदर्शकता टिकवता न येणे हे केवळ अपयश नव्हे तर लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्य व भावनांशी खेळण्याचा तो अक्षम्य गुन्हा आहे.

एमबीबीएस प्रवेशाच्या जागा आहेत १ लाख २९ हजार ६०३. त्यासाठी दरवर्षी परीक्षेला बसतात साधारण २२ ते २५ लाख विद्यार्थी. केवळ एमबीबीएस नव्हे तर बीडीएस, आयुर्वेद, होमिओपॅथी, युनानी, सिद्धा, नर्सिंग, फिजिओथेरपी अशा सर्व वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी 'नीट' ही एकच सामायिक प्रवेश परीक्षा देशभर घेतली जाते. या पैकी अनेक विद्यार्थी या परीक्षेची तयारी पाच-पाच वर्षेही करत असतात. 'नीट' सोबतच पदव्युत्तर प्रवेश परीक्षा व परदेशातील वैद्यकीय अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांसाठी 'एफएमसीईजी' या परीक्षांवरही वेळोवेळी प्रश्नचिन्हं उपस्थित झाली आहेत. तीन वर्षे उघडीस आलेल्या या घोटाळ्यांमुळे आता होणार असलेल्या फेरपरीक्षेवरही विश्वास कसा ठेवायचा असा प्रश्न विद्यार्थी आणि पालकांना पडला आहे.

या परीक्षेची पारदर्शकता टिकवून ठेवण्यासाठी सध्याच्या व्यवस्थेत सुधारणा करणे हा केवळ तात्पुरता बदल ठरेल. ही परीक्षा पूर्णतः संगणकाधारित करणे हाच दूरगामी आणि कायमचा उपाय आहे. 'नीट' परीक्षेत छापील प्रश्नपत्रिका व उत्तर पत्रिका या ओएमआर (ऑप्टिकल मार्क रिकग्निशन) शीटच्या स्वरूपात असून त्यावर पेनाने खुणा करून उत्तरे द्यावी लागतात. या पद्धतीतच घोटाळ्याची अनेक बीजे आहेत. यावर्षी प्रश्नपत्रिका छपाईचे काम जयपूर येथील एका खासगी एजन्सीला देण्यात आले होते. तिथूनच ती फुटल्याचे प्राथमिक चौकशीत निष्पन्न झाले आहे. भारत सरकारचा मुद्रण व लेखन सामग्री संचलनालय हा छपाईची अवाढव्य यंत्रणा असलेला विभाग अस्तित्वात आहे. मग 'नीट' सारख्या अत्यंत संवेदनशील परीक्षेच्या प्रश्न पत्रिकेच्या छपाईचे काम बाहेर का दिले जाते, असा प्रश्न पडतो. मूळ प्रश्न पत्रिकेचे सेट हे स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखेत ठेवले जातात आणि पेपर फुटला तर पर्यायी प्रश्न पत्रिकेचे सेट हे कॅनरा बँकेच्या शाखेत ठेवले जातात. खरे तर ही माहिती अत्यंत गोपनीय असायला हवी, पण वर्षानुवर्षे या गोष्टी जगजाहीर आहेत.



'नीट' परीक्षा घेण्याचा खर्च हा २०० कोटी रुपये आहे व 'एनटीए'कडे अर्ज भरताना विद्यार्थ्यांकडून जमा होणारे एकूण शुल्क ३०० कोटी रुपये असते. 'नीट' परीक्षा सुरू झाल्यापासून आजवर 'एनटीए'कडे ३,५१३ कोटी रुपये शुल्क म्हणून जमा झाले आहेत व ३,०६५ कोटी रुपये खर्च झाले आहेत. नफा म्हणून कामावलेले ४४८ कोटी रुपये हे आता 'नीट'ची प्रक्रिया सुधारण्यासाठी वापरणे अपेक्षित आहे. खरे तर ही परीक्षा म्हणजे पैसे कमावण्याचे साधन नाही. शासनाने पदरचे पैसे खर्च करून ती अधिक पारदर्शक करावी इतकी ही महत्त्वाची परीक्षा आहे. आता फेरपरीक्षेसाठी पुन्हा २०० कोटी रुपये खर्च येणारच आहे. त्याहून महत्त्वाचे म्हणजे प्रत्येक विद्यार्थ्याला जिल्हा केंद्रावर जाऊन परीक्षा देण्यासाठी पुन्हा खर्च करावा लागेल, त्याचा एकत्रित विचार केला तर तो आकडा ३०० कोटी रुपये होतो. सर्वसामान्यांच्या पैशाचा हा एक प्रकारे अपव्ययच आहे.

या परीक्षेत पारदर्शकता आणण्याची पहिली पायरी म्हणजे या परीक्षा पूर्णपणे जेईई व कॅटप्रमाणे संगणकीय पद्धतीने व्हायला हव्यात. परीक्षा देण्यासाठी विद्यार्थ्यांची ओळख ही फेस रेकग्निशन म्हणजे चेहरा व आधार कार्डमध्ये दिलेला आयरिस म्हणजे डोळ्यांचा पडदा स्कॅन करून पटवून घेणे सहज शक्य आहे. परीक्षेतून दरवर्षी १०० कोटी कमावणाऱ्या एनटीएला खर्चाचे कारण सांगून आणि ही यंत्रणा उभी करणे अवघड असल्याची सबब पुढे करून पळ काढता येणार नाही. खरे तर ही परीक्षा सगळीकडे एकाच दिवशी घेण्याचीही गरज नाही. इतर परीक्षांप्रमाणे ती टप्प्याटप्याने घेतली जाऊ शकते. प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करून हॅकिंगसारखे गैरप्रकार टाळणे सहज शक्य आहे. आयटी कंपन्यांना या परीक्षेचे काम दिले जाते. काही गैरप्रकार घडल्यास त्यांना जबाबदार धरून दंडाची तरतूद करणेही आवश्यक आहे.

पेपर फुटणे हा गैरप्रकाराचा केवळ एकच मार्ग झाला. तो उघड झाला म्हणून कळला. अजून असे अनेक मार्ग निश्चितच असतील, जे अद्याप कुणालाच माहीत झालेले नाहीत. २०२४ साली राजस्थानमध्ये चुकीचा पेपर वाटला गेला. दुसरा पेपर देण्यास उशीर लागला म्हणून विद्यार्थ्यांना चक्क ग्रेस मार्क्स देऊन टाकण्यात आले होते. इतक्या तीव्र स्पर्धेच्या व महत्त्वाच्या परीक्षेत असा प्रशासकीय गोंधळ होणे हा सर्वसामान्यांच्या जीवाशी आणि जीवनाशीही खेळ आहे. या परीक्षेतून डॉक्टर म्हणून थेट लोकांच्या जीवाचा ताबा आपण या विद्यार्थ्यांना देत असतो. यातले गांभीर्य केंद्र सरकारने लक्षात घेणे गरजेचे आहे.

कुठलीही वेळेची मर्यादा न पाळता चालणारी दीर्घ प्रवेश प्रक्रिया हा या परीक्षेचा आणखी एक मोठा दोष आहे. विद्यार्थी व पालकांच्या मानसिक छळाचे तेही एक कारण आहे. 'नीट'ची परीक्षा होते मे महिन्याच्या पहिल्या रविवारी, मात्र प्रवेश प्रक्रिया संपण्यासाठी फेब्रुवारी महिना उजाडतो. ही प्रक्रिया पूर्णपणे संगणकीकृत असूनही ती पूर्ण होण्यास १० महिने का लागावे? फार तर एका महिन्यात ती संपायला हवी. चांगल्या बुद्धिमत्तेची १८ ते २० वयोगटातील लाखो मुलांची एक पूर्ण पिढी १० महिने घरी रिकामी बसवून आपण किती मानवी क्रयशक्ती वाया घालवतो? याचे कारण असे की नव्या वैद्यकीय महाविद्यालयांना परवानगी देण्यासाठी कुठलीही तारखेची मर्यादा केंद्र व राज्य सरकार पाळत नाही. प्रवेश परीक्षा असो की प्रवेश प्रक्रिया यातील गोंधळाच्या मुळांचा शोध घेतला तर अशा अनेक गोष्टी लक्षात येतील. केंद्र शासन वैद्यकीय प्रवेशाच्या जागा वाढवण्यास उत्सुक आहे. त्यात काही गैर नाही, पण या जागा वाढवताना त्या भरण्यासाठीचा पाया असलेली प्रवेश परीक्षा ही भक्कम व पारदर्शक करणे ही पहिली गरज आहे. अन्यथा केवळ संख्यात्मक वाढ करून अनागोंदी वाढीस लागेल. पेपरफुटी सारखी प्रकरणे ही सर्व सामान्यांच्या स्वप्नांशी केलेला अमानुष खेळ आहे ही जाणीव ठेवून 'नीट'चे पारदर्शक नियोजन आवश्यक आहे.

### खासगी कोचिंग क्लासची लिंक

'नीट' परीक्षेतील पेपर फुटी आणि अन्य गैर प्रकारांचा संबंध हा खाजगी कोचिंग क्लासेसशी आहे. 'लातूर', 'कोटा' यांच्या धर्तीवर अनेक ठिकाणी मोठी कोचिंग इंडस्ट्री उभी राहिली आहे. वैद्यकीय अभ्यासक्रमात हमखास प्रवेशाची खात्री देत या क्लासेसमध्ये लाखो रुपयांचे शुल्क भरून प्रवेश घेतला जातो. या इंडस्ट्रीत आपले वर्चस्व टिकवून ठेवण्यासाठी व क्लासमधील अधिकाधिक मुलांना वैद्यकीय प्रवेश मिळावा यासाठी कोचिंग क्लासेसमध्ये प्रचंड स्पर्धा असते. त्यातून अशा गैरप्रकारांचा आधार घेतला जातो. या क्लासेसचे नीट परीक्षा यंत्रणेशी असलेले संबंध आता या तिसऱ्या पेपरफुटीच्या निमित्ताने पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहेत. ही भ्रष्ट 'छिद्रे' बुजवायची असतील तर परीक्षेशी सबंधित प्रक्रियेतील पारदर्शकतेची पातळी राखणे हेच उत्तर आहे. पेपरफुटीच्या आधीच्या प्रकरणांतील आरोपींवर काय कारवाई झाली, याचे उत्तरही सरकारला संतापलेल्या विद्यार्थी आणि पालकांना द्यावे लागणार आहे.

एनटीए घेत असलेल्या चौदा पैकी पाच परीक्षांमध्ये आतापर्यंत गैरप्रकार आढळून आले आहेत. यावरून एनटीए प्रशासनामध्येच त्रुटी आहेत, हे स्पष्ट होते. पेपरफुटीचे खापर दुसऱ्यावर फोडण्यापेक्षा एनटीएला स्वतःमध्येच सुधारणा कराव्या लागणार आहेत. गैरमार्गांचा अवलंब कसा केला जातो,याची चाचपणी करण्यासाठी केंद्र सरकारने एक थर्ड पार्टी अंडर कव्हर इंटेलिजन्स स्लीपर सेल स्थापन करण्याची गरज आहे. या परीक्षेविषयीची विश्वासार्हता आता रसातळाला गेली आहे, त्यामुळे जे विद्यार्थी प्रामाणिकपणे अभ्यास करून यश मिळवतात, त्यांच्या यशावरही प्रश्नचिन्ह उभे राहत आहे आणि तसे होणे हे अन्यायकारक आहे. (साभार रविवार मटा)

**-डॉ. अमोल अन्नदाते**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय

# महाराजस्व समाधान शिबिरात लाभार्थ्यांना ३ लाख १६ हजार दाखले, प्रमाणपत्र वितरित

## ६६ हजार डिजिटल सातबारे वितरित

**जनमाध्यम प्रतिनिधी**

**यवतमाळ :** राज्य शासनाच्या निर्देशानुसार यवतमाळ जिल्ह्यातील १६ तालुक्यातील १०९ मंडळांमध्ये ७ मार्च ते १५ मे या कालावधीत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान राबविण्यात आले. याअंतर्गत आयोजित शिबिरांना सर्वच मंडळात नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या समाधान शिबिराअंतर्गत आतापर्यंत विविध प्रकारचे ३ लाख १६ हजार ७१८ दाखले व प्रमाणपत्र वितरित करण्यात आले असल्याची माहिती जिल्हाधिकारी विकास मीना यांनी पत्रकार परिषदेत दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवन येथे झालेल्या या पत्रकार परिषदेला निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी, उपजिल्हाधिकारी पुनम अहिरे, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी मनोजकुमार ढगे, जिल्हा पुरवठा अधिकारी संघपाल मेश्राम व पत्रकार बांधव उपस्थित होते.

या अभियानाच्या पहिल्या टप्प्यातील शिबिरामध्ये आरोग्य, शिक्षण, पोलीस, पशुसंवर्धन, कृषी आदी २२ विभाग एकाच छताखाली आणून लाभार्थ्यांना योजनेची माहिती व लाभ देण्यात आला. तसेच आतापर्यंत झालेल्या सर्वच शिबिरामध्ये महसूल विभागाच्या विविध सेवा देण्यात आल्या. त्यामध्ये ११०५६ फेरफार प्रकरणे निकाली काढण्यात आले, ४६६८ सातबारमधील दुरुस्ती अर्ज स्विकारण्यात आले, ६६,७७५ डिजिटल सातबारा, ४९,०६६ नमुना ८ अ उतारे उपलब्ध करुन देण्यात आले. १,४०,२२७ प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. एक खिडकी व्यवस्थेअंतर्गत ३०,५५८ अर्ज निकाली काढण्यात आले. १,२८९ भूसंपादन व अकृषक परवानगीच्या ११७ प्रकरणी कमी जास्त पत्रके तयार करुन गाव दफ्तर अद्ययावत करण्यात आले. जिवंत सातबारा मोहिमेअंतर्गत अद्यावत १२,१८५ अभिलेख उपलब्ध करुन देण्यात आले. ३२८ प्रकरणांमध्ये भोगवटादार वर्ग २ जमीन वर्ग १ करण्याबाबतची कार्यवाही करण्यात आली. तुकडेबंदीनुसार २८ सातबाराचे वाटप, १४ पाणंद रस्त्यांना प्रशासकीय मान्यतेचे आदेश देण्यात आले. तसेच सर्वांसाठी घरे योजनेतून ४०४ लाभार्थ्यांना पट्ट्यांची वाटप करण्यात आले आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी विकास मीना यांनी यावेळी दिली.



## ७ मार्च ते १५ मे दरम्यान शिबिरांचे आयोजन

## नागरिकांचा मिळाला उत्स्फुर्त प्रतिसाद

या अभियान कालावधीमध्ये महसूल मंडळांमध्ये समाधान शिबिर आयोजित करण्यात आले. या दरम्यान सर्वच मंडळात नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून हे शिबिर यशस्वीरित्या पार पडले. या शिबिरामध्ये आरोग्य विभाग, शिक्षण विभाग, पोलीस विभाग, पशुसंवर्धन, कृषी विभाग आदी २२ विभागांनी लाभार्थ्यांना योजनेची माहिती व लाभ देण्यात आले.

या शिबिरांविषयी नागरिकांपर्यंत प्रभात फेरी, दवंडी, व्हॉट्सअॅप, समाज माध्यम, पथनाट्य, व विविध माध्यमातून जनजागृती करण्यात आली. तसेच तहसिलदार, मंडळ अधिकारी, तलाठी, नायब तहसीलदार यांच्या सभा घेऊन नागरिकांना शिबिराबाबत माहिती देण्यात आली.

यासह व्याख्यान, आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले. या शिबिरांना जिल्हाधिकारी व भारस्थ अधिकारी यांनी अचानक भेटी देवून पाहणी केली व आवश्यक सूचना केल्या.

या अभियानाच्या प्रत्येक टप्प्यात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या तीन मंडळ अधिकाऱ्यांचा पालकमंत्री व जिल्हाधिकारी यांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरित करुन गुणगौरवही करण्यात आला, असल्याची माहिती जिल्हाधिकारी विकास मीना यांनी

# अज्ञाताने चिरला महिलेचा गळा

## संशयित ताब्यात : गोपालपूर येथील रक्तरंजीत थरार, सर्वत्र खळबळ

**जनमाध्यम प्रतिनिधी**

**पांढरकवडा :** पतीपासून वेगळ्या राहत असलेल्या एका महिलेचा तिक्ष्ण धारधार हत्याराने गळा चिरण्यात आला.ही घटना सोमवारी दि.१८ मे रोजी सकाळी गोपालपूर (कोलाम पोड) येथे उघडकीस आली.कमलाबाई हुसेन मेश्राम (वय ५१) असे मृत महिलेचे नाव आहे.पतीवर संशयाची सुई आहे. वृत्त लिहिस्तोवर पोलिसांनी संशयिताला ताब्यात घेतले असून त्याच्याकडून गुन्ह्याचा कोणताही जबाब आला नाही.कोलाम पोड येथे राहणारी कमलाबाई मेश्राम यांचा विवाह हुसेन गट्टू मेश्राम वय ५७ यांच्यासोबत झाला होता.गेल्या काही दिवसांपासून पती या ना त्या कारणावरुन पत्नी कमलावर नेहमी संशय घेत वाद उपस्थित करीत होता.या त्रासाला कंटाळुन कमलाबाईने वेगळे राहणे पसंत केले.अशातच सकाळी ६:३० वाजताच्या सुमारास तिचा रक्ताच्या थारोळ्यात मृतदेह आढळला. कमलाबाई हिचा कोणीतरी खून केला असून ती सदाशिव वाघधरे यांच्या अंगणात पडली आहे,' अशी माहिती मृत महिलेच्या भावाला दिली.भावाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली असता, कमलाबाई या वाघधरे यांच्या घराच्या अंगणात डाव्या हातावर एका बाजूला पडलेल्या दिसल्या.त्यांच्या गळ्यावर तीक्ष्ण हत्याराचा मोठा वार होता आणि प्रचंड रक्तस्त्राव झाल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला होता.ही घटना रविवारी मध्यरात्री १:०० ते सोमवार सकाळी ६:०० वाजेच्या दरम्यान घडल्याचा अंदाज आहे.फिर्यादी चंद्रभान आत्राम यांनी गावातील पोलीस पाटील रमेश कुंटलवार यांना घटनेची माहिती दिली.त्यानंतर पोलीस पाटलांनी तात्काळ पांढरकवडा पोलीस स्टेशनशी संपर्क साधून घटनेची माहिती दिली.माहिती मिळताच पांढरकवडा पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला.



### संशयातून घडले हत्याकांड?

*मृतक कमलाबाई यांचे पती हुसेन यांच्यासोबत पटत नसल्याने, त्या पतीपासून दोन घरे सोडून वेगळ्या राहत होत्या. कमलाबाई यांचे दुसऱ्या कोणासोबत संबंध आहेत, असा संशय घेऊन पती हुसेन मेश्राम हा त्यांच्याशी नेहमी भांडण करायचा, अशी माहिती फिर्यादी भावाने दिली आहे. याच संशयातून हा खून झाला असावा, असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. पांढरकवडा पोलीस या प्रकरणाचा सर्व बाजूंनी कसून तपास करत आहेत.*

## वेधक

### मतदार यादी विशेष पुनरीक्षण मोहीम जाहीर..!

**यवतमाळ :** भारत निवडणूक आयोग आणि मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या सूचनेनुसार यवतमाळ जिल्ह्यात १ ऑक्टोबर २०२६ या अर्हता दिनांकावर आधारित मतदार यादीच्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमाची घोषणा करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी विकास मीना यांनी याबाबत माहिती दिली. जिल्ह्यातील जास्तीत जास्त पात्र नागरिकांची नावे मतदार यादीत समाविष्ट करणे आणि मतदार याद्या अधिक अचूक व पारदर्शक बनविणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. या अनुषंगाने विशेष पुनरीक्षण मोहिमेचे वेळापत्रकही जाहीर करण्यात आले आहे.या कार्यक्रमानुसार १ ऑक्टोबर २०२६ हा अर्हता दिनांक निश्चित करण्यात आला असून, २० जून ते २९ जूनदरम्यान तयारी, प्रशिक्षण आणि छपाईची कामे पार पडणार आहेत. त्यानंतर ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत बीएलओमार्फत घरोघरी भेटी देऊन प्रगणना करण्यात येणार आहे. तसेच २९ जुलैपर्यंत मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण आणि पुनर्रचना केली जाणार आहे.५ ऑगस्ट रोजी प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध केल्या जातील. त्यानंतर ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर या कालावधीत दावे व हरकती स्वीकारण्यात येतील. दावे व हरकतींचे निवारण ५ ऑगस्ट ते ३ ऑक्टोबर या कालावधीत केले जाईल. अंतिम मतदार यादी ७ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

ज्या नागरिकांनी अद्याप मतदार नोंदणी केलेली नाही किंवा मतदार यादीतील माहितीत बदल करावयाचा आहे, त्यांनी या विशेष मोहिमेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी विकास मीना यांनी केले आहे. बीएलओ घरोघरी भेट देतील, त्यावेळी नागरिकांनी आवश्यक माहिती देऊन सहकार्य करावे, असेही त्यांनी म्हटले आहे.

### महागावात चोरट्यांचा धुमाकूळ..!

**महागाव :** महागाव शहर व तालुक्यात वाढत्या चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, चोरट्यांचा धुमाकूळ दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. शुक्रवारी रात्री महागाव येथील कन्या शाळेजवळ असलेल्या साईराम साडी सेंटर मधून तब्बल ४८ हजार रुपयांची रोकड चोरी झाल्याची घटना उघडकीस आली. काही मिनिटांसाठी दुकान अर्धवट बंद करून बाहेर गेलेल्या व्यापाऱ्याच्या अनुपस्थितीचा फायदा घेत चोरट्यांनी हात साफ केल्याने व्यापारी वर्गातही चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.या प्रकरणी महागाव पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (ँन्ए) २०२३ अंतर्गत कलम ३०५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हा ईर्ॅ क्रमांक ०२३९ म्हणून दि. १६ मे २०२६ रोजी सायंकाळी ७:५९ वाजता नोंदविण्यात आला.पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना दि. १५ मे रोजी सायंकाळी ७:५५ ते ८:१० वाजण्याच्या दरम्यान घडली. फिर्यादी राजेश मारोतराव अडकिने (वय ४७, रा. प्रभाग क्रमांक ०१, कन्या शाळेजवळ, महागाव) हे गेल्या १५ वर्षांपासून पत्नीसमवेत साडी विक्रीचा व्यवसाय करतात.दि. १५ मे रोजी त्यांनी नेहमीप्रमाणे सकाळी दुकान उघडले होते. सायंकाळी सुमारे ७:५५ वाजता दुकानाचे शटर अर्धवट बंद करून घरासाठी फिल्टरचे पाणी आणण्यासाठी गेले होते. अवघ्या काही मिनिटांच्या या कालावधीत अज्ञात चोरट्याने दुकानातील काऊंटरमध्ये ठेवलेली ४८ हजार रुपयांची रोकड लंपास केली. रात्री सुमारे ८:१० वाजता दुकानात परतल्यानंतर रोकड गायब असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.घटनेची माहिती मिळताच महागाव पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन तपास सुरू केला आहे. वाढत्या चोरीच्या घटनांमुळे शहरातील कायदा-सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून, चोरट्यांचा त्वरित बंदोबस्त करण्याची मागणी नागरिकांतून होत आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक धनराज दौलतराव निळे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

### एनसीएमसी कार्ड की 'वसुली केंद्र'?

**यवतमाळ :** एसटी महामंडळाकडून प्रवास भाड्यातील सवलतींसाठी बंधनकारक करण्यात आलेल्या एनसीएमसी (नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड) योजनेच्या नावाखाली यवतमाळ शहरासह ग्रामीण व तालुका स्तरावर प्रवाशांची आर्थिक पिळवणूक होत असल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. केळापूर सह इतर तालुक्यांमध्ये कार्ड प्रक्रियेच्या नावाखाली नागरिकांकडून अतिरिक्त रक्कम वसूल केली जात असल्याच्या तक्रारी वाढत आहेत.

# खैरीत शनिदेव भक्तीचा

## हजारोंच्या उपस्थितीत महाप्रसाद उत्साहात



**जनमाध्यम प्रतिनिधी**

**राळेगाव** -राळेगाव ग्रामीण तालुक्यातील खैरी येथे श्री शनिदेव जयंतीनिमित्त आयोजित भव्य धार्मिक उत्सव भक्तिमय वातावरणात उत्साहात पार पडला. शनिदेव उत्सव समिती व भक्तगणांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमात खैरीसह परिसरातील हजारो भाविकांनी मोठ्या श्रद्धेने सहभाग घेतला.

१५ मे रोजी रात्री शनिदेव जागृती कार्यक्रमाने उत्सवाला प्रारंभ झाला. भजन, कीर्तन आणि धार्मिक कार्यक्रमांमुळे संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला. त्यानंतर १६ मे रोजी सकाळी विविध धार्मिक विधी पार पडले. कलश स्थापना, गणपती पूजन, शिव-हनुमंत पूजन, आदित्य शतनामावली सूर्यपूजन, श्री शनेश्वर अभंग स्नान, महापूजा, अभिषेक, मूर्ती सजावट तसेच होम-हवन यांसारखे धार्मिक कार्यक्रम भाविकांच्या उपस्थितीत संपन्न झाले.यानंतर दुपारी २ वाजल्यापासून सुरू झालेला भव्य महाप्रसाद रात्री १० वाजेपर्यंत अखंड सुरू होता. हजारो भाविकांनी शिस्तबद्ध पद्धतीने महाप्रसादाचा लाभ घेतला. उत्सवाच्या यशस्वितेसाठी समिती सदस्य, युवक, महिला मंडळ व ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

मोठ्या संख्येने उपस्थिती असूनही कार्यक्रम शांततेत आणि भक्तिभावाने पार पडल्याने परिसरात सामाजिक ऐक्य व श्रद्धेचे सुंदर दर्शन घडून आले.

# ढाणकी तहानले, अंधारातही ढकलले..!

**जनमाध्यम प्रतिनिधी**

**ढाणकी :** उन्हाळ्याचा पारा चाळीशी पार गेला असतानाच ढाणकी शहरात पाणी आणि विजेच्या भीषण समस्येने गंभीर स्वरूप धारण केले आहे. मूलभूत सुविधांचा पुरता बोजवारा उडाल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली असून, स्थानिक आमदार किशनराव वानखेडे यांच्या कार्यपद्धतीवरही तीव्र प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. 'ढाणकी गाव आपल्या कार्यक्षेत्रात येत नाही का?' असा थेट सवाल आता नागरिकांकडून उपस्थित होत आहे.

शहरातील पाणीपुरवठा यंत्रणा पूर्णपणे कोलमडल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. महिन्यातून अवघ्या दोन वेळा नळाचे पाणी मिळत असल्याने ऐन उन्हाळ्यात हंडाभर पाण्यासाठी महिलांना मैलोन्मैल भटकंती करावी लागत आहे. प्रशासनाच्या नियोजनशून्य कारभारामुळे आणि लोकप्रतिनिधींच्या दुर्लक्षामुळे नागरिकांना खाजगी टँकरचे महागडे पाणी विकत घेण्याची वेळ आली आहे.

दुसरीकडे वाढत्या उकाड्यात महावितरणकडून 'देखभाल आणि दुरुस्ती'च्या नावाखाली सुरू असलेल्या अघोषित भारनियमनामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. दररोज तासनतास वीजपुरवठा खंडित होत असल्याने रात्रीची झोप उडाली आहे. लहान मुले, वृद्ध आणि आजारी रुग्णांना त्याचा मोठा फटका बसत असून नागरिक अक्षरशः हैराण झाले आहेत.

पाणी आणि वीज या दुहेरी संकटामुळे ढाणकीतील जनजीवन विस्कळीत झाले असून नागरिकांमध्ये संताप उफाळून आला आहे.

'आमदार या समस्येबाबत अद्याप अनभिज्ञ कसे? ठोस उपाययोजना का केल्या जात नाहीत?' असे सवाल आता चौकाचौकात चर्चिले जात आहेत.



### पाणी-विजेच्या दुहेरी संकटाने जनतेचा संताप शिगेला!

### पैनगंगेत पाणी, तरी ढाणकी तहानलेलेच! सल्लेवाड

ढाणकी येथे तीव्र पाणीटंचाई असताना लगतच्या पैनगंगा नदीत गेल्या तीन दिवसांपासून पाणी उपलब्ध आहे. असे असताना नगरपंचायतीने ते पाणी विहिरीत साठवून नागरिकांना पुरवठा का केला नाही, असा सवाल उपस्थित केला जात आहे. या संदर्भात चर्चा करूनही प्रशासन हालचाल करत नसल्याचा आरोप करत, ढाणकीकरांची पाणी समस्या दूर करण्यासाठी आमदार किशनराव वानखेडे यांनी नगरपंचायत प्रशासनाला जाब विचारावा, अशी मागणी ढाणकी नगरपंचायत स्वीकृत नगरसेवक संजय सल्लेवाड यांनी केली आहे.

# पुन्हा त्याच भागात धाडसी घरफोडी !

## सोने-चांदीसह रोख रक्कम लंपास ; सिद्धेश्वर नगर परिसरात भीतीचे वातावरण !!

**जनमाध्यम प्रतिनिधी**

**उमरखेड :** शहरातील गजबजलेल्या व वर्दळीच्या मानल्या जाणाऱ्या सिद्धेश्वर नगर, बोरबन परिसरात पुन्हा एकदा धाडसी घरफोडीची घटना घडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दि १७ मे च्या मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी बंद घराचे कुलूप तोडून घरातील सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम असा ७२,४०० रुपयांचा मुद्देमाल लंपास केला.

मिळालेल्या माहिती नुसार, संतोष देवराव तालंगकर हे आपल्या मुलांच्या र्ँपरीक्षेनिमित्त नांदेड येथे गेले होते. परीक्षा संपल्यानंतर ते नातेवाईकांकडे मुक्कामी थांबले होते. याच संधीचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या सिद्धेश्वर नगर, बोरबन येथील राहत्या घरावर डल्ला मारला.

चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला व घरातील साहित्य अस्ताव्यस्त फेकून शोधाशोध केली. यामध्ये अंदाजे दहा ग्रॅम सोन्याचे दागिने, चांदीची चैन तसेच गल्ल्यातील अंदाजे २० ते २२ हजार रुपये व सुमारे ३५ हजार रुपयांची रोख रक्कम असा ऐवज चोरून नेल्याचे समोर आले आहे. सकाळी ६ वाजताच्या सुमारास शेजाऱ्यांना घराचे कुलूप तुटलेले दिसून आले. त्यांनी तात्काळ संतोष तालंगकर यांना भ्रमणध्वनीवरून माहिती दिली. त्यानंतर ते सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास नांदेडवरून उमरखेड येथे आपल्या घरी पोहोचले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा सुरू केला. विशेष म्हणजे, याच परिसरात कालच चोरट्यांनी तीन घरांचे कुलूप तोडून चोरीचे प्रयत्न केले होते. मात्र त्या वेळी त्यांना कोणतीही रोकड किंवा दागिने हाती लागले नव्हते. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी पुन्हा त्याच भागात यशस्वी घरफोडी झाल्याने पोलिसांच्या गस्त व सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



एकाच परिसरात वारंवार होत असलेल्या चोरीच्या घटनांमुळे नागरिक भयभीत झाले असून रात्रीची पोलीस गस्त वाढवावी, संशयितांवर लक्ष ठेवावे तसेच परिसरात सीसीटीव्ही तपासणी मोहीम राबवावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.दरम्यान, घटनास्थळी उपविभागीय पोलीस अधिकारी हनुमंत गायकवाड तसेच पोलीस निरीक्षक शंकर पांचाळ यांनी भेट देऊन पाहणी केली. संबंधित चोरट्यांना लवकरात लवकर अटक करण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी नागरिकांना दिले आहे.

# काळाबाजाराविरोधात ग्राहक संघटना आक्रमक..!

**यवतमाळ :** जिल्ह्यात घरगुती गॅस सिलेंडरचा वाढता गैरवापर, काळाबाजार आणि अवैध रिफिलिंगच्या प्रकारांना आळा घालण्यासाठी ग्राहक दक्षता कल्याण फाउंडेशनने आक्रमक भूमिका घेतली आहे. यवतमाळ जिल्ह्याला 'अवैध व काळाबाजार मुक्त एलपीजी जिल्हा' घोषित करण्यासाठी फाउंडेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन माणिकराव सोळंके यांनी जिल्हाधिकारी तथा जिल्हास्तरीय एलपीजी समितीचे अध्यक्ष यांना विविध मागण्यांचे सविस्तर निवेदन सादर केले आहे. गॅस वितरण व्यवस्थेत पारदर्शकता निर्माण करून ग्राहकांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी प्रशासनाने तातडीने कठोर उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.



फाउंडेशनने मांडलेल्या प्रमुख मागण्यांमध्ये ग्राहकांच्या दारावरच गॅस सिलेंडरचे वजन तपासणे आणि गळती चाचणी अनिवार्य करण्यावर भर देण्यात आला आहे. प्रत्येक डिलिव्हरी बॉयने रिकाम्या सिलेंडरसह एकूण १४.२ किलो गॅसचे वजन ग्राहकांसमोर मोजावे, तसेच विशेष उपकरणाद्वारे गळती तपासणी करून सिलेंडरची मुदत वैध असल्याची खात्री करून द्यावी, अशी भूमिका मांडण्यात आली.

घरगुती गॅस सिलेंडरचा व्यावसायिक वापर करून शासनाचा महसूल बुडवला जात असल्याचा गंभीर मुद्दाही निवेदनात उपस्थित करण्यात आला आहे. अनेक ठिकाणी रिक्षा व इतर वाहनांमध्ये घरगुती गॅसचा वापर होत असल्याने महसूल चोरीबरोबरच मोठ्या अपघातांचा धोका निर्माण होत असल्याचे फाउंडेशनचे म्हणणे आहे. अशा वाहनधारकांना आरटीओ डेटाच्या आधारे सतर्क करण्यासह जनजागृती फलक उभारण्याची मागणी करण्यात आली आहे.काळाबाजार रोखण्यासाठी गॅस एजन्सींमध्ये सीसीटीव्ही देखरेख बंधनकारक करण्याचा प्रस्तावही निवेदनात मांडण्यात आला आहे. साठवणूक केंद्रे, लोडिंग-अनलोडिंग पॉईंट्सवर किमान ३० दिवसांचे रेकॉर्डिंग जतन करणारे कॅमेरे बसविणे, तसेच स्मार्ट सिटी आणि पोलिसांच्या सर्व्हिलन्स यंत्रणेच्या मदतीने संशयास्पद हालचालींवर नजर ठेवावी, अशी सूचना करण्यात आली आहे. गॅस सिलेंडरसाठी क्यूआर कोड किंवा बारकोड प्रणाली लागू करण्याची मागणीही करण्यात आली.

# नाफेडच्या चना खरेदीच्या मुदतीसोबतच खरेदीची मर्यादा वाढवावी

## खासदार अमर काळे यांनी पालकमंत्र्यांना दिले पत्र

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

अमरावती येथे नुकत्याच आयोजित केलेल्या खरीप आढावा सभेत वर्धा लोकसभा मतदारसंघाचे खासदार अमर काळे यांनी अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना भेटून नाफेड मार्फत होत असलेली चना खरेदीची मर्यादा संपल्याने ती तात्काळ वाढवून त्यासोबतच पुरेशी मुदतवाढ सुध्दा देणेबाबत पत्र दिले व चर्चा केली. झालेल्या चर्चेत चंद्रशेखर बावनकुळे यांनी सदर बाब मी मंत्रीमंडळाच्या बैठकीत पणनमंत्र्यांच्या कानावर घालून याबाबत तात्काळ कार्यवाही करण्याचे आश्वासन खासदार अमर काळे यांना दिले.



खासदार अमर काळे यांनी चंद्रशेखर बावनकुळे यांचेसोबतच महाराष्ट्राचे पणन मंत्री जयकुमार रावल यांना सुध्दा पत्र देऊन त्यांचेकडे चना खरेदीची मर्यादा व मुदतवाढीची मागणी केली असून यासोबतच तूर खरेदी सुध्दा नाफेडने सुरु करावी अशी विनंती पत्राद्वारे केली. नाफेडद्वारा चना खरेदीला २६ मे पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. मुदत वाढीनंतर अनेक शेतकरी आपला चना घेऊन नाफेड खरेदी केंद्रावर गेले असता नाफेडद्वारा चना खरेदीची मर्यादा न संपल्याने नाफेड खरेदी केंद्रावरील चना खरेदी थांबविण्यात आली व सध्या ती बंद आहे. याबाबत माहीती घेतली असता वर्धा जिल्ह्यातील एकुण ९००० शेतकऱ्यांनी नोंदणी केली. पैकी केवळ ४५०० शेतकऱ्यांचाच चना खरेदी करण्यात आलेला आहे. राज्यातील चना खरेदीची एकुण वाढीव मर्यादा वाढीव सह ८१९८८२ मे. टन होती ती पुर्ण झालेली आहे. त्यामुळे नोंदणी केलेल्या जवळपास ५० टक्के शेतकऱ्यांचा चना खरेदी अभावी पडुन आहे. विशेष म्हणजे ४ ते ५ हजार शेतकऱ्यांनी नोंदणीच केली नाही त्यांचाही चना खरेदी अभावी पडुन आहे.

अमरावती जिल्ह्यात जवळपास हीच परिस्थिती असुन एकूण ११५९८ शेतकऱ्यांनी नोंदणी केली. त्यापैकी ४४७९ शेतकऱ्यांचे १२०३२५ मे. टन सोयाबीनची खरेदी करण्यात आली आहे. तर उर्वरित ७११९ शेतकऱ्यांनी नोंदणी करुनही चना खरेदी करण्यात आला नाही. नोंदणी न झालेल्यांची आकडेवारी वेगळीच आहे. खरेदी करीता मुदतवाढ देऊनही खरेदीचा इष्टांक संपल्याने नाफेडद्वारा खरेदीची मुदतवाढ देऊनही केंद्रावरील चना खरेदी बंद आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना जर चना नाफेड केंद्रावर विकता आला नाही तर तो खाजगी व्यापाऱ्यांना विकण्याशिवाय शेतकऱ्यांकडे पर्याय राहणार नाही व यात शेतकऱ्यांची खाजगी व्यापाऱ्यांकडुन दरात मोठी फसवणुक होण्याची शक्यता आहे. तरी शेतकऱ्यांची चना खाजगी व्यापाऱ्यांकडून होणारी फसवणुक टाळण्याचे दृष्टीने नाफेड खरेदी केंद्रावरील खरेदीचा इष्टांक व त्यासोबतच संपुर्ण शेतकरी वर्गाचा माल खरेदी केला जाईल अशा सोयींची मुदतवाढ देण्यात यावी.

## उष्णतेची लाट आणखी चार दिवस

**अमरावती/का.प्र.**



जिल्ह्यात सध्या उष्णतेची लाट वाहत असून, 'रिजनल मेटोरॉलॉजिकल सेंटर, नागपूर' या संस्थेतर्फे जिल्ह्यातील रविवारचे तापमान ४५.८ अं. से. एवढे नोंदविल्या गेले आहे. दरम्यान, उष्णतेची ही लाट आणखी चार ते पाच दिवस कायम राहणार आहे.

गत आठवडभरापासून तापमानाचा पारा सतत ४५ अं. से.च्या पुढेच राहिला आहे. त्यामुळे आजूबाजूला अक्षरशः वनवा पेटला की काय, अशी अनुभूती होत आहे. अशातच दक्षिण अंदमानमध्ये मान्सून पोहोचला असल्याचे भारतीय हवामान खात्याने जाहीर केले आहे. त्यामुळे मान्सून यंदा केरळ किनारपट्टीवर २६ मेच्या आसपास पोहोचण्याची शक्यताही वर्तविली जात आहे. हवामानाचा हा अंदाज लक्षात घेता अमरावती जिल्ह्यासह विदर्भात पुढील चार ते पाच दिवस अर्थात साधारणतः २१ मेपर्यंत उष्णतेची लाट कायम राहण्याची शक्यता आहे, अशी माहिती प्रा. अनिल बंड यांनी दिली.

## मान्सूनपूर्व देखभालीच्या नावावर ६ ते ७ तास वीज गायब

**अमरावती/का.प्र.**

उन्हाचा पारा ४५ अंश सेल्सिअसच्या पार गेल्याने अमरावती शहरात अंगाची लाहीलाही होत आहे. अशा भीषण उन्हाळ्यात शहराच्या अनेक भागांमध्ये रोज तासनतास वीज गुल राहत असल्याने ग्राहकांमध्ये महावितरण प्रशासनाविरोधात तीव्र रोष निर्माण झाला आहे. महावितरणने मान्सूनपूर्व देखभाल व दुरुस्तीची कामे सकाळी ७ ते ११ या वेळेत करण्याचे जाहीर केले असले, तरी प्रत्यक्षात मात्र अनेक भागांत सहा ते सात तास वीज गायब राहत असल्याचे संतापजनक चित्र आहे.

वाढत्या तापमानामुळे विजेच्या मागणीत वाढ झाली. उकाड्यापासून बचावासाठी घरगुती कूलर, एसीचा वापर ग्राहकांमध्ये वाढला आहे. त्यामुळे जिल्ह्यातील मागणीमध्ये वाढ झाली असून, त्यातुलनेत पुरवठा कमी आहे. वाढत्या मागणीमुळे वीज उपकरणांवर येणारा ताण लक्षात घेता तांत्रिक बिघाड होण्याच्या घटना वाढल्या आहेत.

शहरातील एमआयडीसी, गोपाल नगर, अकोली, म्हाडा कॉलनी, गाडगे नगर, साई नगर, अर्जुन नगर, महादेव खोरी, चपराशीपुरा, वडाळी, बिच्चू टेकडी, बडनेरा जुनीवस्ती आणि नवीवस्ती परिसर यासह अनेक स्लम भागांमध्ये एक-दोन दिवसाआड वीजपुरवठा खंडित होत आहे. दुपारच्या अत्यंत उष्ण तापमानात घराबाहेर पडणे अशक्य असताना, घरातही वीज नसल्याने प्रचंड हाल होत आहेत.




महावितरणमार्फत ग्राहकांकडून थकी वीजबिलाची वसुली ज्याप्रमाणे करण्यात येते, त्याच प्रकारे नागरिकांन सुरळीत वीजपुरवठा करणेदेखील महावितरणची जबाबदारी आहे. ग्राहकांना अखंडित वीजपुरवठा महावितरणने उपलब्ध करून द्यावा.

## कुंभार समाजाकडून चंद्रशेखर बावनकुळे यांचा सत्कार

**अमरावती/का.प्र.**

पारंपरिक कुंभार बांधवांसाठी राज्य शासनाने घेतलेल्या ऐतिहासिक आणि महत्त्वपूर्ण निर्णयाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी विदर्भ कुंभार समाज सुधार समितीच्या वतीने राज्याचे महसूलमंत्री तथा अमरावतीचे पालकमंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे साहेब यांचा विशेष सत्कार करण्यात आला. जिल्हाधिकारी कार्यालय येथे हा सत्कार सोहळा पार पडला.



नुकत्याच झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत राज्य शासनाने पिढीजात कुंभार कुटुंबांना मोठा दिलासा देणारा निर्णय घेतला आहे. या नवीन निर्णयानुसार, कुंभार बांधवांना विटा, कौले आणि इतर मातीच्या वस्तू तयार करण्यासाठी वर्षाकाठी ७०० ब्रासपर्यंत माती विनामूल्य आणि कोणत्याही रॉयल्टीशिवाय सरकारी पडीक जमीन तसेच नदी-नाल्यांमधून उपसा करण्याची परवानगी देण्यात आली आहे. या क्रांतीकारी निर्णयामुळे राज्यातील संपूर्ण कुंभार समाजात आनंदाचे वातावरण आहे.या सत्कार सोहळ्याचे आयोजन विदर्भ कुंभार समाज सुधार समिती, श्री संत गोरोबा काका समाजोन्नती समिती आणि श्री संत गोरोबा काका नागरी सहकारी पतसंस्था यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. उपस्थित पदाधिकाऱ्यांनी महसूलमंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे यांना शाल, पुष्पगुच्छ आणि कुंभार समाजाचे आराध्य दैवत श्री संत गोरोबा काका यांची प्रतिमा (फोटो) भेट देऊन त्यांचे जाहीर आभार मानले.

या प्रसंगी समाजातील व विविध संस्थांचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते, ज्यामध्ये विदर्भ कुंभार सुधार समितीचे अध्यक्ष सुधाकर शेंडोकार, उपाध्यक्ष ॲड. गजानन तांबटकर, सचिव सुरेंद्र सरोदे, सहसचिव मधुकर खांडेकर, जिल्हाध्यक्ष सुनिल भागवत, समाजोन्नती समितीचे अध्यक्ष सुरेश नांदुरकर, सचिव डॉ. श्रीरामजी कोल्हे, भाजपा ग्रामीण युवक जिल्हाध्यक्ष सचिन इंगळे, कोषाध्यक्ष सतिश गावंडे तसेच रमेश तांबट, अमोल शेळके, आणि चि. मनित सरोदे आदींचा समावेश होता. शासन आणि कुंभार समाज यांच्यातील हा समन्वय आगामी काळात समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास या वेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

## यशोमती ठाकूर यांची 'गुळतुला'

### गरजू महिलांना शिलाई मशीनचे वाटप

**अमरावती/का.प्र.**



काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या तथा माजी पालकमंत्री ॲड. यशोमती ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. स्थानिक गौरक्षण येथे खासदार बळवंत वानखडे यासह काँग्रेस नेते, पदाधिकाऱ्यांच्या आणि कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न झाला.

यावेळी यशोमती ठाकूर यांची गुळतुला करण्यात आली. गरजू व वंचित महिलांना स्वावलंबी बनवण्याच्या उद्देशाने 'शिलाई मशीन'चे वाटप करण्यात आले. महिलांना हक्काचा रोजगार मिळवून देणाऱ्या व त्यांना आर्थिक आधार देणाऱ्या या उपक्रमाचे कौतुक केले. या कार्यक्रमाचे नियोजन बबलू शेखावत आणि मनपाचे विरोधी पक्षनेते विलास इंगोले यांच्या नेतृत्वात करण्यात आले. सोहळ्याला माजी खासदार अनंत गुढे, शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीप इंगोले, नगरसेवक मिलिंद चिमोटे, अनिल अग्रवाल, भय्या पवार, जयश्री वानखडे, संजय वाघ, विनोद मोदी, आनंद बाबू भामोरे, हरिभाऊ मोहोड, प्रशांत महल्ले, अनिता काळे, लुबना तनवीर, धीरज हिवसे, राजश्री जठाळे, मालता गवई, अर्चना आत्राम, आस्मा फिरोज खान, विक्की वानखडे, सुनीता भेले, ललिता रतावा, संजय शिरभाते, अफसर जहा सादिक शहा, मोहम्मद रेहान, नीलेश गुहे, नितीन काळे, अनिकेत ढेंगळे, वैभव देशमुख आदी उपस्थित होते.

## ४ महिन्यांपासून रखडलेले मानधन खात्यात जमा होणार

**अमरावती/का.प्र.**

यूडीआयडी कार्ड नसल्याचे कारण दर्शवून तसेच तात्पुरते दिव्यांग प्रमाणपत्र असलेल्यांचे मानधन बंद करण्याचा निर्णय सरकारने घेतला होता. आ. बच्चू कडू यांनी यासंदर्भात १९ मे रोजी थेट मंत्रालयात आंदोलनाचा इशारा दिला होता. दरम्यान, राज्य सरकारने दोन्ही वादग्रस्त शासननिर्णय मागे घेतल्याने राज्यभरातील दिव्यांग बांधवांना गेल्या चार महिन्यांपासून रखडलेले त्यांचे मानधन मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे प्रस्तावित आंदोलन मागे घेण्यात येत असल्याचे आ. बच्चू कडू यांनी जाहीर केले आहे.

यूडीआयडी कार्ड नसल्यामुळे मानधन दिले जाणार नाही, असा शासननिर्णय सरकारने काढला होता. तात्पुरते दिव्यांग प्रमाणपत्र असलेल्यांचेही मानधन बंद करण्यात आले होते. गेल्या चार महिन्यांपासून त्यामुळे दिव्यांगांना मानधन मिळालेले नाही. शासन यासंदर्भातील निर्णयांना विरोध करण्यासाठी शिवसेना शिंदे गटाचे आ. बच्चू कडू यांनी येत्या १९ मे रोजी थेट मंत्रालयात तीव्र आंदोलन करण्याचा निर्णय घेतला होता; मात्र शासनाने अखेर नमते घेत दोन्ही निर्णय मागे घेतले आहेत.

# आ.गजानन लवटे यांनी दर्यापूर आगारात दिली अकस्मात भेट

## अधिकाऱ्यांना धरले धारेवर

**खल्लार/वार्ताहर**

दर्यापूरचे आमदार गजानन लवटे यांनी दर्यापूर आगाराला अचानक भेट देऊन आगारातील कर्मचारी यांनी आगार व्यवस्थापक आशिष बाहुलकर यांच्या मनमानी कारभाराबाबत तक्रारी आमदार समोर मांडल्या. कर्मचाऱ्यांनी त्यांच्या व्यथा आमदार गजानन लवटे यांचे समोर मांडल्या असता आगार प्रमुखांनी उडवा उडवीची उत्तरे दिली.



अंजनगाव मार्गावरील दररोज दोन ते तीन बस फेऱ्या दररोज रद्द होत असून प्रवाशांची गैरसोय होत असल्याबाबत आमदार यांनी जाब विचारला असता कर्मचाऱ्यांमुळे होतात अशी खोटी माहिती दिली. प्रत्यक्षात अंजनगावच्या फेऱ्या रद्द करुन अकोट व अमरावती येथे जादा फेऱ्या काढल्या जातात. एस टीचे चालक, वाहक व यांत्रिक कर्मचारी वाढत्या तापमानातही प्रवाशांची सेवा करीत आहे अशा परीस्थिती आगार प्रमुख हे आर्थिक नुकसान करुन दम दाटीची वागणुक देत आहे.त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये आक्रोश निर्माण झाला आहे. दोन महिने अगोदर चालक रमेश मानकर यांनी विभागीय कार्यालय अमरावती येथे आपल्या सहकाऱ्यांसह आमरण उपोषण केले होते. आगार प्रमुख आशिष बाहुलकर यांना दर्यापूर डेपोला तीन वर्षे पूर्ण झाली आहे. त्यांची प्रशासकीय बदली होणे गरजेचे आहे. व त्यांच्या हुकुमशाही कारभारामुळे कर्मचाऱ्यांनीही त्यांच्या बदलीची मागणी केली.यावेळी युवासेना जिल्हाप्रमुख अंकुश कावडकर त्यानी सुद्धा बसेसच्या अनियमत्तेबाबत आगार व्यवस्थापक बाहुलकर यांना चांगलेच धारेवर धरले.आमदारांनी कर्मचाऱ्यांच्या समस्या ऐकुन घेऊन न्याय मिळवून देण्याबाबत ग्वाही दिली.आगारातील कर्मचारी रमेश मानकर, दिनेश गवई ,आषिश उखळकर, सचिन वडाळकर, योगेश कोकाटे यांनी आमदार गजानन लवटे यांचे आभार मानले.यावेळी युवासेना जिल्हाप्रमुख अंकुश पाटील कावडकर, शिवसेना विधानसभा संघटक बबनराव विल्हेकर, युवासेना तालुकाप्रमुख सागर गिरे, किशोर टाले, गुणवंत पाटील गावंडे, दिपक बगाडे, गोपाल खलोकर, अनिकेत खाडे तसेच शिवसैनिक उपस्थित होते.

## संक्षिप्त

### आदिवासी विकासमंत्र्यांची आ.काळे यांच्या निवासस्थानी भेट



**अचलपूर-** राज्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ.अशोक उईके अमरावती जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना मेळघाट मतदार संघातील आरोग्य व्यवस्था संदर्भात आढावा घेतला.यावेळी राज्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ.अशोक उईके यांनी मेळघाट मतदार संघाचे आमदार केवलराम काळे यांच्या निवासस्थानी भेट दिली.यावेळी युवा स्वाभिमान पक्षाचे तालुका कार्याध्यक्ष तमिज शहा यांनी राज्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ.अशोक उईके यांचा शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.यावेळी मेळघाट मतदार संघातील आरोग्य ,शिक्षण व मूलभूत सुविधा उपलब्ध करण्याबाबत युवा स्वाभिमान पक्षाचे तालुका कार्याध्यक्ष तमिज शहा यांनी राज्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ.अशोक उईके यांना निवेदन ही दिले.यावेळी भाजपा पक्षाचे पदाधिकारी ,कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मेगा एमएसएमई क्रेडिट आउटरीच कार्यक्रमात ३० कोटींचे कर्जवाटप



**अमरावती-** सेंट्रल बँक इंडियाच्या वतीने एमएसएमई क्रेडिट आउटरीच कार्यक्रम परतवाडा येथील कंचन टॉवर आणि अमरावती येथील पुंडलिक लॉन येथे पार पडला. यात ३० कोटींचे कर्जवाटप करण्यात आले.परतवाडा येथील कार्यक्रम ग्राहक उत्पादन वितरण असोसिएशनचे अध्यक्ष पंकज गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. अमरावती येथील कार्यक्रमाला सीए असोसिएशनचे उपाध्यक्ष सीए संदीप सुराणा उपस्थित होते. दोन्ही कार्यक्रमाला सेंट्रल बँकेच्या हेड ऑफिसचे जनरल मॅनेजर प्रीति सारस्वत उपस्थित होत्या. त्यांनी उपस्थितांना सेंट्रल बँकेच्या कमी व्याज दरावर उपलब्ध असलेल्या कर्जाचा लाभ घ्यावा असे आवाहन केले.दोन्ही कॅम्पमध्ये ३० कोटी रुपयाचे कर्ज वाटप करण्यात आले. अमरावती क्षेत्रिय प्रमुख सुनील पाण्डेय यांनी प्रास्ताविकातून विविध योजनाची माहिती दिली. श्रीकांत पड़वाड़ यांनी सूत्रसंचालन केले. अग्रणी जिल्हा व्यवस्थापक नरेश हेड़ाऊ यांनी आभार मानले.

### वृत्तबद्ध कविता व गझल लेखन 'कार्यशाळा'

**अमरावती-** काव्यप्रेमी शिक्षक मंचच्या स्थानिक जिल्हा शाखेतर्फे एकदिवसीय 'वृत्तबद्ध कविता व गझल लेखन कार्यशाळा' आयोजित करण्यात आली आहे. काव्यप्रेमी गझल मंचचे अध्यक्ष नामवंत गझलकार विजय जोशी, मुंबई यांच्याकडून इच्छुक कवींना वृद्धबद्ध कविताव गझल शिकण्याची सुवर्णसंधी अमरावती शहरात चालून आली आहे. ७ जून २०२६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत प्रस्तुत कार्यशाळा होणार आहे. कार्यशाळेचा लाभघेणाऱ्यांचा पुढे ३ ते ४ महिने मार्गदर्शक व्हॉट्सॲप समुहात लेखन सराव करवून घेणार आहेत. ही अमरावतीकर लेखकांकरिता मोठी उपलब्धी ठरणार आहे. नोंदणी तरी वृत्तबद्ध कविता व गझल शिकू इच्छिणाऱ्यांनी त्वरित आपली ७३५०६७५२३३ या संपर्क क्रमांकावर करून घ्यावी, असे आवाहन काव्यप्रेमी शिक्षक मंचचे पदाधिकारी वर्षा भांदर्गे, अंजली वारकरी, प्रमोद भागवत, राजेश चौरपगार, खुशाल गुल्हाने आदींनी केले आहे.

### तालुका काँग्रेस अल्पसंख्याक प्रमुखपदी रफीकोदिन सय्यद


**दर्यापूर-** महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी यांच्यावतीने काँग्रेस पदाधिकारी नेमणुकीवर जास्त जोर दिला जात आहे. त्यातच महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी यांनी नवीनच जाहीर केलेल्या दर्यापूर तालुका काँग्रेस अल्पसंख्यांक विभाग अध्यक्ष म्हणून रफीकोदिन सय्यद यांची, तर शहराध्यक्ष कार्यकर्ते म्हणून सामाजिक असलम भाई मन्सुरी यांची निवड केल्याचे एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे जाहीर केले आहे.

### सूर्यगंगा नदीवर शेवाळाचे अतिक्रमण !

**तिवसा -** मोझरी-गुरूदेवनगर या दोन गावाच्या मधोमध वाहणारी सूर्यगंगा नदी सध्या शेवाळ व काटेरी झाडांनी पूर्णतः वेढल्या गेली असून जणू हिरवेगार शेवाळ पाहता यावर अतिक्रमण केले की काय, असे दिसून येत आहे, तसेच नदीकाठच्या लोकांना या साचलेल्या पाण्यामुळे दुर्गंधीच्या सामना करावा लागत आहे. शासन दरवेळी पावसाळ्यातील संभाव्य पुराचा धोका नदीच्या गावांना होऊ नये म्हणून नदी सफाई अभियान व गेलेली याचाच एक भाग मौजा मोझरीमधून सूर्यगंगा नदीचे पात्र रुंदीकरण, खोलीकरण दीड वर्षांपूर्वी लाखोच्या खर्चातून केल्या गेले; मात्र सद्यस्थितीत मोझरी गावालगतच नदीपात्राला बेशरम वनस्पती, काटेरी झुडपे, पाण्यावर तरंगलेले शेवाळाने नदीचा रंग पूर्णतः हिरवा झाला असून गावातील सांडपाणी पात्रात साचल्याने निर्माण होणारी दुर्गंधी जण आरोग्याला धोका निर्माण करणारी ठरली आहे. याकडे प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन पावसाळ्यात पाणी वाहून जाण्याचा मार्ग मोकळा करावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.


## तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

**अचलपूर/वार्ताहर**



शहरातील जीवनपुरा येथील एका युवकाने अचलपूर नाका परिसरातील एका झाडावर गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना अचलपुरात १७ मे रोजी सकाळी उघडकीस आली.वेदांत योगेश रोही (वय २४) असे गळफास घेणाऱ्या युवकाचे नाव आहे. आत्महत्येचे नेमके कारण कळू शकले नाही. याप्रकरणी पोलिसांनी मर्ग दाखल केला. युतकाचे उपजिल्हा रुग्णालयामध्ये शवविच्छेदन करून मृतदेह नातेवाइकांच्या स्वाधीन करण्यात आले.पुढील तपास अचलपूर पोलिस करीत आहेत.

# बहुआयामी व्यक्तिमत्व गिरीश गांधी



**केंद्रीय विदर्भ साहित्य संघाचे नवनिर्वाचित अध्यक्ष गिरीश गांधी यांचा अमरावती येथे आज होणा-या नागरी सत्कार निमित्ताने..**

गत चार दशकापासून सामाजिक, सांस्कृतिक, साहित्यिक व राजकीय क्षेत्रात अग्रेसर असलेले मा.श्री. गिरीश गांधी हे नाव महाराष्ट्राला सर्वदूर सुपरिचित आहे ते विशेषतः वनराई बंधाऱ्यामुळे.त्यांचेमुळेच वनराई बंधारा पॅटर्न महाराष्ट्रात लोकप्रिय झाला व अनेक नदी नाल्यावर हे बंधारे बांधल्यामुळे त्यामार्फत आजतागायत उत्तम प्रकारे जलसंधारणाचे कामात मदत होत आहे.ते संस्थापक अध्यक्ष असलेल्या वनराई फाऊंडेशनने लोकसहभागातून व श्रमदानातून नागपूर जिल्ह्यात कोलार नदीवर असे अनेक वनराई बंधारे बांधून ते सिद्धही केलेले आहे.या वनराई बंधाऱ्यामुळे अनेक शेतकऱ्यांना सिंचनाचाही लाभ होत असतानाच परिसरातील भूजल पातळी वाढण्यासही मदत होत आहे..

यावर्षी त्यांचे न वीस वर्षाच्या प्रदीर्घ कालावधीनंतर झालेल्या या निवडणुकीत त्यांचेवर अनेक आरोप प्रत्यारोप झाले तरी त्यांनी आपला संयम ढळू दिला नाही,आणि आज ते विदर्भ साहित्य संघाच्या अध्यक्षपदी विराजमान आहेत.अंगी लोकसेवेचे ब्रीद मनापासून स्वीकारले आणि विजिगीषु वृत्ती स्वीकारुन कामात झोकून दिले की त्या कामात यश हे येतेच. नागपूर जिल्ह्यातील थडी पवनी सारख्या लहानशा खेड्यातून आलेला,नागपूर ह्या महाराष्ट्राच्या उपराजधानीत स्थायिक झालेला सेवाभावी वृत्ती व अंगभूत कार्यकौशल्याने अनेक यशोशिखरे पादाक्रांत करीत आज आकाश कवेत घेऊन आहे.

मा. गिरीश गांधी यांनीही जागृत नवयुवक शैक्षणिक संस्थेच्या व समाजसेवेच्या माध्यमातून अनेक तरूणांचे जीवन प्रकाशमान केलेले आहे.महाराष्ट्र विधान परिषदेचे सदस्य म्हणून त्यांनी केलेले कामही प्रशंसनीय आहे.त्या काळात एकात्मिक ग्रामीण विकास यंत्रणा महाराष्ट्र शासन यांच्या मोहिमे अंतर्गत त्यांनी नागपूर जिल्ह्यातील 'मानेगाव' हे खेडे दत्तक घेऊन माती व जलसंधारणाचे महत्व ग्रामस्थांना पटवून देत 'नसबंदी, नशाबंदी, कुऱ्हाडबंदी, चराईबंदी व श्रमदान' या पंचसूत्रीच्या आधारे त्यांनी आदर्श गावाची निर्मिती केलेली आहे.

राजकारण क्षेत्रातील व्यक्तींना दिला जाणारा 'झाकीर हुसेन मेमोरियल नॅशनल अवॉर्ड - २००९' हा त्यांच्या नैतिक राजकारणाचा विजय मानला जातो.वनराई तर त्यांचा आवडता विषय आहेच, वृक्ष मित्र समितीच्या माध्यमातून नागपूर व इतरत्रही रस्त्याच्या दुतर्फा झाडे लावून त्यांनी पर्यावरण जागृती केलेली आहे.तसेच त्यांनी वनराईच्या माध्यमातून कामठी जि. नागपूर येथील सैनिकी छावणीतील जवानांच्या मदतीने तेथील छावणी क्षेत्रात मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करुन परिसर हिरवागार करण्यास सहाय्य केलेले आहे. एवढेच नव्हे तर नागपूर मधील मध्यवर्ती भागात असलेल्या सीताबर्डी किल्ला टेकडीवर सुद्धा तेथील सैनिकांना मार्गदर्शन करुन त्यांच्या मदतीने टेकडी परिसर झाडे लावून हिरवागार केला.तेथील हिरवळ आजही त्याची ग्वाही देत उभी आहे.

संयुक्त वन व्यवस्थापन, पाण्याचे रक्षण व संवर्धन करण्यासाठी तसेच राज्याचे सांस्कृतिक धोरण ठरविणाऱ्या उच्चाधिकार समितीचेही ते सदस्य राहिलेले आहेत.महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण नियंत्रण मंडळावरही त्यांनी काम केलेले आहे.पर्यावरणाच्या कामात स्वतःला वाहून घेतल्यामुळे त्यांचे कार्याची दखल घेवून त्याकरिता त्यांच्या वनराई फाऊंडेशनला पर्यावरण क्षेत्रातील प्रतिष्ठेचा मानला जाणारा सन १९९७-९८ चा महाराष्ट्र शासनाचा 'बेस्ट एनजीओ' पुरस्कार त्यांच्या वनराई फाऊंडेशनला प्राप्त झालेला आहे.पर्यावरण रक्षण

**✍ आबासाहेब कडू**

करण्याच्या कामासाठी दिला जाणारा 'इंदिरा गांधी पर्यावरण पुरस्कार-२००१',वृक्षरोपणा साठीचा 'राधाकृष्णन पुरस्कार' तसेच पृथ्वीवर हिरवळ वाढवून मृद संधारणासाठी केलेल्या उपाययोजनासाठी फ्रेन्डशीप सोसायटी ऑफ इंडिया तर्फे दिला जाणारा 'ग्लोरी ऑफ इंडिया' अवार्ड सुद्धा प्राप्त झालेला आहे. असे अनेक पुरस्कार त्यांना व वनराई फाऊंडेशनला मिळालेले आहेत ते केवळ त्यांच्या समाज सेवेतील व पर्यावरण क्षेत्रात सातत्याने करीत असलेल्या सेवेमुळे.मग ते गरजू महिला व मुलांच्या रुग्णसेवेसाठी व निवाऱ्यासाठी स्थापन केलेले 'मानव मंदिर' असो, शेतकऱ्यांचे प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी स्थापन केलेले 'कृषी विकास प्रतिष्ठान' असो. महाराष्ट्र राज्य कापूस उत्पादक संघाचेही ते काही काळ संचालक होते.कृषी क्षेत्रातील विशेष कामगिरीसाठी त्यांना 'वसंतराव नाईक राज्यस्तरीय कृषी पुरस्कार' सुद्धा प्राप्त झालेला आहे.

गडचिरोली जिल्ह्यातील नक्षलग्रस्त भागात दि. २० मार्च ते १४ एप्रिल २००६ या कालावधीत 'असराली ते गडचिरोली' ही ३२५ कि.मी. ची लोकयात्रा काढून महात्मा गांधीजींच्या तत्वाधारीत शांती व अहिसेंचा संदेश पोहोचविण्याचे महत्वाचे कार्य त्यांनी त्या संवेदनशील भागात केलेले आहे.

महिला उद्धारासाठी चालविलेले 'स्मिता स्मृती' नियतकालिक,पर्यावरण रक्षण जागृतीसाठी 'ग्रीन होप' मासिक, 'विदर्भ लोकनायक' मराठी साप्ताहिक, तरुणांना मार्गदर्शक ठरणारे 'नया खून' हिंदी साप्ताहिक, दररोजच्या घडामोडीवर आधारित बातमीपत्रासाठीच्या 'नागपूर पोस्ट' सायं. दैनिकाचे ते संपादक आहेत. सर्वांचा उद्देश एकच, आणि तो म्हणजे अविरत समाजसेवा व पर्यावरण रक्षणासाठीची जनजागृती.

शिक्षण क्षेत्रातील त्यांचे कार्यही प्रशंसनीय आहे.महाराष्ट्रातील अनेक नामवंत शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्य करणाऱ्या संस्थेशी त्यांचा जवळचा संबंध राहिलेला आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने त्यांना 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जीवन साधना पुरस्कार -२००९' देऊन सन्मानित केलेले आहे.

१९७० साली जागृत नवयुवक शिक्षण संस्था,ता.वरुड जि. अमरावतीची स्थापना करुन ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना त्यांनी विद्येचे दालन उपलब्ध करुन दिल्यामुळे ग्रामीण विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची पायाभरणी उत्तम प्रकारे होत गेली.वरुड व सातपुडा पायथ्याच्या ग्रामीण दुर्गम भागातील युवकांच्या शैक्षणिक जडणघडणीत या संस्थेचे मोलाचे योगदान आहे.तसेच वरुड जि. अमरावती येथे 'वाल्मिकी सहकारी गृहनिर्माण संस्थेची' स्थापना करुन त्या माध्यमातून वाल्मिकी समाज व सफाई कामगारांसाठी निवारा उपलब्ध करुन देण्याचे त्यांचे कार्य कौतुकास्पद आहे. राजस्थानी सेवा समिती वरुडचेही ते मार्गदर्शक आहे.मारवाडी फाऊंडेशन नागपूर मार्फत मारवाडी समाजाकरिता त्यांचे कार्य सुरुच आहे.

साहित्यिक क्षेत्रातही ते अनेक वर्षापासून कार्यरत आहेत.केंद्र सरकार मान्यताप्राप्त अखिल भारतीय हिंदी साहित्य संघ, नागपूर शाखेचे ते अध्यक्ष असून जागतिक मराठी अकॅडमीचेही ते उपाध्यक्ष आहेत. अखिल भारतीय नाट्य परिषदेच्या नागपूर शाखेचे अध्यक्ष असताना नाट्यप्रयोग व अनेक सांस्कृतिक उपक्रम त्यांनी यशस्वीरित्या पार पाडले.नागपूरात विदर्भ नाट्य संमेलन यशस्वी करण्याचे प्रथम श्रेयही त्यांनाच जाते.भाऊंना पुनश्च शुभेच्छा व मन:पूर्वक अभिनंदन!

अमरावती

# बारावीनंतरचे करिअर...

आजच्या काळात बारावी विज्ञान शाखेचा निकाल लागला की बहुतांश विद्यार्थी आणि पालकांच्या मनात फक्त दोनच शब्द घोळत असतात – 'डॉक्टर' किंवा 'इंजिनियर'. जणू विज्ञान शाखेत प्रवेश घेतला म्हणजे आयुष्याचे हे दोनच रस्ते उपलब्ध आहेत, अशी मानसिकता आपल्या समाजात गेली अनेक दशके तयार झाली आहे. परिणामी, अनेक विद्यार्थी स्वतःची बौद्धिक क्षमता, आर्थिक परिस्थिती, आवड-निवड आणि भविष्यकालीन संधी यांचा विचार न करता नीट,जेईई, सीईटी (NEET, JEE, CET) यांच्या शर्यतीत उतरतात.


जे महाग ते चांगले अशी एक विचित्र मानसिकता आपल्याकडे आढळते. परिणामी जे शिक्षण महाग आहे ते चांगले शिक्षण आहे असा समज पालक आणि विद्यार्थी यांच्यात आढळतो आणि विद्यार्थी विनाअनुदानित शिक्षणाच्या जाळ्यात अलगद सापडतो. लाखों रुपये खर्च करून विद्यार्थी अभियांत्रिकीची पदवी हातात घेऊन नोकरीसाठी फिरताना आपल्याला दिसतात. सोसतही नाही आणि सांगताही येत नाही, अशा अवस्थेत विद्यार्थी जातात. अपरिहार्यपणे पंधरा–वीस हजाराची नोकरी हे फलित काही लाख रुपये आणि तब्बल पाच वर्षे खर्च करून हाती पडते.

उच्च दर्जाचे, चांगल्या करियरच्या संधी असणारे शिक्षण सरकारी पैशाने उपलब्ध आहे याची गंधवार्ता ना पालकांना आहे ना विद्यार्थ्यांना. प्रचलित अनुदानित शिक्षणव्यवस्थेमध्ये रोजगाराच्या चांगल्या संधी असणारे उच्च शिक्षणाचे अनेक पर्याय उपलब्ध आहेत. दुर्दैवाने याची नीट माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहचत नाही. देशात असा अनेक संस्था आहेत जिथे शिकणाऱ्याला विद्यावेतन दिले जाते.

परंतु प्रत्येक विद्यार्थ्याला डॉक्टर किंवा इंजिनियर होणे शक्य नसते आणि गरजेचेही नसते. उलट, अनेक वेळा लाखो रुपये खर्च करूनही अपेक्षित यश मिळत नाही. त्यानंतर विद्यार्थी आणि पालक दोघेही मानसिक, आर्थिक आणि भावनिक तणावाखाली जातात. अशा वेळी शांतपणे विचार केला तर विज्ञान शाखेतच एक अत्यंत प्रभावी, कमी खर्चिक, गुणवत्तापूर्ण आणि भविष्यात प्रचंड संधी उपलब्ध करून देणारा मार्ग आपल्या समोर उभा असतो- तो म्हणजे बी. एस्सी. आणि विशेषतः बी. एस्सी.संख्याशास्त्र !

Statistics हा करिअरचा असाच एक अद्याप फार प्रसिद्ध नसणारा गुप्त मार्ग आहे. या विषयाचे शिक्षण बी. एस्सी. पदवीमध्ये आपल्या नजीकच्या विज्ञान महाविद्यालयात उपलब्ध असते.

हा एक अनुदानित विषय असल्याने अत्यंत नाममात्र फी मध्ये संख्याशास्त्र या विषयात पदवी घेता येते. विशेषतः ग्रामीण भागात अद्यापही या विषयाचे महत्व आणि संधी विद्यार्थ्यांपर्यंत पोहचल्या नाहीत. अभियांत्रिकी नंतर आयटी इंडस्ट्री मध्ये ज्या नोकऱ्या विद्यार्थी करू इच्छितात, त्या सर्व नोकऱ्या एम. एस्सी. ( संख्याशास्त्र) च्या विद्यार्थ्यांना उपलब्ध आहेत याची माहिती आपल्याला नसते.




आज कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence), मशीन लर्निंग (Machine Learning), डेटा सायन्स (Data Science), बिग डेटा (Big Data), डेटा ॲनालिटिक्स (Data Analytics), बँकिंग, विमा, शेअर मार्केट, आरोग्य, हवामान, उद्योग, सरकारी योजना, संशोधन, जनगणना, निवडणुका, मोबाईल ॲप्स, सोशल मीडिया अशा प्रत्येक क्षेत्रात 'डेटा' हेच नवीन युगाचे इंधन बनले आहे. आणि या डेटाचा अभ्यास, विश्लेषण, निष्कर्ष आणि भविष्यवेध घेणारे शास्त्र म्हणजे - 'संख्याशास्त्र'.

आज जगातील मोठमोठ्या कंपन्या जसे Google, Microsoft, Amazon, Meta, Infosys, TCS, Wipro, Accenture यांना मोठ्या प्रमाणावर Data Analyst, Data Scientist, Business Analyst, AI Specialist अशा तज्ज्ञांची गरज आहे. या सर्व क्षेत्रांचा पाया हा संख्याशास्त्र वर आधारित आहे. त्यामुळे B.Sc. Statistics करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी भविष्यातील करिअरच्या दारांवर अक्षरशः सोन्याची कडी लागलेली आहे.

विशेष म्हणजे, या क्षेत्रात केवळ हुशार विद्यार्थ्यांनाच संधी मिळते असे नाही. सातत्याने अभ्यास करणारा, संगणकाचे मूलभूत ज्ञान असणारा आणि गणित-तर्कशक्ती वापरणारा कोणताही विद्यार्थी या क्षेत्रात उत्कृष्ट करिअर करू शकतो. आज अनेक विद्यार्थी बी. एस्सी.संख्याशास्त्र नंतर एम. एस्सी. (संख्याशास्त्र) , डेटा सायन्स, कम्प्युटर अपलिकेशन्स कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग, एम.सी.ए. ,एम.बी.ए., विमा शास्त्र अशा क्षेत्रात जाऊन लाखो रुपयांचे पॅकेज मिळवत आहेत.

एकेकाळी 'B.Sc. म्हणजे फक्त शिक्षक होणे' अशी जी चुकीची समजूत होती ती आता पूर्णपणे बदललेली आहे. आज संख्याशास्त्र विषयाचा उपयोग उद्योग, IT कंपन्या, संशोधन संस्था, सरकारी विभाग, बँका, विमा कंपन्या, औषधनिर्मिती उद्योग, शेअर बाजार, ई-कॉमर्स, डिजिटल मार्केटिंग, क्रिकेट आणि क्रीडा विश्लेषण अशा सर्व क्षेत्रांमध्ये होत आहे.

आज IPL मधील खेळाडूंचे विश्लेषण असो, Amazon वर आपल्याला दाखवले जाणारे products असोत, YouTube किंवा Netflix चीecommendation system असो, हवामानाचा अंदाज असो किंवा निवडणुकीचे Exit Polls असोत- या सर्वामागे संख्याशास्त्र आणि Data Science कार्यरत असते.

खासगी क्षेत्राबरोबरच सरकारी सेवात खास Statistics च्या पदवी धारकांसाठी राखीव असणाऱ्या अनेक नोकऱ्या राज्य केंद्र सरकार मध्ये उपलब्ध आहेत. Indian Statistical Serviमे ही परीक्षा तर वर्ग-१ दर्जाचा अधिकारी होण्याची संधी Statistics च्या विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देते. स्टॅटिस्टिक्स हा एकमेव असा विषय आहे ज्याचे केंद्र सरकार मध्ये स्वतंत्र मंत्रालय आहे.

महत्त्वाची गोष्ट म्हणजेँ.एम. चे शिक्षण हे सरकारी अनुदानित महाविद्यालयांमध्ये अत्यल्प खर्चात उपलब्ध असते. ग्रामीण आणि तालुकास्तरावरसुद्धा हे शिक्षण सहज उपलब्ध आहे. त्यामुळे गरीब आणि मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांनाही स्वतःच्या घरी राहून दर्जेदार शिक्षण घेता येते. इंजिनियरिंगच्या एका वर्षाच्या फीमध्ये विद्यार्थी B.Sc. पासून M.Sc. पर्यंतचे संपूर्ण शिक्षण पूर्ण करू शकतो.याउलट, अनेक पालक कर्ज काढून मुलांना खासगी मेडिकल किंवा इंजिनियरिंग कॉलेजमध्ये प्रवेश देतात. लाखो रुपयांचा खर्च, वसतिगृह, जेवण, कोचिंग, प्रवास या सर्वांचा आर्थिक ताण कुटुंबावर पडतो.

# शेतकऱ्यांचे नियोजित शोषण थांबवा

**मा.जोसेफ विजयजी,**
**मुख्यमंत्री, तामिळनाडू राज्य, चेन्नई**

**विषय: आयात शुल्क हटवण्याची मागणी कोट्यवधी शेतकरी आणि मजुरांवर अन्यायकारक.**

**विनम्र अभिवादन,**

तामिळनाडूचे मुख्यमंत्री म्हणून तुमची निवड ही आमच्यासाठी अत्यंत आनंदाचा क्षण आहे.देशाच्या राजकारणासाठी वेगवेगळ्या राज्यांमध्ये वेगवेगळ्या पक्षांचे सरकार असणे आवश्यक आहे.

हे पत्र लिहिताना मला या गोष्टीचे दुःख होत आहे की, तुम्ही देशाचे पंतप्रधान मोदीजी यांना पत्र लिहून कापूस आयातीवरील ११ टक्के आयात शुल्क २६ टक्क्यांपर्यंत वाढवण्याची मागणी केली आहे. ही मागणी कापूस उत्पादक शेतकरी आणि मजुरांच्या विरोधात आहे. ही मागणी आज तामिळनाडू चे '(तमिळगा विवसयीगल संगम)'तर्फे केली जात आहे. दिवंगत नेते नारायणस्वामी नायडू हयात असते, तर त्यांनीही तुमच्या मागणीला विरोध केला असता.

गो-या ब्रिटिशांनी 'कापूस स्वस्त आणि कपडा महाग' ही नीती राबविली,जी आजही अंमलात आहे. कच्च्या मालाच्या शोषणातून भांडवल जमा करणे हे आजही अपेक्षित आहे. माननीय विजयजी, तुम्ही दिलेला युक्तिवाद की ५४,७०० रुपये प्रति खंडी गाठीची किंमत ६७,७०० रुपये झाली आहे. कॉटन यार्नची किंमत ३०१ ते ३३० रुपये प्रति किलो झाली आहे. हे बरोबर आहे पण, या किमतीकडे लक्ष द्या. कारण अमेरिकेत किमती वाढल्या आहेत. यावर्षी अमेरिकेत कापसाची किंमत जी ७०-७५ सेंट प्रति किलो होती ती ९५-९८ सेंट प्रति किलो झाली आहे. आम्ही तुम्हाला आणखी एक माहिती देतो, तीन वर्षांपूर्वी भारतातील शेतकऱ्याला कापसासाठी ९,०००-१०,००० हजार रुपये मिळत होते. त्यावेळी कापसाची किंमत एक लाख रुपये प्रति किलो होती. मग याच कापड उत्पादकांनी कापडाच्या किमती वाढवल्या. यापैकी अनेक कपड्यांच्या किमती ४०,०००-५०,००० हजार रुपयांपर्यंत खाली आल्यानंतरही त्यांनी किंमती कमी का केल्या नाहीत? कापड अजूनही महाग आहे. गरिबांना ४० रुपयांना मिळणारे बनियान आता १००-१५० रुपयांना मिळत आहे. ही लूट नाही का ?

या विषयावर चर्चा करण्यासाठी तुम्हाला भेटायचे आहे. आम्ही तुमच्या सहकारी, उद्योगमंत्री सुश्री कीर्तनाजी यांना विनंती करतो की, त्यांनी या पत्राचे भाषांतर करून ते तुम्हाला समजावून सांगावे. शेतकऱ्यांना आणि मजुरांना तुमच्या पाठिंब्याची गरज आहे. धन्यवाद आणि शुभेच्छा.

**विजय जावंधिया**
किसान संगठन कार्यकर्ता
मो.९४२२७२७९९८

# समाजकार्य पदवीवर इतर पदव्यांचा डल्ला...

शासनाच्या कार्यालयात काम करून पैसे मिळवून आपले आयुष्य सुधारल्या जाईल या अपेक्षेने युवाशक्ती शिक्षणात सर्वस्व पणाला लावतात. ग्रामीण भागातील युवा पिढीला जास्तीत जास्त शासकीय नोकरीत जाण्याची इच्छा असते.कारण शेती,मजुरी आणि इतर कामे करून आर्थिक सुरक्षितता तसेच सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त होत नाही, म्हणून शिकून हुद्दा मिळावा. यासाठी देशभरात युवाशक्तीची स्पर्धा सुरू असते. त्यासाठीच वेगवेगळी राज्य विविध विभागात नोकर भरतीसाठी परीक्षांचे आयोजन करतात.राज्याला किंवा देशाला शासनाच्या कामासाठी विविध विभागात मनुष्यबळाची गरज असते.म्हणून वेतनाची सोय शासन करते.याबद्दलचे शहाणपण विद्यार्थी लक्षात ठेऊन परीक्षा पास करून नोकरी मिळवण्याचा प्रयत्न ही करतात.

विविध विभागाच्या विविध पदावर निवड करताना त्या-त्या विभाग किंवा सेवेची माहिती अथवा त्या-त्या विभागाचे कौशल्य किंवा त्या पदासाठीच्या पदवीची पात्रता नेमण्यात येते.म्हणून त्या त्या विभागासाठी आवेदन पत्र निघत असताना आवेदकांची शैक्षिणक अर्हता निश्चित केल्या जाते.त्यांची तयारी करून घेण्यासाठी विविध कोचिंग तथा स्पर्धा परीक्षा केंद्र खाजगी स्वरूपात जास्तीत जास्त निर्माण झाली. स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करताना त्याचा अभ्यासक्रम बदलत जातो तसा त्याचा ढाच्याही बदलतो.मग विद्यार्थ्यांना त्याचा सामना करण्यासाठी हेच स्पर्धा परीक्षा केंद्र सोईचे ठरतात. मार्गदर्शक सुद्धा त्यानुसार गाईडलाइन देतात.

ही सर्व स्पर्धा सुरू असताना कुणी कुठल्या पदासाठी अर्ज करावा याची सुद्धा नियोजित ट्युशन घेतली जाते. आता ही सर्व सुविधा असताना स्पर्धा परीक्षा असो की सरळ भरती सेवा परीक्षा असो ! विद्यार्थी तयार असतोच. मात्र शासनाचा सावत्र भाव जेव्हा तयार होतो तेव्हा विद्यार्थ्यांच्या हक्कावर अन्याय झालेला बघवत नाही.त्यामुळे त्या विद्यार्थ्याचे म्हणणे समजून घ्यावे अशी अपेक्षा केली जाते.त्यावेळी राजकीय हितचिंतक ह्यात इंटरेस्ट घेतात व त्याचा लाभ स्वतःची प्रसिद्धी करून घेण्यासाठी करतात.ही एक परंपरा दिवसेंदिवस वाढत चाललेली आहे.



कारण नुकतीच समाज कल्याण विभागाची जाहिरात प्रसिद्ध झाली.त्यासाठी अर्हता हा समाजकार्य पदवीधर किंवा समाजकार्य पदव्युत्तर विद्यार्थी असावा,अशी अट असताना,जेव्हा कुठल्याही पदवीची (एनी ग्रॅज्युएशन)अट लावून समाज कल्याण विभागाच्या हक्काच्या जागा इतर पदवीधारकांना लाटण्याचा प्रकार उघडकीस आला.तेव्हा समाजकल्याण सारख्या विभागात समाजकार्य पदवी घेतलेल्या विद्यार्थ्यांनी काय करावे? म्हणजे त्यांचे प्रश्न सुटतील व त्यांचा शिक्षणाला न्याय मिळेल.

कारण एकीकडे राज्यात ६८ समाजकार्य महाविद्यालये आहेत. त्यापैकी जवळ पास ५०% महाविद्यालये अनुदानित असून त्यांना १००% अनुदान मिळत असून शिक्षक- शिक्षकेत्तर कर्मचारी सर्व शासनाने उभारून लाखो विद्यार्थी घडवले.त्यात त्यांचाकडून समाजाचे अध्ययन करून, प्रकल्प तसेच सामाजिक अडचणींवर मात करणारे उपक्रम सुद्धा राबवले.ह्या विद्यार्थ्यांचे विविध स्तरावरील ज्ञान व अनुभव हे सामाजिक जाणिवांच्या आधारावर जास्त अवलंबून आहेत.कारण अभ्यासक्रमात प्रत्यक्ष अनुभवासाठी क्षेत्रीय काम करण्यासाठी त्यांचा अभ्यास घेण्याची तरतूद त्यात आहे.त्यानुसार त्यांचे गुणांकन होते.

समाजकल्याण सारख्या शासकीय सेवा देण्यासाठी त्यांची पात्रता निश्चित असताना इतर एकांगी पदवी प्राप्त विद्यार्थ्यांना ते नसू शकते.एवढा तर्क सर्वसाधारण आहे.त्यामुळे समाजकल्याण सारख्या पदावर समाजकार्य पदवीचा हक्क असताना त्यांना डावलून अन्य पदवीचा भडिमार करून त्यांच्या शिक्षणाचा बट्ट्याबोळ झाल्यास समाजात काय निर्माण होऊ शकते?याकडे शासनाचे लक्ष असावे.नेपाळकडे जाणारा मार्ग डोक्यात जाण्यापूर्वी शासनाने दखल घेणे महत्वाचे आहे.असे पत्रक वाचताना 'एक इशारा काफी हैं समजने वालो को' असा डायलॉग आठवते. कारण हेच समाजकार्य शिक्षण घेण्यासाठी स्वतंत्र भारतात पूर्वपरीक्षा देऊन प्रवेश मिळवला जायचा त्यावेळी हीच परीक्षा जवळपास वैद्यकीय परीक्षेच्या समकक्ष होती.त्यातून मानसशास्त्र विभागाला व सामाजिक क्षेत्राला दिग्गज व्यक्ती लाभले.त्यात बऱ्याच प्रमाणात राजकीय पुढारी यांचा समावेश आहे.ही बाब आमच्या शासनाने सुध्दा हेरली पाहिजे.कारण व्यक्तित्वाचा विकास समाजातून होतो.त्यासाठी समाज कल्याणाचे लक्ष ठेवताना त्याच शिक्षणाचा उपयोग योग्य असण्याची क्षमता म्हणजे समाजकार्य होय.सध्याच्या परिस्थिती ला अनुकूल असण्यासाठी विद्यार्थी कसा केंद्रभूत राहील हा विचार सुध्दा समाजाचा विषय आहे.

**डॉ.प्रवीणकुमार राऊत**
सदस्य-भारत सेवक समाज
मो.७७९८६४५५६५

# नीट परीक्षा घोटाळ्याविरोधात युवक काँग्रेस आक्रमक

## ▶▶| अकोल्यात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन
## ▶▶| धर्मेंद्र प्रधान यांच्या छायाचित्राचे दहन

■ प्रतिनिधी | अकोला ■

देशभरातील तब्बल २२ लाख विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित नीट परीक्षा घोटाळा व पेपर लीक प्रकरणाच्या निषेधार्थ अकोला जिल्हा युवक काँग्रेसच्या वतीने सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालय चौकात तीव्र आंदोलन करण्यात आले. आंदोलनादरम्यान केंद्र सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली तसेच केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या छायाचित्राचे दहन करून निषेध व्यक्त करण्यात आला.

हे आंदोलन अकोला शहर युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष आकाश कवाडे यांच्या नेतृत्वाखाली पार पडले. यावेळी अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघाचे आमदार साजिद खान पठाण यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच अकोला जिल्हा युवक काँग्रेसचे प्रभारी सागर कलाने यांच्या मार्गदर्शनाखाली आंदोलन करण्यात आले.



युवक काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी नीट परीक्षेतील कथित भ्रष्टाचाराची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. विद्यार्थ्यांना न्याय मिळावा आणि भविष्यात अशा प्रकारच्या घटना घडू नयेत, यासाठी केंद्र सरकारने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. या आंदोलनात कपिल रावदेव, राहुल सारवण, पराग कांबळे, अंकुश तायडे, मो. शारिक, नगरसेविका सुवर्णा जाधव, कशिश खान, विजय जामनिक, सोहल खान, अभिजित तवर, सारंग शिंदे, शेख अर्शद, सलीम अली, ऋषी जामोदे, सागर आत्तारकार, शुभम हिराळकर, तेजस देवबाळे, मुकुंद सरनायक, हर्ष ढोरे, अंकुश भेंडेकर यांच्यासह युवक काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते व मोठ्या संख्येने विद्यार्थी सहभागी झाले होते.

## ...थोडक्यात...

### जिल्ह्यात उष्णतेची लाट; हवामान विभागाचा इशारा; नागरिकांनी दक्षता घेण्याचे प्रशासनाचे आवाहन

**अकोला :** नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागातर्फे दि. १८ मे ते दि. २३ मे दरम्यान अकोला, तसेच विदर्भातील इतर जिल्ह्यांमध्ये उष्णतेची लाट राहण्याची शक्यता आहे. त्यानुसार आवश्यक दक्षता घेण्याबाबत आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

नागरिकांनी दुपारी १२ ते ४ या कालावधीत उन्हात बाहेर जाणे टाळावे, बाहेर तापमान अधिक असल्यास शारीरिक श्रमाची कामे टाळावीत, उन्हात वाहने शक्यतो चालवू नये, ज्वलनशील पदार्थापासून शक्यतो दूर राहावे, लहान मुले व पाळीव प्राण्यांना गेट बंद असलेल्या वाहनात तसेच पार्क केलेल्या वाहनात ठेवू नयेत, तहान लागलेली नसली तरी जास्तीत जास्त पाणी पिण्यात यावे, अशक्तपणा, स्थूलपणा, डोकेदुखी, सतत येणारा घाम इत्यादी उन्हाचा झटका बसण्याची चिन्हे ओळखावीत व चक्कर येत असल्यास तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घेण्यात यावा, पशुधनास तसेच पाळीव प्राण्यांना छावणीत ठेवण्यात यावे. तसेच त्यांना पुरेसे पिण्याचे पाणी देण्यात यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### ओमनाथ वाडेकर यांची अध्यक्षपदी नियुक्ती



**अकोला :** पारंपारिक लोक वैद्य पारंपारिक वनौषधी लोक वैद्य चिकित्सा संवर्धन प्रशिक्षण बहु रिसर्च फाउंडेशन या संस्थेची नुकतीच स्थापना झाली. त्यानुसार संस्थेचे संस्थापक मंडळ स्थापन करण्यात आले. सर्वानुमते वैद्य ओमनाथ वामनराव वाडेकर यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली. अध्यक्षांच्या परवानगीने उपाध्यक्षपदी उमेश शेळके, सचिवपदी वैद्य सुनिता वाडेकर, सहसचिवपदी सुग्रीवदास श्रीपत देवकर, कोषाध्यक्षपदी राजेंद्र गुजर, सदस्य अजय जागीरदार, मुकेश वाडेकर, पूजा वाडेकर, गजानन अंबूलकर, संतोष बांगर, मेघा ठाकरे यांची निवड करण्यात आली. सदर वैद्य समाजाच्या सभेमध्ये संस्थेची स्थापना करण्यात आली. सभेमध्ये संस्थेचे उद्दिष्ट, पारंपारिक लोकवैद्यांचे संवर्धन व प्रशिक्षण शिबिर जनजागृती व आरोग्य संबंधी मेळावा घेणे बाबत एक जुटीचे फायदे या विषयावर चर्चा करण्यात आली. सभेचे अध्यक्ष सुग्रीवदास देवकर पंढरपूर यांनी सभेची सुरुवात करून सर्व सदस्यांचे अभिनंदन केले. राजेंद्र गणपत गुजर यांनी आभार प्रदर्शन केले असे प्रसिद्धी पत्रकाव्दारे अजय जागीदार यांनी कळविले आहे.

# सिलेंडर मिळत नसल्याच्या तक्रारीची थेट पंतप्रधानांकडून दखल

## अकोल्यातील डॉ. मनोहर पेठकर यांनी केला होता फोन

■ प्रतिनिधी | अकोला ■

जेव्हा समाजसेवक अण्णा हजारे प्रणित भ्रष्टाचार विरोधी जनआंदोलनाचे महानगर अध्यक्ष डॉ. मनोहर पेठकर यांनी सिलेंडर मिळावे म्हणून दि. २५/०३/२०२६ रोजी ऑनलाईन नंबर लावला होता. परंतु एक महिना होऊन गेला तरीही सिलेंडर मिळत नव्हते.

तेव्हा त्यांची दि. २७/०४/२०२६ रोजी जिल्हाधिकारी यांना संबंधित विषयांचे निवेदन दिले होते. त्यावर जिल्हाधिकारी यांनी कुठलीही कार्यवाही केली नाही. त्यानंतर डॉ. मनोहर पेठकर यांनी दि. ०२/०५/२०२६ रोजी थेट देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना फोन केला आणि मोठे आश्चर्य झाले. पंतप्रधानांनी त्यांची दखल घेतली आणि संबंधित प्रशासन खडबडून जागे झाले. दिल्ली पासून ते नागपूरच्या संबंधित कार्यालयाद्वारे डॉ. मनोहर पेठकर यांना फोन येणे सुरु झाले आणि आठ दिवसात डॉ. मनोहर पेठकर यांच्या घराचा पत्ता विचारत सिलेंडरची गाडी घरी आली आणि घरपोच सिलेंडर देऊन गेली. सामान्य माणसाच्या तक्रारीची सुद्धा पंतप्रधानांनी दखल घेतली आणि आपण सामान्य जनतेसाठी काम करत असल्याचे उदाहरण पंतप्रधानांनी सर्व जनतेला दिले. या आधी सुद्धा डॉ. मनोहर पेठकर यांनी पंतप्रधान मा.श्री. नरेंद्र मोदी यांचे कडून अनेक कामे मंजूर करुन घेतली. या मध्ये रस्त्यांचे रुंदीकरण करणे, मोठ्या प्रमाणात असलेला अतिक्रमणाचा प्रश्न, महानगरपालिकेचे प्रश्न सामिल आहेत.

# गॅरेजसमोर उभ्या वाहनांना भीषण आग

## उमेश इंगळे यांच्या प्रसंगावधानामुळे मोठी दुर्घटना टळली

■ प्रतिनिधी | अकोला ■

शहरातील वाशिम बायपास रोडवरील बुद्ध नगरीजवळ असलेल्या समीर गॅरेजसमोर उभ्या असलेल्या वाहनांना अचानक आग लागल्याची घटना सोमवारी सकाळी घडली. या आगीत दोन चारचाकी वाहनांचे नुकसान झाले असून, विद्युत रोहित्रालाही आग लागल्याने परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र सामाजिक कार्यकर्ते उमेश इंगळे यांच्या तत्परतेमुळे मोठी दुर्घटना टळली.



माहितीनुसार, सोमवारी सकाळी सुमारे ६.४५ वाजताच्या सुमारास समीर गॅरेजसमोर विद्युत डीपी (रोहित्र) लगत उभ्या असलेल्या एका चारचाकी वाहनाला अचानक आग लागली. काही क्षणांतच आगीने शेजारी उभ्या असलेल्या दुसऱ्या वाहनालाही कवेत घेतले. तसेच रोहित्रावरील विद्युत तारांनाही आग लागल्याने परिसरात धुराचे लोट पसरले.

दरम्यान, घटनास्थळी नागरिकांची मोठी गर्दी जमली होती. काही नागरिक व्हिडिओ चित्रीकरण करण्यात व्यस्त असताना सामाजिक कार्यकर्ते उमेश इंगळे यांनी प्रसंगावधान दाखवत तात्काळ अग्निशामक विभागाचे प्रमुख मनीष कथले तसेच पोलीस नियंत्रण कक्ष ११२ वर संपर्क साधून घटनेची माहिती दिली.

यावेळी नागरिकांच्या मदतीने आणखी एका वाहनाच्या काचा फोडून ते वाहन बाजूला ढकलण्यात आले. त्यानंतर अग्निशामक विभागाचे फायरमन निखिल आपोतीकर, सचिन माहोरे, दिनेश वाघमारे तसेच वाहन चालक धर्मकुमार वाकोडे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत आग आटोक्यात आणली. वेळीच आग नियंत्रणात आल्याने मोठी जीवितहानी टळली. उमेश इंगळे यांच्या सतर्कतेचे परिसरातील नागरिकांकडून कौतुक करण्यात येत आहे.

# खेट्रीच्या सरपंच जहुर खान यांचा पुण्यात राज्यस्तरीय गौरव



■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील खेट्री गावाचे सरपंच जहुर खान यांना ग्रामविकास, सामाजिक कार्य आणि जनसेवेतील उल्लेखनीय योगदानाबद्दल पुणे येथे आयोजित सायबर गुन्हे साक्षरता व जनजागृती मार्गदर्शन कार्यक्रमात राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला.

सरपंच म्हणून जहुर खान यांनी गावाच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. गावातील नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी त्यांनी पुढाकार घेत विविध विकासकामे मार्गी लावली. समाजहितासाठी केलेल्या कार्याची दखल घेत त्यांना हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमाला विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी जहुर खान यांच्या

## ग्रामविकास व सामाजिक कार्याची दखल; पुरस्काराने सन्मानित

कार्याचे कौतुक करत त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. त्यांच्या नेतृत्वाखाली गावात राबविण्यात आलेल्या विकासकामांमुळे खेट्री गावाला नवी दिशा मिळाल्याचे गौरवोद्गार यावेळी काढण्यात आले.

दरम्यान, या सन्मानामुळे खेट्री गावात आनंदाचे वातावरण असून, जहुर खान यांच्या कार्यातून इतर लोकप्रतिनिधींनाही प्रेरणा मिळत असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

## अकोल्यात आज प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन

**अकोला :** नोकरी इच्छुक उमेदवारांना खाजगी क्षेत्रातील रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व मॉडेल करिअर सेंटर, अकोला तसेच विक्रम साराभाई शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय), अकोट यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १९ मे रोजी 'पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा' अंतर्गत प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन करण्यात आले आहे. या प्लेसमेंट ड्राईव्हमध्ये ४ नामांकित कंपन्यांमार्फत एकूण ६५ पदांची भरती केली जाणार आहे. दहावी, बारावी, आयटीआय, पदविका व पदवीधर उमेदवारांसाठी ही सुवर्णसंधी उपलब्ध करण्यात आली आहे. सहभागासाठी रोजगार महास्वयम पोर्टल या संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक आहे.

# जनगणना-2027 कामात अकोला मनपा अव्वल ठरावी

## पर्यवेक्षकांना मार्गदर्शन; घरगणना कार्याची प्रत्यक्ष पाहणी



■ प्रतिनिधी | अकोला ■

भारताची जनगणना-२०२७ कार्यक्रमांतर्गत अकोला महानगरपालिका क्षेत्रातील पहिल्या टप्प्यातील घरगणना कार्याला १६ मेपासून प्रारंभ झाला असून, या पार्श्वभूमीवर रविवारी मनपाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुख्य सभागृहात मार्गदर्शन बैठकीचे आयोजन करण्यात आले.

या बैठकीत शासनाकडून आलेले अतिरिक्त संचालक (जनगणना) प्रवीण भगत तसेच जिल्हास्तरीय समन्वय अधिकारी कार्तिक गडलिंग यांनी पर्यवेक्षकांशी संवाद साधत जनगणना प्रक्रियेतील विविध मुद्द्यांवर मार्गदर्शन केले. तसेच कामादरम्यान येणाऱ्या अडचणी जाणून घेत त्यांचे निरसनही करण्यात आले. अमरावती विभागात अकोला महानगरपालिकेचे जनगणना कार्य सर्वात अचूक व उत्कृष्ट व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त करत अधिकाऱ्यांनी पर्यवेक्षकांना काटेकोरपणे काम करण्याच्या सूचना दिल्या.

बैठकीनंतर प्रवीण भगत व कार्तिक गडलिंग यांनी सिव्हील लाईन रोड परिसरातील घरगणना कार्याची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी मनपा उपायुक्त तथा शहर जनगणना अधिकारी दिलीप जाधव, चार्ज अधिकारी राजेश सरप, गजानन घोंगे, जीआयएस विभाग प्रमुख चंदन प्रसाद, पर्यवेक्षक अनंत गदरे तसेच प्रगणक रूपेश हातोले व देवलाल सदांशिव यांनी सुरू असलेल्या कामाची माहिती दिली. अधिकाऱ्यांनी आतापर्यंत झालेल्या कामाबद्दल समाधान व्यक्त केले.

दरम्यान, मनपा आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी डॉ. सुनील लहाने यांनी नागरिकांना जनगणना कार्यात सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. उन्हाळ्याचे दिवस लक्षात घेता नागरिकांनी प्रगणकांचे ओळखपत्र तपासून त्यांना आवश्यक सहकार्य करावे व विचारण्यात आलेली माहिती तत्काळ उपलब्ध करून द्यावी, असे त्यांनी म्हटले आहे.

# विदर्भ चेंबरच्या वतीने 'व्हीसीसीआय अवॉर्ड' साठी प्रस्ताव आमंत्रित

**अकोला :** विदर्भ चेंबर ऑफ़ कॉमर्स एंड इंडस्ट्री अकोला च्या वतीने वार्षिक आमसभेचे आयोजन करण्यात आले आहे.या सोहळ्यात गत तीन वर्षांपासून व्यापार, उद्योग व उद्यमिता विश्वात उत्कृष्ट कार्य, नवाचार व उल्लेखनीय योगदान देणाऱ्या उद्योजक, व्यापारी व संस्थाना 'व्हीसीसीआय अवॉर्ड' ने सन्मानित करण्यात येत असते.या वर्षीही हा उपक्रम चेंबरच्या वतीने साकार करण्यात आला असून व्हीसीसीआय अवॉर्ड साठी प्रस्ताव आमंत्रित करण्यात येत आहेत.या अवॉर्ड मध्ये चार श्रेणी ठेवण्यात आल्या असून यात उत्कृष्ट कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व पुरस्कार श्रेणी,उत्कृष्ट कौटुंबिक व्यवसाय पुरस्कार श्रेणी,उत्कृष्ट महिला उद्यमी पुरस्कार श्रेणी व उत्कृष्ट प्रथम पीढ़ी उद्योजक पुरस्कार श्रेणी असणार आहे.या अवॉर्ड धारकांना मान्यवरांच्या हस्ते अवॉर्ड प्रदान करून सन्मानित करण्यात येणार आहे.या पुरस्काराचे अर्ज विदर्भ चेंबर सभागृह,श्रावगी टॉवर,जुने कॉटन मार्केट येथे उपलब्ध असून पात्र व्यापारी, उद्योजक उमेदवार व संस्थानी आपले प्रस्ताव दि १० जून पर्यंत वरील पत्त्यावर प्रेषित करून यात सहभागी होण्याचे आवाहन केले.

## जाहीर नोटीस

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १९०/२०२६ — प्रोसेस नं.१७४६/२०२६

चौ.ता. १६/०६/२०२६ — दिनांक : ०७/०२/२०२६

**अर्जदार :** १. ओमप्रकाश नारायणसा नाळे रा. बाळापूर रोड जवळ, भिरड वाडी, अकोला. ता. जि. अकोला. २. विजयकुमार नारायणसा नाळे रा. भारती प्लॉट, बाळापूर रोड, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.

**मयताचा पत्ता :-** मयत : जगदीश नारायणसा नाळे

**पत्ता :-** रा. बाळापूर रोड जवळ, भिरड वाडी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत जगदीश नारायणसा नाळे यांचे दि. ०५/०५/२०१७ रोजी राहते घरी, अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १६/६/ २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०७/०२/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ७७६/२०२६ — प्रोसेस नं.६६९१/२०२६

चौ.ता. २२/०६/२०२६ — दिनांक : ११/०५/२०२६

**अर्जदार :** १. निर्मला जगदेवराव हिवसे २. ज्योती जगदेवराव हिवसे ३. सौ. किर्ती प्रमोद पाचघरे ४. राजेश जगदेवराव हिवसे अर्जदार क. १ ते ४ रा. न्यू व्हीएचबी कॉलनी, पाण्याच्या टाकीसमोर, गौरक्षण रोड, अकोला. ता. जि. अकोला. ५. सौ. स्वाती रविंद्र सावरकर रा. नर्सिंग कॉलनी, अकोट, ता. अकोट जि. अकोला. ६. सौ. मिनाक्षी रविंद्र आसलकर रा. रूख्मीनी नगर, अमरावती. ता. जि. अमरावती.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.

**मयताचा पत्ता :-** मयत : जगदेवराव रामचंद्र हिवसे

**पत्ता :-** रा. न्यू व्हीएचबी कॉलनी, पाण्याच्या टाकीसमोर, गौरक्षण रोड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत जगदेवराव रामचंद्र हिवसे यांचे दि. ०३/११/२०११ रोजी न्यू कॉटन सिटी हॉस्पिटल, अकोला. ता. जि अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २२/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ११/०५/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व.स्तर), अकोला

# लोकरंगच्या तीन दिवसीय नाट्य प्रशिक्षण शिबिराचा उत्साहात समारोप

## 'यश डोक्यात न ठेवता पुढचा यशाचा मार्ग चालायला लागा' – सिनेअभिनेते भारत गणेशपुरे

■ प्रतिनिधी | अकोला ■

कितीही मोठं यश मिळालं तरी ते डोक्यात न ठेवता, त्याचाच आनंद साजरा करत न बसता पुढच्या अजून नवीन काही योजना करण्यासाठी कामाला लागलं पाहिजे, असा उपदेश सुप्रसिद्ध अभिनेते भारत गणेशपुरे यांनी दिला. 'लोकरंग' र्ते आयोजित तीन दिवसीय नाट्य प्रशिक्षण शिबिराच्या समारोपीय समारंभात ते बोलत होते. यावेळी मंचावर 'लोकरंग'चे अध्यक्ष अनिल गावंडे, प्रभात किड्स स्कूलचे संचालक डॉ. गजानन नारे, ज्येष्ठ रंगकर्मी अशोक ढेरे, ॲड. सुधाकर खुमकर, प्रभात किड्सच्या संचालिका सौ. वंदना नारे, प्राचार्य प्रदीपसिंह राजपूत, प्रा. डॉ. ममता इंगोले, नीरज आवंडेकर, डॉ. संदीप चव्हाण, श्रीकांत



पागृत आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी ॲड. सुधाकर खुमकर यांनी आपल्या प्रास्ताविकातून 'लोकरंग' संस्थेची सांस्कृतिक आणि कलाविषयक भूमिका स्पष्ट केली. तसेच 'लोकरंग'र्ते राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांची माहिती देत भविष्यातील सांस्कृतिक योजनांचाही आढावा घेतला. यानंतर प्रभात किड्स स्कूलचे संचालक डॉ. गजानन नारे यांनी आपल्या मनोगतातून ''अशा प्रकारच्या कलाविषयक आणि व्यक्तिमत्त्व विकास घडविणाऱ्या उपक्रमांसाठी प्रभात किड्स स्कूल सदैव तत्पर राहील,'' अशी ग्वाही दिली. अभिनय, नाट्य आणि सांस्कृतिक क्षेत्रात विद्यार्थ्यांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. शिबिरातील प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांनीही आपले अनुभव व्यक्त करताना या शिबिरातून आत्मविश्वास, अभिनयकौशल्य आणि संवादकौशल्य विकसित झाल्याची भावना व्यक्त केली. यामध्ये आद्या देशमुख, तीर्था धबाले, कैवल्य जयस्वाल, त्रिशा इंगोले, आरुषी करे, सई तायडे, हिमांशु बन्सल, प्रियांशी शेगोकार, आराध्या दुतोंडे, रेवती ढोरे, गोपाल गाडगे तसेच गौतमी मापारी यांनी मनोगत व्यक्त केले. तसेच पालकांमधून प्रा. विश्वास मापारी यांनीही मनोगत व्यक्त केले. यावेळी सुप्रसिद्ध सिने अभिनेते अंकुर वाढवे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना, ''कलाक्षेत्रात यशस्वी व्हायचे असेल तर ऊर्जा, सातत्य आणि सकारात्मकता कायम ठेवावी लागते,'' असे सांगितले. 'लोकरंग'चे अध्यक्ष अनिल गावंडे यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना आणि पालकांना अशा सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सातत्याने सहभागी होण्याचे आवाहन केले. ''विद्यार्थ्यांच्या कलागुणांना योग्य दिशा मिळावी यासाठी 'लोकरंग' भविष्यातही विविध सांस्कृतिक उपक्रम राबवत राहील,'' असे त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाचे सुंदर व प्रभावी सूत्रसंचालन प्रभातच्या सांस्कृतिक विभागाचे प्रमुख नंदकिशोर डंबाळे यांनी केले. तसेच उपस्थित मान्यवर, पालक व प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांचे आभारही त्यांनी मानले. या समारोप समारंभाला मोठ्या संख्येने पालक व नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमानंतर पालकवर्गामध्ये अशा प्रकारच्या सांस्कृतिक आणि व्यक्तिमत्त्व विकास घडविणाऱ्या उपक्रमांचे विशेष कौतुक करण्यात येत होते.

जनमाध्यम — जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १६३**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

# हापूसच्या पेटीतून 'राजकीय गोडवा' की भेदभावाचा कडवटपणा?

**वर्धा/ रवींद्र लाखे**

विदर्भाच्या राजकारणात सध्या एका लग्नपत्रिकेची आणि हापूस आंब्याच्या पेटीची जोरदार चर्चा रंगली आहे. 'हापूसच्या पेटीतून राजकारणाचा गोडवा' या मथळ्याखाली जनमाध्यमांत प्रसिद्ध झालेल्या वृत्तानंतर आता या प्रकरणात नवे राजकीय पदर समोर येऊ लागले आहेत. विरोधकांसह स्थानिक राजकीय वर्तुळातही यावरून कुजबुज वाढली असून, माजी मंत्री विजय वडेट्टीवार यांनी आपल्या मुलीच्या विवाह सोहळ्यात राजकीय स्तरावर भेदभाव केल्याचा आरोप उघडपणे होऊ लागला आहे.

१४ मे रोजी राजस्थानातील उदयपूर येथे अत्यंत शाही पद्धतीने विवाह सोहळा पार पडला.

मात्र या विवाहाच्या निमंत्रण वितरणातच राजकीय वर्गवारी झाल्याची चर्चा आता विदर्भभर पेट घेत आहे. गडचिरोली, चंद्रपूर, वर्धा या भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील नगरसेवक, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य यांना हापूस आंब्याची पेटी आणि लग्नपत्रिका देत ब्रह्मपुरी येथील रिसेप्शनचे निमंत्रण देण्यात आले.

तर दुसरीकडे काही बड्या राजकीय नेत्यांना केवळ पत्रिका देण्यात आल्याची माहिती समोर



आली आहे.यातून लोकल नेते आणि व्हीआयपी नेते असे दोन स्पष्ट गट निर्माण करण्यात आल्याची भावना राजकीय वर्तुळात व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे नागपूर येथे २० मे रोजी होणाऱ्या स्वतंत्र रिसेप्शनसाठी केवळ मोठ्या आणि प्रभावशाली नेत्यांना निमंत्रित करण्यात आल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे 'हापूसची पेटी कोणासाठी आणि साधी पत्रिका कोणासाठी? असा प्रश्न आता उघडपणे विचारला जात आहे.

राजकीय वर्तुळात तर यावरून टोमणे आणि मिश्किल चर्चा सुरू झाली आहे. जनतेसाठी समानतेची भाषा आणि व्यवहारात व्हीआयपी संस्कृती असा आरोप विरोधकांकडून होत आहे. काही स्थानिक पदाधिकाऱ्यांनी तर नाराजी व्यक्त करत, आम्ही फक्त गर्दी वाढवण्यासाठी का? असा प्रश्न उपस्थित केला आहे. सोमवारी जिल्ह्यातील अनेक नगरसेवक आणि स्थानिक पदाधिकारी ब्रह्मपुरी येथे रिसेप्शनला पोहोचल्याने या चर्चेला आणखी खतपाणी मिळाले.

दरम्यान, काँग्रेस वर्तुळातही या प्रकारामुळे अंतर्गत नाराजी दबक्या आवाजात व्यक्त होत असल्याची माहिती आहे. एका लग्नपत्रिकेने विदर्भाच्या राजकारणात हापूसचा गोडवा कमी आणि भेदभावाची कडू चव जास्त निर्माण केल्याची चर्चा आता चहाटळांपासून राजकीय बैठकीपर्यंत रंगू लागली आहे.

## गुन्हेगारी वार्ता

### बेफाम दुचाकीची पादचाऱ्यास धडक

**पुलगाव** - शहरात भरधाव वेगाने येणाऱ्या अज्ञात दुचाकी चालकाने पादचाऱ्यास जोरदार धडक दिल्याची घटना घडली. या अपघातात युवक गंभीर जखमी झाला असून शहरातील निष्काळजी वाहनचालकांबाबत नागरिकांत संताप व्यक्त होत आहे.पुलगाव येथील ओम प्रोव्हीजन किराणा दुकानासमोर ही घटना घडली. सौम्य सुनील महेंद्रकर(वय २०)असे जखमी युवकाचे नाव आहे. धडकेनंतर दुचाकी चालकाने घटनास्थळावरून पळ काढल्याचे सांगण्यात आले. जखमी युवकाला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत.या प्रकरणी आयुष संदीप निकम यांच्या तक्रारीवरून पुलगाव पोलिसांनी अज्ञात दुचाकी चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. शहरात वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर वाहतूक नियमांचे काटेकोर पालन व्हावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

### रेल्वे पुलाजवळून दुचाकी चोरी

**पुलगाव -** शहरातील आर्वी नाका परिसरात रस्त्याच्या कडेला उभी केलेली दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली. या प्रकारामुळे वाहनधारकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.आर्वी नाका येथील रेल्वे पुलाजवळ ही घटना घडली. गोपाळ विठ्ठल डाकोरे, रा. भातकुली ता. धामणगाव जि. अमरावती यांनी याबाबत पुलगाव पोलिसांत तक्रार दाखल केली. दुचाकी काही वेळासाठी रस्त्याच्या कडेला उभी केली असता अज्ञात चोरट्याने संधी साधून वाहन लंपास केले.तक्रारीवरून पुलगाव पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास सुरू केला आहे. शहरात वाढत्या वाहनचोरीच्या घटनांमुळे पोलिसांनी गस्त वाढवावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

### जुगार अड्ड्यावर पोलिसांची धाड

**वर्धा -** करंजी भोगे परिसरातील सोंडलापूर नाल्याच्या काठावर सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर सेवाग्राम पोलिसांनी छापा टाकून पाच जणांविरुद्ध कारवाई केली. या कारवाईत रोख रकमेसह ३ लाख १५ हजार ७८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.जुगाराच्या माध्यमातून पैशांची हार-जीत सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिस पथकाने घटनास्थळी धाड टाकली. पोलिस आल्याचे लक्षात येताच काही जुगारी पसार झाले; मात्र पाच जणांना ताब्यात घेण्यात आले. कारवाईदरम्यान रोख रक्कम तसेच विविध क्रमांकांच्या दुचाकी जप्त करण्यात आल्या.या प्रकरणी सतीश लोखंडे, गौरव अंबुलकर, मंगेश देवडे, सुहास मून आणि सुशिल पांडे यांच्याविरुद्ध सेवाग्राम पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

### 'ऑपरेशन ऑल आऊट'चा धडाका

**वर्धा-** जिल्ह्यात गुन्हेगारीचे जाळे फोफावत असतानाच वर्धा पोलिसांनी शुक्रवारी रात्री 'ऑपरेशन ऑल आऊट' राबवत अवैध धंदेवाल्यांचे कंबरडे मोडले. अवघ्या पाच तासांच्या धडक मोहिमेत दारू माफिया, जुगार अड्डे, अमली पदार्थ तस्कर आणि हत्यारबाजांवर पोलिसांनी एकाच वेळी कारवाई करत १७ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईमुळे जिल्ह्यातील गुन्हेगारी विश्वात मोठी खळबळ उडाली आहे.

# उन्हाच्या झळांत माणुसकीचा थंडावा

### हिंदनगरातील गणेश मंदिर परिसरात प्याऊ' सुरू

### आशिष आकरे मित्र परिवाराचा समाजाला दिलासा

**वर्धा/ जनमाध्यम**

एकीकडे उन्हाचा तडाखा दिवसेंदिवस वाढत आहे, रस्त्यावरून प्रवास करणारे नागरिक, कामगार, रिक्षाचालक, वृद्ध आणि सर्वसामान्यांचे घसे कोरडे पडत आहेत; तर दुसरीकडे हिंद नगर गणेश मंदिर परिसरात माणुसकीचा थंडावा अनुभवायला मिळत आहे. समाजसेवेची जाण ठेवत आशिष आकरे मित्र परिवारातर्फे गणेश मंदिर येथे पिण्याच्या थंड पाण्याची 'प्याऊ' सेवा सुरू करण्यात आली आहे.

उन्हाळ्याची चाहूल लागताच सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमाला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळत असून अनेक तहानलेल्या नागरिकांची तहान येथे भागत आहे.

ही सेवा केवळ पाणी पाजण्याची नाही, तर समाजात माणुसकी जपण्याचा छोटासा प्रयत्न आहे, असे समाजसेवक



आशिष आकरे यांनी सांगितले.गणेश मंदिर परिसरात दिवसभर ये-जा करणारे नागरिक, विद्यार्थी, मजूर आणि वाहनचालक या प्याऊचा लाभ घेत आहेत.

भर उन्हात थंड पाण्याचा घोट मिळाल्याने अनेकांच्या चेहऱ्यावर समाधान दिसून येत आहे.समाजासाठी काहीतरी करण्याची भावना प्रत्येकाने जपली पाहिजे. आपल्या सर्वांच्या सहकार्यामुळेच असे उपक्रम अधिक बळकट होतात, असे आवाहनही मित्र परिवारातर्फे करण्यात आले. वाढत्या तापमानात ही सेवा अनेकांसाठी दिलासादायक ठरत असून परिसरात या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

# भाजपच्या बैठकीत संघटनबांधणीवर भर

### सरकारच्या योजनांचा 'घराघरात प्रचार' करण्याचे पदाधिकाऱ्यांना निर्देश

**वर्धा/ जनमाध्यम**

भारतीय जनता पक्षाच्या जिल्हा पदाधिकारी बैठकीत संघटन अधिक मजबूत करण्यासह केंद्र व राज्य सरकारच्या जनकल्याणकारी योजना तळागाळापर्यंत पोहोचविण्यावर विशेष भर देण्यात आला. स्थानिक हेरिटेज ग्रँड येथे पार पडलेल्या या बैठकीत आगामी प्रशिक्षण वर्ग, संघटनात्मक आढावा आणि पक्षविस्तारावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीला पालकमंत्री पंकज भोयर, प्रदेश उपाध्यक्ष उपेंद्र कोठेकर, आमदार व प्रदेश उपाध्यक्ष संजय भेंडे, जिल्हाध्यक्ष संजय गाते विदर्भ विभाग संयोजक दिनेश सूर्यवंशी, प्रदेश उपाध्यक्ष रामदास तडस, आ. राजेश बकाने यांच्यासह पक्षाचे जिल्हा पदाधिकारी, मोर्चा अध्यक्ष, मंडळ अध्यक्ष व महामंत्री मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी नवनियुक्त प्रदेश उपाध्यक्ष उपेंद्र कोठेकर, नवनिर्वाचित आमदार तथा जिल्हा प्रभारी संजय भेंडे, प्रदेश उपाध्यक्ष रामदास तडस आणि अविनाश देव मोर्शी जिल्हा प्रभारी यांचा सत्कार करण्यात आला. बैठकीत पक्ष संघटनेच्या विविध उपक्रमांचा आढावा घेण्यात आला असून आगामी काळात अधिक आक्रमकपणे जनसंपर्क वाढविण्याचे ठरविण्यात आले.तसेच जिल्ह्यातील सर्व १९ मंडळांमध्ये पार पडलेल्या प्रशिक्षण वर्गांचा अहवाल सादर करण्यात आला. येत्या २६ व २७ मे रोजी यवतमाळ येथे होणाऱ्या जिल्हास्तरीय प्रशिक्षण वर्गाला सर्व पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाध्यक्ष संजय गाते यांनी केले.

## 'फार्मसी' ला ब्रेक

# चार वर्षांत महाविद्यालयांचा स्फोट; आता सरकारचा 'रेड सिग्नल'

**मुंबई/ जनमाध्यम**

राज्यात गेल्या काही वर्षांत अक्षरशः पावसाळ्यात उगवणाऱ्या मशरूमप्रमाणे वाढलेल्या फार्मसी महाविद्याल यांना अखेर सरकारने लगाम घातला आहे. शैक्षणिक वर्ष २०३०-३१ पर्यंत नवीन बी. फार्मसी आणि डी. फार्मसी महाविद्यालयांना परवानगी न देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला असून, दुसरीकडे कौशल्याधारित शिक्षणाला चालना देण्यासाठी नवीन कौशल्य केंद्रांना मान्यता देण्याचाही मार्ग मोकळा करण्यात आला आहे.

कोरोना महामारीच्या काळात औषधनिर्माण क्षेत्राचे महत्त्व प्रचंड वाढले.

फार्मसी क्षेत्रात रोजगाराच्या मोठ्या संधी निर्माण होतील, या अपेक्षेने राज्यभरातील शैक्षणिक संस्थांनी फार्मसी अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी अक्षरशः चढाओढ लावली. फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाकडूनही अनेक प्रस्तावांना झटपट मान्यता मिळाल्याने बी. फार्म आणि डी. फार्म महाविद्यालयांची संख्या विक्रमी वेगाने वाढली.नियोजनाचा अभाव आणि वास्तवातील रोजगार स्थिती यामुळे आता या अभ्यासक्रमांचीच उतरती कळा सुरू झाली आहे. गेल्या दोन वर्षांपासून फार्मसी अभ्यासक्रमांकडे विद्यार्थ्यांचा ओढा कमी होत असून, यंदा तब्बल ३० टक्के जागा रिक्त राहिल्याची धक्कादायक स्थिती समोर आली आहे. लाखो रुपयांची गुंतवणूक करून उभारलेली अनेक महाविद्यालये विद्यार्थ्यांअभावी अडचणीत सापडली आहेत.ही गंभीर परिस्थिती लक्षात घेऊन राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाच्या बैठकीत सविस्तर चर्चा झाली.

त्यानंतर शैक्षणिक वर्ष २०२७-२८ ते २०३०-३१ या कालावधीत राज्यात नवीन फार्मसी संस्था सुरू करू नयेत, तसेच विद्यमान महाविद्यालयांची प्रवेशक्षमता वाढवू नये, असे स्पष्ट निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उच्च व तंत्र शिक्षण विभागाला दिले आहेत.

दरम्यान, पारंपरिक पदवी अभ्यासक्रमांच्या तुलनेत उद्योगाभिमुख आणि कौशल्याधारित शिक्षणाला प्राधान्य देण्याचा सरकारचा कल स्पष्ट दिसत आहे. रोजगारनिर्मितीला थेट हातभार लागावा, यासाठी नवीन कौशल्य केंद्रांना मान्यता देण्याचा निर्णयही बैठकीत घेण्यात आला. त्यामुळे भविष्यात राज्यातील उच्च शिक्षणाचा चेहरामोहरा बदलण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# २.७९ कोटींच्या विकासकामांना प्रारंभ

**आर्वी/ जनमाध्यम**

ग्रामीण भागातील पाणीटंचाई कमी करून शेतकऱ्यांना सक्षम करण्याच्या उद्देशाने आमदार सुमित वानखेडे यांच्या पुढाकारातून कारंजा तालुक्यात विविध विकासकामांना प्रारंभ करण्यात आला आहे. 'गाळमुक्त तलाव व गाळयुक्त शिवार' अभियानांतर्गत तब्बल २ कोटी ७९ लाख रुपयांच्या कामांचा शुभारंभ करण्यात आला.

या अंतर्गत माळेगाव (काळी), आजनादेवी, बेलगाव व आजनडोह येथील लघु सिंचन तलावांचे खोलीकरण करण्यात येणार आहे.

तसेच गवंडी, मोर्शी व बांगडापूर येथे गाव तलाव खोलीकरणाची कामे सुरू झाली



### जलसंधारण व रस्ते दुरुस्तीमुळे ग्रामीण भागाला मिळणार नवे बळ

आहेत. राहटी व सुसुंद येथे पाझर तलाव खोलीकरण, तर सेलगाव (ल.) येथे कार नदी प्रकल्पातील गाळ उपसा कामांचे भूमिपूजन करण्यात आले.तलावातील सुपीक गाळ शेतकऱ्यांच्या शेतात टाकण्यात येणार असल्याने जमिनीचा पोत सुधारण्यास मदत होणार आहे. यामुळे उत्पादनवाढीसोबतच रासायनिक खतांवरील खर्च कमी होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.दळणवळण सुविधा सुधारण्यासाठी कारंजा-धावडी, खरसखांडा-हेटीकुंडी तसेच काजळी-राहटी या रस्त्यांच्या दुरुस्तीची कामेही हाती घेण्यात आली आहेत.

या कामांमुळे नागरिकांना प्रवास अधिक सुलभ होणार असून शेतमाल वाहतुकीलाही गती मिळणार आहे.या प्रसंगी विविध गावांतील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच परिसरातील शेतकरी उपस्थित होते. ग्रामीण भागातील विकास कामांमुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

# जनगणनेत ओबीसी प्रवर्गाचा समावेश करण्याची मागणी

### ओबीसी जनजागृती संघटनेची बैठक

**वर्धा/ जनमाध्यम**

आगामी जनगणनेच्या पहिल्या टप्प्यात होणाऱ्या कुटुंब गणनेत ओबीसी प्रवर्गाचा समावेश करण्यात यावा, या मागणीसाठी ओबीसी जनजागृती संघटन, जिल्हा वर्धा यांच्या सदस्यांची बैठक पार पडली. बैठकीत ओबीसी समाजाची स्वतंत्र जनगणना ही काळाची गरज असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी ही मागणी संविधानिक व लोकशाही मार्गाने शासनापर्यंत पोहोचविण्याचा निर्धार व्यक्त केला.

तसेच या अभियानात स्वतःसह कुटुंबातील सदस्यांनाही सहभागी करून घेण्याचे आवाहन करण्यात आले.

या संदर्भात संघटनेच्या वतीने लवकरच जिल्हाधिकारी, वर्धा यांना निवेदन देण्यात येणार असून त्यावर सदस्यांच्या स्वाक्षऱ्या घेण्यात येणार आहेत. विविध जातीय संघटनांच्या पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधून त्यांनाही अभियानात सहभागी करून घेण्याचा निर्णय घेण्यात आला.अभियानाच्या अंमलबजावणीसाठी कार्यकारिणी स्थापन करण्यात आली.

अध्यक्षपदी नागेश तांगडे, उपाध्यक्षपदी रविभाऊ बेलपत्रे, सचिवपदी जयवंत भालेराव, प्रसिद्धी प्रमुखपदी सूर्यप्रकाश पांडे यांची निवड करण्यात आली. तसेच प्रदीप कुहीटे, नामदेव ढुमने, प्रविण पेठे आणि प्रमोद हांडे यांची कार्यकारिणी सदस्य म्हणून निवड झाली.

बैठकीला वर्धा नगराध्यक्ष सुधीरभाऊ पांगुळे उपस्थित होते. त्यांनी अभियानासाठी सहकार्य करण्याची भूमिका व्यक्त केली. यावेळी अजय भेंडे, राजेंद्र इंगोले, विशाल हजारे, पराग भोयर, अभिजीत चौधरी यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

# रेतीचे 'सोने'; सामान्यांच्या घरकुल स्वप्नांवर बुलडोझर

**साहूर/ जनमाध्यम**

नदी-नाल्यांचा तालुका म्हणून ओळख असलेल्या साहूर परिसरात आज रेतीचे दर अक्षरशः सोन्याच्या भावाने विकले जात आहेत. घरपोच एका ट्रॅक्टर रेतीसाठी दहा हजार रुपयांहून अधिक मोजावे लागत असल्याने सर्वसामान्य नागरिकांचे घर बांधण्याचे स्वप्न अक्षरशः धुळीस मिळत आहे. शासनाने घरकुल लाभार्थ्यांना मोफत रेती देण्याची घोषणा केली खरी; मात्र प्रत्यक्षात त्या घोषणेची अंमलबजावणी कुठेच दिसत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

महागाईच्या झळा दिवसेंदिवस तीव्र होत असतानाच ग्रामीण भागात सिमेंट काँक्रीटच्या घरांचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. पूर्वी मातीच्या किंवा कौलारू घरात राहणारे नागरिक आता पक्क्या घरांकडे वळत आहेत. एवढेच नव्हे तर अनेकांनी चांगली स्थितीत असलेली जुनी घरे पाडून नवीन सिमेंट काँक्रीटची घरे उभारण्यास सुरुवात केली आहे. परिणामी बांधकाम साहित्याची मागणी वाढली असून रेती, सिमेंट, लोखंड यांचे दर गगनाला भिडले आहेत.प्रधानमंत्री आवास योजनेसह विविध घरकुल योजनांमुळे ग्रामीण भागात बांधकामांना मोठी चालना मिळाली. मात्र याच संधीचा फायदा घेत रेती पुरवठादारांनी दरवाढीचा सपाटा लावल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. साहूर परिसरात लहान-मोठ्या नद्या व नाल्यांचे जाळे असूनही रेती सहज उपलब्ध होत नाही. उलट रेती घाटांचे लिलाव कोट्यवधींच्या बोलींमध्ये होत असल्याने त्याचा थेट भार सामान्य ग्राहकांवर टाकला जात आहे. रेती घाटाच्या लिलावात अधिक बोली लावणाऱ्यांनाच घाट मिळत असल्यामुळे संबंधित कंत्राटदार अधिक नफा कमावण्यासाठी रेतीचे दर मनमानी पद्धतीने वाढवत असल्याची चर्चा परिसरात रंगली आहे. प्रशासनालाही यातून मोठा महसूल मिळत असल्याने सामान्य नागरिकांच्या अडचणीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप होत आहे.घर बांधकामात रेती हा अत्यावश्यक घटक असल्याने नागरिकांकडे पर्याय उरलेला नाही. परिणामी अनेकांनी घरबांधणीची कामे अर्धवट ठेवली आहेत, तर काहींनी घरकुलाचे स्वप्नच पुढे ढकलले आहे. सरकार महसूल कमावत आहे; पण सामान्य माणसाचे कंबरडे मोडत आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिक व्यक्त करीत आहेत.दरम्यान, शासनाने रेतीचे दर नियंत्रणात आणण्यासाठी ठोस धोरण आखावे, घरकुल लाभार्थ्यांना सवलतीच्या दरात रेती उपलब्ध करून द्यावी आणि रेती माफियांच्या मनमानीवर लगाम घालावा, अशी जोरदार मागणी आता साहूर परिसरातून होत आहे.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्यो मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.
**संपादक - प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)
**वर्धा आवृत्ती वर्ष** - १४ **अंक** - १७१
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३
**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
**ई-मेल**- atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# घरातून ३.१२ लाखांची चोरी; नागपुरी गेट परिसरातील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** नागपुरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अफवान नगर परिसरातील घर फोडून अज्ञात चोरट्यांनी रोकड व सोन्याचे दागिने असा एकूण ३ लाख १२ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी नागपुरी गेट पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. तक्रारदार शेख आसिम शेख रसूल (वय ४५, रा. अफवान नगर क्रमांक २२, वाहेद डी.एड. कॉलेज रोड) हे पंक्चर दुरुस्तीचे काम करतात. मुलांच्या सुट्ट्या असल्याने ते कुटुंबासह नांदगाव खंडेश्वर येथे गेले होते. दरम्यान, १५ मे रोजी सायंकाळी ७.३० ते १७ मे २०२६ रोजी दुपारी १२.३० वाजेदरम्यान अज्ञात चोरट्यांनी याचा फायदा घेतला. घराच्या मुख्य दरवाज्याचे कुलूप व कडी तोडून चोरट्यांनी घरात प्रवेश केला. घरातील स्टीलच्या डब्यात ठेवलेली २ लाख १० हजार रुपयांची रोकड तसेच १ लाख २ हजार ९०० रुपये किमतीची १४ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी असा एकूण ३ लाख १२ हजार ९०० रुपयांचा ऐवज चोरून नेला. कुटुंब परत आल्यानंतर चोरीचा प्रकार उघडकीस आला. शेख आसिम यांच्या तक्रारीवरून नागपुरी गेट पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा नोंदविला असून पुढील तपास सुरू आहे.

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

### निविदा सूचना "२" २०२६ - २०२७

खाली नमूद केलेल्या कामांकरीता येणा-या अंदाजे खर्चासह मोहरबंद निविदा मागविण्यांत येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | खर्च | वेबवरील निविदेची उपलब्धता | |
|---|---|---|---|---|
| | | | पासून | पर्यंत |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | अमरावती औद्योगिक क्षेत्र..... NH-५३ च्या जंक्शनवर नामफलकासह प्रवेशद्वार बसवून देणे. | ३९,६८,७३०.०० | २०/०५/२०२६ | ०५/०६/२०२६ |
| २ | अति. अमरावती औद्योगिक क्षेत्र... पा. पु. यो देखभाल व दुरुस्ती अंतर्गत गाळण संच क्र.3 चे पुनर्-नुतनीकरण व दुरुस्ती (कोर्बीय जाळी आणि ACPRS सह). | ४०,३४,४९९.०० | २०/०५/२०२६ | ०५/०६/२०२६ |
| ३ | तिवसा लघु औद्योगिक क्षेत्र... रस्त्याची व पा. पु. यो. देखभाल व दुरुस्ती अंतर्गत सन २०२६-२७ अंतर्गत रस्त्यांचे अंतिम डांबरीकरण आणि तात्पुरती पाणीपुरवठा व्यवस्था करणे. | ३९,६२,५६८.०० | २०/०५/२०२६ | ०५/०६/२०२६ |

उपरोक्त कामांचे निविदा प्रपत्र https://mahatender.gov.in या संकेत स्थळावर वरिल कालावधिपासुन उपलब्ध राहिल.

## MAHAVITARAN — E-TENDER NOTICE

E-Tender is invited from the eligible/Registered and Reputed firm/contractors/agencies for the works detailed as under by E-Tendering method.

| Tender No. | Description of the Work | Tender Amount (Rs. In Lakhs) | Tender Fee (In Rs.) | E M D (In Rs.) |
|---|---|---|---|---|
| CE/AMTZ/ In-Room Dining/ 2026-27/T-03 | Work contract for engaging the agency for running the canteen in the premises of Vidyut Bhavan, Shivaji Nagar, Camp Road, Amravati 444603 for FY 2026-27. | -- | 590/- (Including GST) | 5000/- |

**Date of start of bid sale : 19.05.2026 (From 11:00 Hrs)**
**Last Date of Bid sale : 02.06.2026 (up to 16.00 Hrs)**
**Last date for submission bid : 02.06.2026 (up to 17.00 Hrs.)**
**For further details of Tenders, please visit our website**
**https://etender.mahadiscom.in/eatApp**

Contact Person:
Executive Engineer (Adm), Amravati Zone Mob No. 7875761688
Address: Office of The Chief Engineer, Amravati Zone
Administrative Building, "Vidyut Bhavan", 2nd Floor, Camp Road, Amravati – 444603 (Maharashtra) Email: **ceamtz@gmail.com**

**PRO No. 116**

**Chief Engineer**
**MSEDCL, Amravati Zone, Amravati.**

## कार्यालय नगर पंचायत, झरी जामणी, जि.यवतमाळ

नवीन प्रशासकीय ईमारत, पिन-४४५३२४
दूरध्वनी ०७२३७-२३६६३०

जा.क्र.नपंझजा/आ.वि./४२७/२०२६ — दिनांक १८.०५.२०२६

### जाहीरात

प्रधानमंत्री आवास यायेजने अंतर्गत PMAY नगर पंचायत झरीजामणी करीता **शहरस्तरीय तांत्रिक कक्षातील** (CLTC) तज्ञाच्या एकत्रित वेतनावर तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने पद भरण्यासाठी दिनांक २९.०५.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून न,पं.कार्यालय, झरीजामणी येथे उमेदवारांच्या थेट मुलाखतीचे आयोजन करण्यात आले असून सर्व ईच्छुक / पात्र उमेदवारांनी आवश्यक त्या शैक्षणिक अर्हतेच्या मूळ कागदपत्रासह अनुभव प्रमाणपत्र व आवश्यक कागदपत्रासह थेट मुलाखतीस उपस्थित रहावे.

| अ.क्र. | पदाचे नांव कंत्राटी पध्दतीने | पद संख्या | आवश्यक शैक्षणिक अर्हता | वेतन |
|---|---|---|---|---|
| १. | स्थापत्य अभियंता | ०१ | १. पदविका/पदवी (स्थापत्य अभियांत्रिकी<br>२. नगर परिषद अथवा नगर पंचायत मध्ये प्रधानमंत्री आवास यो. व इतर कार्य ५ वर्षे पार पाडणाऱ्या उमेदवारास प्राधान्य.<br>३. MSCIT (MS-Word, MS-EXCEL, MS-POWER POINT ज्ञान व मराठी टायपिंग आवश्यक आहे.<br>४. मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक | |

**स्वा/-**
**मुख्याधिकारी,**
**नगर पंचायत कार्यालय, झरीजामणी**

## जाहीर नोटीस

**विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती**

आर.एम.जे.सी.क्र.२५२/२०२६ — ने.ता.१९.०६.२०२६

**अर्जदार :** १. प्रेमिला मुरलीधर मेटांगे, वय ५५ वर्षे, व्यवसाय - घरकाम, **२.** नितीन मुरलीधर मेटांगे, वय ३६ वर्षे, व्यवसाय - मजुरी, **३.** चेतन मुरलीधर मेटांगे, वय ३२ वर्षे, व्यवसाय - मजुरी, **४.** अक्षय मुरलीधर मेटांगे, वय २८ वर्षे, व्यवसाय - मजुरी, **५. अनिकेत** मुरलीधर मेटांगे, वय २६ वर्षे, व्यवसाय - शिक्षण
सर्व रा.तळेगांव मोहना, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- विरध्द --

**गैरअर्जदार :** १. रमेश बापुराव मेटांगे (मयत यांचे वारस) **(अ)** कमला रमेश मेटांगे, वय ६० वर्षे, व्यवसाय - घरकाम, **(ब)** दिनेश रमेश मेटांगे, वय ४० वर्षे, व्यवसाय - मजुरी, **(क)** नरेश रमेश मेटांगे, वय ३६ वर्षे, व्यवसाय - मजुरी
सर्व रा.तळेगांव मोहना, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
(ड) सिमा सुभाष कवळे, वय ४५ वर्षे, व्यवसाय - घरकाम,
रा.सखला प्लॉट लोहगांव रोड, परभणी-४३१४०१
२. **सुरेश बापुराव मेटांगे (मयत तर्फे वारस)** (अ) सुमुकला सुरेश मेटांगे, वय ६० वर्षे, व्यवसाय - घरकाम, (ब) जयकुमार सुरेश मेटांगे, वय ३५ वर्षे, व्यवसाय - मजुरी, (क) श्रीकांत सुरेश मेटांगे, वय ४० वर्षे, व्यवसाय - मजुरी
सर्व रा.तळेगांव मोहना, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
(ड) चित्रा पंकज मोहोड, वय ३६ वर्षे, व्यवसाय - घरकाम,
रा.पथ्रोट, ता.अचलपूर, जि.अमरावती
३. गणेश बापुराव मेटांगे, वय ६५ वर्षे, व्यवसाय - घरकाम
सर्व रा.तळेगांव मोहना, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
४. शोभा दादाराव वाघमारे, वय ६० वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.कुऱ्हा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मृतक मुरलीधर बापुराव मेटांगे** यांचा मृत्यू दिनांक **२३.०८.२०२१** रोजी झाला. तसेच **मृतक बापुराव बेंडाजी मेटांगे** यांचा दि.**२२.१२.२०१३** रोजी तळेगांव मोहना, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झालेला आहे. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार व गैरअर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.२५२/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.

आज दि.**१२.०५.२०२६**रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

## जाहीर नोटीस

**अमरावती येथील विद्यमान जिल्हा व सत्र न्यायाधीश-३, यांचे न्यायालय**

किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ११९/२०२६ — ने.ता.२०.०६.२०२६

**अर्जदार -** १. निधी सतीश शेटे, वय १६ वर्षे, व्यवसाय - शिक्षण
२. नव्या सतीश शेटे, वय १० वर्षे, व्यवसाय - शिक्षण
मार्फत अ.पा.क.आई कविता सतीश शेटे
३. कविता सतीश शेटे, वय ४० वर्षे, व्यवसाय - शिक्षण
४. कमला मधुकर शेटे, वय ८० वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.शारदा नगर, राजापेठ, अमरावती

-- वि --

**गैरअर्जदार - निरंक**

Application Undr Section 8(2) of the Hindu Minority and Guardianshi Act, 1956 for Grant of Permission to Sale Out Minor's Share Inproperties

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी अज्ञान पाल्याच्या नावे असलेली खालील वर्णनाची मालमत्ता विकण्याची परवानगी मिळण्याकरीता वि.जिल्हा व सत्र न्यायाधीश-०३, अमरावती यांच्या न्यायालयात रितसर अर्ज सादर केला आहे.

Description of Property

House property situated within the limits of M.N.C.Amravati, Mouja - Peth Amravati, Pragane Badnera, Tq. Dist. Amravati out of field survey No.36/1 and 38/1 Layout converted vide Revenue Case No.N.A.P.-34/Peth Amravati/30/1977-78 order dated 21.03.1979, Plot No.48 having partitioned as east-west southern side having its area 25 Ft. x 73 ft. total admeasuring 1825 Sq.ft. with construction of house consisting of 4 rooms total construction of 1143.78 sq.ft. which is bounded as under :-

Towards East - Road — Towards West - Service Line
Towards North - Plot No.49(House of Rathi)
Towards South - Subdivision Plot No.48-A (House of Mule)

त्याअर्थी सदर अर्जाविरुध्द कारण दाखविण्यास अगर काही हरकती घ्यावयाचे असल्यास अर्जदारांचे सर्व नातलग व हितसंबंधी आणि सर्वत्र लोकास जाहीर नोटीस देण्यात येते की, त्यांनी दि.२०.०६.२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता वि.जिल्हा न्यायाधीश-३, अमरावती यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर व्हावे. वर नमुद केलेल्या तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदर्हु अर्जाची एकतर्फी सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक १८.०५.२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

शिक्का

आदेशान्वये,
सहायक अधीक्षक, (न्यायीक विभाग)
जिल्हा व सत्र न्यायालय,
अमरावती

## सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती

२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

### चौकशीची जाहीर नोटीस

फेरफार अहवाल/अर्ज क्र. — 278/2026 कलम २२
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक — **श्री.जनकल्याण सेवा संस्था, अमरावती, ता.जि.अमरावती**
**एफ-१२७७३/अमरावती**
बाबत अर्जदार - **गोविंद जनार्दन जोग, रा.हेडगेवार हॉस्पीटल, अमरावती**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, धर्मादाय उपआयुक्त, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९/२२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत (वर्णन) - निरंक**
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन)** - अमरावती शहर येथील नझुल शिट नं.६५, प्लॉट नं.५/१, एकुण क्षेत्रफळ २७,५५२.९० चौ.मीटर पैकी ६६९ चौ.मीटर जागा, ह्याचा प्लॉट नं.५/१-ब, त्यावर असलेल्या बांधकामासहीत, ज्याची चतुःसिमा--
पुर्वेस - आदित्य अपार्टमेंट व त्यामागे रेल्वे लाईन
पश्चिमेस - अमरावती-बडनेरा रस्ता
उत्तरेस - प्लॉट नं.५/१-अ
दक्षिणेस - श्री.पाटील यांचे घर

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **२४.०४.२०२६** रोजी दिली.

शिक्का

**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २५०**
**आर.एन.आय.रजी.नं.** 49763/89 **पोस्टल लायसन क्र.** ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## तहसीलदार, चांदूर बाजार यांचे कार्यालय

**(जन्म मृत्यू प्रमाणपत्र शाखा)**

### जाहीरनामा

**अर्जदार -** मोहम्मद राजीक मोहम्मद सादीक,
ग्रामपंचायत बेलोरा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

याद्वारे गावातील सर्वत्र लोकांना जाहीरपणे कळविण्यात येते की, **मोहम्मद राजीक मोहम्मद सादीक,** ग्रामपंचायत बेलोरा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती यांनी स्वतःचे जन्म दिनांक ०३.०६.१९८० चा राहत्या घरी झाला. परंतु त्यांचे जन्माची कार्यालय ग्रामपंचायत बेलोरा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे नोंद करण्यात आली नाही. जन्माची नोंद जन्म मृत्यू कार्यालय ग्रामपंचायत बेलोरा, पं.स.चांदूर बाजार, जि.अमरावती हद्दीमध्ये झालेला असल्यामुळे जन्म नोंदणी करण्याबाबतचा अर्ज व ग्रामपंचायत बेलोरा यांचा प्रस्ताव या कार्यालयात दाखल केलेला आहे.

वरील जन्माची नोंद करून देण्यास कोणत्याही व्यक्तीस अगर संस्थेस कोणाला काही आक्षेप अथवा हरकती असतील तर त्यांनी जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपला आक्षेप अथवा हरकती लेखी स्वरुपात या कार्यालयामध्ये दाखल कराव्यात. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या आक्षेप वा हरकती ग्राह्य धरण्यात येणार नाही. याची नोंद घ्यावी.

सदर जाहीरनामा आज दिनांक १५.०५.२०२६ रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी प्रसिध्द करण्यात येत आहे.

तहसीलदार,
तथा तालुका दंडाधिकारी,
चांदूरबाजार

## अवैध गोवंश वाहतुक करणारे वाहन ताब्यात

**-वाहनाची तोडफोड व अचानक दगडफेक**
**-दोन गटांतील परस्पराविरुद्ध गुन्हे दाखल**

**खल्लार/प्रतिनिधीः-** रविवारी (दि.१७) रात्रीच्या वेळी काही गौरक्षकांना एका वाहनात गोवंश कोंबून कटाई साठी नेत असल्याची माहिती मिळताच गोरक्षकांनी त्या वाहनाचा पाठलाग करून रविवारी रात्री ११:३० वाजता बाभळी येथील मोठ्या पुलावर ते वाहन पकडले. यावेळी दोन गटात तणाव निर्माण झाला. याचवेळी जमावावर अचानक दगडफेकीमुळे तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

दर्यापूर शहरातून एम एच ३० ए ए ३२५५ क्रमांकाच्या वाहनातून गोवंश कोंबून नेत असल्याची माहिती मिळताच काही गोरक्षकांनी ते वाहन बाभळी येथील मोठ्या पुलावर पकडले. यावेळी जमावाची गर्दी वाढू लागली होती. पोलिसांचे ११२ क्र. चे वाहन सुद्धा घटना स्थळी पोहोचले परंतु दोन गटात त्या ठिकाणी वाद निर्माण झाला. आणि एका बाजूने अचानक जमावावर तुफान दगडफेक झाली.

यामध्ये अनेक जण जखमी सुद्धा झाले. सुरुवातीला दोनच पोलिस कर्मचारी घटनास्थळी उपस्थित असल्याने ते सुद्धा हतबल झाले होते. त्यानंतर दर्यापूर ठाणेदार सुनिल वानखडे व इतर कर्मचारी येताच त्यांनी उपस्थित जमावाला पांगविले. तसेच गोवंश व वाहन ताब्यात घेतले. रात्री उशिरापर्यंत बाभळी पुलाजवळ पोलिसांची गस्त होती. सोमवारी दोन गटातील काही जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्यांची चौकशी सुरु होती.

## वि.दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि.अमरावती यांचे न्यायालय

प्रो.नं.७८७/२०२६
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर
दि.१०.०३.२०२६

किरकोळ अर्ज क्र.१२५/२०२६ — दिनांक १०.०४.२०२६

### जाहीर नोटीस

**अर्जदार -** १. धर्मराज हिम्मतराव नितनवरे, वय ५३ वर्षे, धंदा - मजुरी
रा.असदपूर, ता.अचलपूर, जि.अमरावती

--- विरुध्द ---

गैरअर्जदार- १. वेणुताई हिम्मतराव नितनवरे, वय ७९ वर्षे, धंदा - घरकाम
२. भाष्करराव हिम्मतराव नितनवरे, वय ७९ वर्षे, धंदा - मजुरी
३. युवराज हिम्मतराव नितनवरे, वय ४६ वर्षे, धंदा - मजुरी
४. सुभाष हिम्मतराव नितनवरे, वय ४८ वर्षे, धंदा - मजुरी
गै.अ.नं.१ ते ४ रा.असदपूर, ता.अचलपूर, जि.अमरावती

या जाहीर नोटीसद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, **हिम्मतराव बसवंतराव नितनवरे** हे दिनांक **२२.०४.२०२३** रोजी मरण पावले आहेत.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

**मालमत्तेचे वर्णन** मयत **हिम्मतराव बसवंतराव नितनवरे** यांचे नांवे मौजा सांगवा खु. ता.दर्यापूर, जि.अमरावती येथील नगर भूमापन नं.१०,क्षेत्र ३ हे.५४ आर पैकी ०.८६ हे.आर ही मिळकत होती. सदरची मिळकत विदर्भ पाटबंधारे महामंडळ, नागपूर (महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत उपकम) अंतर्गत चंद्रभागा बॅरेज बृहत प्रकल्पाकरीता अधिग्रहीत केली आहे. मृतकाची सदरची मिळकत उपरोक्त प्रकल्प अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी यांनी अधिग्रहीत/संपादित करून चंद्रभागा प्रकल्पामध्ये समाविष्ट केलेली आहे.

आज दि.**१०.०३.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
सहा.अधीक्षक (प्रशासन)
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती

महाराष्ट्र शासन

डफरिन हॉस्पीटल परिसर, स्त्री रुग्णालय, श्रीकृष्ण पेठ, अमरावती
ई-मेल gmcamravati@gmail.com

जा.क्र.शावैमअ/आस्था.१-२/अभ्यागत अध्यापक/जाहीरात/१९८५/२६ — दिनांक १३.०५.२०२६

### जाहीरातीची सुचना

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती येथील विविध विषयातील रिक्त असलेले सहायक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व प्राध्यापक पदावरील रिक्त पदांकरीता अभ्यागत अध्यापक शासनाचे अटी व शर्तीनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात भरण्यात येत आहे. तसेच जाहीरातीसंबंधी विस्तृत माहिती व अर्जाचा नमुना संबंधित विभागात (सार्वजनिक सुटीचे दिवस वगळून कार्यालयीन वेळेत सकाळी **११.००** ते सायं.**५.००** वाजेपर्यंत प्राप्त करुन घेता येतील.) तसेच आवेदन अर्ज संपूर्ण कागदपत्रासह व्यक्तिशः कार्यालयामध्ये सादर करावे लागेल. आवेदन अर्ज संस्थेच्या www.gmcamravati.org व www.med-edu.in या संकेतस्थळावर उपलब्ध राहील. आवेदन कर्ता यास सदर अर्ज download करता येईल व व्यक्तिशः सादर केलेलाच अर्ज ग्राह्य धरण्यात येईल व आवेदन स्विकारण्याची अंतिम तारीख दिनांक **०५.०६.२०२६** ला सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत राहील.

**(डॉ.एन.जी.राऊत)**
**अधिष्ठाता,**
**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,**
**अमरावती**

**(अ.का.अम/जाही/१३४/२०२६-२०२७)**

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,

**वि.श्रीमती एन.सी.सोरटे, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.८७१/२०२६
**श्री.गोविंदराम अधिक तीन -वि- निरंक**
पुढील ता.२०.०६.२०२६

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :** 1. Pushpa Suryaprakash Kadu, Age 69 Yrs. Occu.: Housewife
R/o Indraprashth Apartment flat No.2, Near Shiv Mandir, Shivkrupa Colony, Ambika Nagar, Amravati
2. Kishor Suryaprakash Kadu, Age 43 Yrs. Occu.: Pvt. Job.
R/o Bargaon, Tq.Warud, Dist.Amravati
At present R/o R/o Indraprashth Apartment flat No.2, Near Shiv Mandir, Shivkrupa Colony, Ambika Nagar, Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **सूर्यप्रकाश विश्वासराव कडू** हे दिनांक 26.11.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **पुष्पा अधिक एक विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा**पुष्पा अधिक एक विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१५.०५.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,

**वि.श्रीमती एन.सी.सोरटे, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.८७१/२०२६
**श्री.गोविंदराम अधिक तीन -वि- निरंक**
पुढील ता.२०.०६.२०२६

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :** 1. Govindram Jethachand Bajaj, Age 64 Yrs. Occu.: Business
2. Roshan Govindram Bajaj, Age 39 Yrs. Occu.: Business
3. Akash Govindram Bajaj, Age 33 Yrs. Occu.: Business
All R/o Galli No.1, Bajaj Bhawan, Krishna Nagar, Shivaji Nagar, Amt.
4. Mrs.Dimple Ujwalkumar Senani, Age 36 Yrs. Occu.: Household
R/o Satan M.P. (At Present R/o Galli No.1, Bajaj Bhawan, Krishna Nagar, Shivaji Nagar, Amravati. Tq. Dist. Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **साधना गोविंदराम बजाज** ही दिनांक 10.11.2024 रोजी **नागपूर, ता.जि.नागपूर** येथे मयत झाले. अर्जदार **गोविंदराम अधिक तीन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **गोविंदराम अधिक तीन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **११.०५.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,

**विद्यमान श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.८१०/२०२६
**श्रीमती सुजाता गजबे अधिक तीन -वि- निरंक**
पुढील ता.१९.०६.२०२६

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :** १. सुजाता बाळकृष्ण गजबे, वय ६१ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
२. शिल्पा विजय रंगारी, वय ४० वर्षे, व्यवसाय - गृहिणी
रा.कृषी उत्पन्न बाजार समिती जवळ, कोपरा, पुनर्वसन नं.२ ता.बाभुळगांव, जि.अमरावती
३. प्रीती बाळकृष्ण गजबे, वय ३८ वर्षे, कामधंदा - नोकरी
४. कोमल बाळकृष्ण गजबे, वय ३६ वर्षे, कामधंदा - गृहिणी
अर्जदार नं.१, ३ व ४ रा.सरोज कॉलनीजवळ, टी.टी.नगर, साईनगर, अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत बाळकृष्ण मारोतीराव गजबे** यांचे दिनांक **१२.०८.२०२५** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार सुजाता गजबे अधिक तीन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सुजाता गजबे अधिक तीन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**११.०५.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,अमरावती

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,

**विद्यमान श्रीमती एन.सी.सोरटे, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.९७२/२०२६
**श्रीमती अर्चना अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.२९.०६.२०२६

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :** १. श्रीमती अर्चना अरुण धिनमिने, वय ७५ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.जी-१, माँ भगवती अपार्टमेंट, श्री कॉलनी, गाणुवाडीजवळ, जुना बायपास रोड, अम.
२. अनुराधा, अरुण धिनमिने (लग्नापुर्वीचे नांव), वय ५१ वर्षे, व्यवसाय - नोकरी
रा.द्वारा श्री हेमंत हवालदार, क्वॉर्टर नं.२५, टाईप-४, बंगला नं.१०, मनोरा मंगज गिता भवन चौक जवळ इंदौर-४५०००१ (म.प्र.)
३. श्री.आनंद अरुण धिनमिने, वय ४९ वर्षे, कामधंदा - नोकरी
रा.जी-१, माँ भगवती अपार्टमेंट, श्री कॉलनी, गाणुवाडीजवळ, जुना बायपास रोड, अम.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत अरुण जनार्धन धिनमिने** यांचे दिनांक **०२.११.२०२५** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार अर्चना अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **अर्चना अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१५.०५.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## जाहीर नोटीस

**विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.२५६/२०२६ — ने.ता.२०.०६.२०२६

**अर्जदार :** **१.** ज्योती दिलीपराव गावंडे, वय ५२ धंदा - घरकाम
रा.नेरपिंगळाई, ता.जि.अमरावती
२. मेघा प्रशांतराव खेरडे, वय ४२ धंदा - घरकाम
रा.शिरजगांव बंड, ता.चांदूर बाजार, जि.अमरवती
३. सुषमा मनोज चौधरी, वय ३७ धंदा - घरकाम
रा.वडाळी नाका, गगलानी नगर, अमरावती कॅम्प, ता.जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** **निरंक**

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मृतक श्रीकृष्णराव गणेशराव कडू** यांचा मृत्यू दिनांक **०९.१२.२०२१** रोजी व **मृतक उषाबाई श्रीकृष्णराव कडू** यांचा मृत्यू दि. **१५.०१.२०२१** रोजी रा.शिरजगांव बंड, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला.यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.२५६/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.

आज दि.**१२.०५.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय,चांदूर बाजार

## नोटीस नियम २१ नियम २२

**वि.१८ वे सहदिवाणी न्यायाधीश (व.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

बजावणीचा हुकूम का करु नये — विशेष दरखास्त नं.९१/२०२४
याची कारणे दाखवा नोटीस — ने.ता.१९/०६/२०२६
रक्कम रुपये /-

**रामचंद्र नथ्थुलाल साहू**
**-- विरुध्द --**
**गोविंद धनराज साहु**

**बनाम : १.** ललीता मुकेश साहू, रा.किरण बार जवळ, हमालपुरा, अमरावती
२. गायत्री मनिष साहु, रा.गणेश कॉलनी, अमरावती, ता.जि.अमरावती

ज्याअर्थी हुकूमनामाधारक याने प्रकरण नि.ता. या प्रकरणातील हुकूमनाम्याच्या बजावणीसाठी आपल्या विरुध्द या न्यायालयात दरखास्त केली आहे. त्याअर्थी या लेखावरुन तुम्हास नोटीस देण्यात ये आहे की, बजावणीचा हुकूम का देऊ नये याचे कारण दाखविण्यासाठी दिनांक १९.०६.२०२६ रोजी या न्यायालयासमोर तुम्ही हजर व्हावे.

आज दिनांक १२.०५.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात कर्मचाऱ्यांचे आंदोलन तीव्र

**अमरावती/का.प्र.**
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील विविध प्रलंबित मागण्यांसाठी कर्मचारी संघाने पुकारलेल्या आंदोलनाचा दुसरा टप्पा अधिक तीव्र झाला आहे. शासनाकडून मागण्यांवर ठोस निर्णय होत नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष पसरला असून, आज दुपारच्या सुटीत विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीच्या प्रवेशद्वारावर एक भव्य निषेध सभा (द्वारसभा) आयोजित करण्यात आली होती. या सभेला विद्यापीठातील अधिकारी आणि कर्मचारी वर्ग अत्यंत मोठ्या संख्येने उपस्थित होता.

गेल्या काही दिवसांपासून कर्मचाऱ्यांच्या रास्त मागण्यांवर शासनाकडून कोणतीही सकारात्मक भूमिका घेतली गेलेली नाही. याच अन्यायाला वाट करून देण्यासाठी आज शेकडो कर्मचाऱ्यांनी मुख्य प्रशासकीय इमारतीसमोर गोळा होत शासनाच्या धोरणांचा तीव्र निषेध केला. यावेळी 'कर्मचारी एकजुटीचा विजय असो' अशा गगनभेदी घोषणांनी संपूर्ण विद्यापीठ परिसर दणाणून सोडला होता.

**मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन तीव्र करणार: देशमुख**

या ऐतिहासिक द्वारसभेला संबोधित करताना कर्मचारी संघाचे अध्यक्ष अजय





## मुख्य इमारतीसमोर भव्य द्वारसभा

देशमुख यांनी कर्मचाऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी कोणत्याही परिस्थितीत मागे हटणार नसल्याचा निर्धार व्यक्त केला. ते म्हणाले, 'शासनाकडून सतत होत असलेल्या अन्यायाविरोधात आता रस्त्यावर उतरण्याशिवाय आपल्यासमोर पर्याय उरलेला नाही. आजची ही निषेध सभा ही केवळ सुरुवात असून, शासनाने तातडीने मागण्या मान्य न केल्यास हे आंदोलन आगामी काळात अधिक तीव्र केले जाईल.' या आंदोलनाच्या निषेध सभेला अधिकारी फोरमचे डॉ. दादाराव चव्हाण आणि मागासवर्गीय कर्मचारी संघटनेचे उपाध्यक्ष मंगेश वरखेडे प्रामुख्याने उपस्थित होते. त्यांनी कर्मचाऱ्यांच्या या लढ्याला आपला जाहीर पाठिंबा दर्शवला.सभेचा समारोप करताना कर्मचारी संघाचे महासचिव नरेंद्र घाटोळ यांनी उपस्थितांचे आभार मानले. हा लढा यशस्वी करण्यासाठी सर्व विभागांतील कर्मचाऱ्यांनी आणि अधिकाऱ्यांनी अशीच एकजूट कायम ठेवावी, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. या द्वारसभेला विद्यापीठाच्या विविध विभागांतील प्रमुख पदाधिकारी, महिला कर्मचारी आणि अधिकारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. आपल्या मागण्या पदरात पाडून घेईपर्यंत हा संघर्ष थांबणार नाही, असा इशारा शेवटी कर्मचारी संघाने दिला आहे.

---

राजमाता जिजाऊ महिला महाविद्यालयाचा पदवी प्रदान समारंभ

# विद्यार्थिनींनो, तुमचे ध्येय भव्य असू द्या!

## माजी आयुक्त ई. झेड. खोब्रागडे यांचे आवाहन



**नेर**-तुम्ही, आज पदवी व पदव्युत्तर स्तरावरील विद्यापीठाची पदवी संपादन केली आहे. हा क्षण तुमच्यासाठी निश्चितच आनंदाचा व गौरवाचा आहे. परंतु तुम्ही एवढ्यावरच थांबू नका. तुम्ही, तुमचे ध्येय उदात्त व भव्य ठेवा!' असे आवाहन महाराष्ट्र राज्याच्या समाज कल्याण विभागाचे माजी आयुक्त ई. झेड. खोब्रागडे यांनी केले.

ते येथील राजमाता जिजाऊ महिला महाविद्यालयाच्या प्रथम पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभात प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते.यावेळी त्यांच्या हस्ते महाविद्यालयाच्या कला, वाणिज्य व विज्ञान विद्याशाखेतील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या एकूण ५० विद्यार्थिनींना पदवी प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. यात संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या उन्हाळी - २०२४ परीक्षेत एम. ए. समाजशास्त्र या विषयात मेरिट आलेल्या प्रियंका गजभिये (प्रथम मेरिट), पूनम शिंदे (आठवा मेरिट), दीपाली सोनटक्के व मोनिका परळकर (दहावा मेरिट) तसेच उन्हाळी २०२५ परीक्षेत समाजशास्त्र विषयात दहावा मेरिट आलेल्या कल्याणी सोनोने यांच्यासह अन्य विद्यार्थिनींचा समावेश होता.याप्रसंगी बोलताना माजी आयुक्त खोब्रागडे पुढे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या आयुष्यात शिक्षणा सोबतच चारित्र्याला अत्यंत महत्त्वाचे स्थान दिले होते. आपणही आपल्या आयुष्यात उच्च कोटीचे शिक्षण संपादन करत असतानाच आपले चारित्र्यही तेवढेच मोलाचे मानले पाहिजे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

यासोबतच आपण शिक्षण घेतो म्हणजे आपल्याला पुस्तके वाचता येतात. परंतु आपल्याला पुस्तकांबरोबरच आपल्या सभोवतालच्या दुःखी व कष्टी लोकांच्या डोळ्यांतील दुःख, त्यांची वेदना आणि त्यांचे अश्रू वाचता आले पाहिजे, तेच खरे शिक्षण असते! असेही भावोद्गारही त्यांनी यावेळी प्रकट केले.पदवीप्रदान समारंभाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक पळवेकर यांनी केले. यावेळी मंचावर संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे उपकुलसचिव राहुल नरवाडे, संस्थेच्या अध्यक्ष शुभांगी गावंडे, संस्थेचे संस्थापक सचिव सुधाकरराव तलवारे, कोषाध्यक्ष सविता 'तलवारे आणि दिगंबर गोंडाणे यांची उपस्थिती होती. याप्रसंगी राहुल नरवाडे आणि सुधाकरराव तलवारे यांनीही पदवीकांक्षी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. सरतेशेवटी संस्थेच्या अध्यक्ष शुभांगी गावंडे यांनी समारंभाचे अध्यक्षीय भाषण केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. विनोद शेंडे यांनी तर आभारप्रदर्शन प्रा.सानिका दारव्हटकर यांनी केले. समारंभाच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयातील प्रा. के. टी. बन्सोड यांच्यासह अन्य प्राध्यापकवृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.

---

# माजी मंत्री यशोमती ठाकूर यांचा वाढदिवस जनसेवा दिवस म्हणून साजरा

## रुग्णालयात फळ वाटप व वृद्धाश्रमाला कुलर, लोकोपयोगी साहित्य भेट

**तिवसा/वार्ताहर**
लोकनेत्या, माजी मंत्री तथा आ. यशोमती ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त तिवसा तालुक्यात विविध सामाजिक उपक्रम राबवून त्यांचा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला. खरेदी विक्री संघ तिवसा, कृषी उत्पन्न बाजार समिती, तालुका काँग्रेस कमिटी, युवक काँग्रेस, महिला काँग्रेस आणि एनएसयूआय (NSUI) च्या वतीने संयुक्तपणे या सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.या मोहिमेअंतर्गत तिवसा येथील ग्रामीण रुग्णालय आणि गुरुदेव आयुर्वेदिक रुग्णालयातील रुग्णांना फळ वाटप करण्यात आले. तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पावन भूमीत असलेल्या अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळाच्या वृद्धाश्रमात वृद्ध माता-पित्यांना फळ आणि टॉवेलचे वाटप करण्यात आले. सध्या उन्हाळ्याचे दिवस असून नागरिकांना तीव्र उष्णतेचा सामना करावा लागत आहे. हीच बाब लक्षात घेऊन वृद्धांना उष्णतेपासून दिलासा मिळावा यासाठी या



वृद्धाश्रमाला कुलर भेट देण्यात आला. याप्रसंगी काँग्रेस पक्षाचे सर्व प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते आणि विविध विभागांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी सर्व ज्येष्ठ श्रेष्ठ सहकार क्षेत्रातील व स्थानिक स्वराज्य संस्थेतील आजी-माजी पदाधिकारी ख.वि. अध्यक्ष सुरेश मेटकर, सभापती बाजार समिती रवि राऊत,नगराध्यक्ष प्रतिभा गौरखेडे, पणन महासंघ संचालिका,सुनिता अळसपुरे तालुका अध्यक्ष वैभव वानखडे,नगरसेवक योगेश वानखडे प्रफुल देशमुख, सेतुदादा देशमुख,सभापती कल्पना दिवे, अर्चना भोंबे, जयश्री वानखडे, पुनम काळमेघ, वैशाली सांभारे, किसनजी मुंदाने, सतीश पारधी, रितेश पांडव लुकेश केने,प्रमोद वानखडे राजू बोडखे, सतीश पोजगे, संदीप आमले, प्रणव गौरखेडे,गजानन भोंबे, सुनील बाखडे, अमर वानखडे, अतुल गवड, प्रविण बायस्कर, राजू थोरात, सुनील सांभारे, अक्षय पवार, संजय चौधरी,वैभव काकडे, यश करडे, सचिन सोटे, किशोर दिवे, सुनील उतखेडे, दिलीप वानखडे, विश्वजीत बाखडे,गौरव चौधरी, आकाश मकेश्वर,अमोल पन्नासे,मंगेश राऊत, स्वप्नील केने, गुड्डू बायस्कर,मनोज साबळे,अनंत शेंद्रे,सूरज धुमनखेडे, प्रशांत प्रधान, जसबीर ठाकुर, रूपेश धुमनखेडे, राज बावणे,प्रज्वल गुल्हाने, देविदास गायकवाड आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

---

# चौथा स्तंभ' मजबूत करण्यासाठी अ.भा.ग्रा.पत्रकार संघाची आमदारांना साद

## पत्रकार आणि वृत्तपत्र विक्रेत्यांच्या प्रलंबित मागण्यांचे निवेदन

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**
पत्रकार आणि वृत्तपत्र विक्रेत्यांच्या प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाने रविवारी अमरावतीत जोरदार पुढाकार घेतला. संघाच्या शिष्टमंडळाने धामणगाव विधानसभा मतदारसंघाचे आ.प्रताप अडसड यांची भेट घेत प्रिंट मीडिया, इलेक्ट्रॉनिक मिडिया चे पत्रकार व संबंधित कर्मचारी तसेच वृत्तपत्र विक्रेत्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांचे निवेदन सादर केले. या भेटीत आ. प्रताप अडसड यांनी पत्रकार आणि वृत्तपत्र विक्रेत्यांच्या न्याय्य मागण्या प्राधान्याने सोडवण्यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. लोकशाहीचा



चौथा स्तंभ मजबूत राहण्यासाठी पत्रकारांच्या सुरक्षिततेसह त्यांच्या कल्याणासाठी ठोस उपाययोजना होणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

अ.भा.ग्रा. पत्रकार संघटनेने सादर केलेल्या निवेदनात पत्रकार आणि वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी स्वतंत्र पत्रकार महामंडळ व वृत्तपत्र विक्रेता महामंडळ स्थापन करण्याची प्रमुख मागणी करण्यात आली. तसेच जिल्हा आणि तालुका स्तरावर पत्रकार भवन उभारण्याची मागणीही करण्यात आली.

प्रिंट व इलेक्ट्रॉनिक मिडिया क्षेत्रात काम करतांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो, त्यामुळे या क्षेत्रातील सर्व घटकांना संस्थात्मक आधार मिळावा, अशी संघाची भूमिका आहे. १९९६ पासून जनसामान्यांच्या सेवेसोबत पत्रकारांच्या हितासाठी कार्यरत असलेल्या संघटनेच्या शिष्टमंडळात राष्ट्रीय अध्यक्ष मनोहर सुने, राष्ट्रीय कार्याध्यक्ष युसूफ खान, राष्ट्रीय नियोजन समिती अध्यक्ष सुरेश सवळे, राष्ट्रीय संघटक तथा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष कैलासबापू देशमुख, राष्ट्रीय सरचिटणीस राजेंद्र भुरे, राष्ट्रीय चिटणीस अशोक पवार, राष्ट्रीय उपाध्यक्ष प्रदीप जोशी, रविंद्र मोंढे, महिला मंच प्रदेशाध्यक्ष कांचन मुरके, राष्ट्रीय प्रसिद्धी प्रमुख सागर सवळे, प्रदेश सरचिटणीस राजेंद्र ठाकरे, जिल्हाध्यक्ष सुधाकर टिपरे, संतोष वाघमारे, तसेच तालुका सचिव राजीव शिवणकर यांसह अनेक पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. या भेटीनंतर पत्रकार व वृत्तपत्र विक्रेत्यांच्या प्रश्नांना नवे बळ मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

---

## बेबी सोनोने यांची घरकुलाची मागणी



**शिराळा**-येथील वार्ड नंबर ६ बाजार चौक रहिवासी श्रीमती बेबी सुधाकर सोनोने यांना गेल्या दहा वर्षांपासून राहायला घर नाही . कुळाकाठीच्या घरात राहत आहेत. पावसाळ्यात दरवर्षी पावसाचे पाणी घरात शिरते त्यामुळे नुकसान होते. पण एकही वर्षी शासनाने त्यांची दखल घेतली नाही. तसेच श्रीमती बेबी सुधाकर सोनोने यांचा मुलगा संदिप सुधाकर सोनोने हा वेगळा राहतो त्याला पण आजपर्यंत घरकुल मिळाले नाही. संदिप सुधाकर सोनोने यांचे कुळकाठीचे घर आहे दरवर्षी पावसाळ्यात पाणी शिरते परंतु आज पर्यंत शासनाने दखल घेतली नाही. ते भोई समाजाचे आहेत. बाकी त्यांच्या समाजात घरकुल आले पण यांना घरकुल मिळाले नाही. खरोखर त्यांना घरकुलाची गरज आहे पण आजपर्यंत घरकुल मिळाले नाही. श्रीमती बेबी सुधाकर सोनोने व संदीप सुधाकर सोनोने यांनी घरकुल पावसाळ्या अगोदर देण्याची मागणी केली आहे.तरी शासनाने अमरावती जिल्हाधिकारी, अमरावती तहशिलदार यांनी दखल घेवुन घरकुल देण्याची मागणी केली आहे.

---

# सोयाबीनला विक्रमी दर; पण शेतकऱ्यांकडे मालच नाही

## हमीभाव असूनही नाफेड खरेदीतील विलंबाचा शेतकऱ्यांना फटका

**अंजनगाव बारी/वार्ताहर**
अमरावती बाजार समितीत सोयाबीनला प्रतिक्विंटल तब्बल ७,१४५ रुपयांचा दर मिळाल्याने गेल्या पाच वर्षांतील हा उच्चांकी दर मानला जात आहे. मात्र या दरवाढीचा प्रत्यक्ष लाभ शेतकऱ्यांना मिळत नसून साठेबाज व्यापारी आणि सावकारच फायदा लाटत असल्याची भावना शेतकरी वर्गातून व्यक्त केली जात आहे. बाजारातील हालचाली, सोयाबीन तेलाची वाढती मागणी आणि देशांतर्गत बाजारात घसरलेली आवक यामुळे सोयाबीनच्या दरात तेजी निर्माण झाली आहे. सध्या अमरावती बाजार समितीत दररोज सुमारे ८० ते १०० क्विंटल आवक नोंदवली जात आहे. परंतु, अनेक शेतकऱ्यांनी हंगामाच्या सुरुवातीलाच कमी भावामुळे सोयाबीन विकून टाकल्याने आता दर वाढूनही त्यांच्या कोठारात मालच उरलेला नाही. केंद्र शासनाने यंदा सोयाबीनसाठी ५,३२८ रुपयांचा हमीभाव जाहीर केला होता. पण हंगामाच्या सुरुवातीला बाजारभाव ४,१०० रुपयांपर्यंत खाली



घसरला. नाफेड खरेदीतील विलंब, नोंदणीतील अडचणी, मर्यादित खरेदी केंद्रे आणि सुरूवातीपासूनच प्रक्रिया मंद असल्याने शेतकऱ्यांना तोट्यातच विक्री करावी लागली.दरम्यान, कापूस बाजारातही तेजी असून अमरावती बाजार समितीत कापसाला प्रतिक्विंटल ८,४०० ते ९,८५५ पर्यंत दर मिळत आहेत. जागतिक मागणी, डॉलरच्या तुलनेत रुपयाची घसरण आणि पश्चिम आशियातील तणावाचा परिणाम कापूस बाजारावर होत असल्याचे जाणकारांचे मत आहे. स्थानिक व्यापाऱ्यांच्या माहितीनुसार, सध्या बाजारात सोयाबीनचा दर ७,३०० रुपये प्रतिक्विंटलपर्यंत गेला आहे. दोन महिन्यांपूर्वी सोयाबीन केवळ ४,२००–४,३०० रुपये होते, त्यावेळी बहुतेक शेतकऱ्यांनी विक्री पूर्ण केली. त्यामुळे आज दर वाढूनही शेतकऱ्यांकडे मालच उरलेला नाही,' असे सांगण्यात आले.शेतकरी वर्गात याबाबत नाराजी व्यक्त होत असून मिळेल त्या भावात आम्ही सोयाबीन विक्रीला काढले. त्यामुळे हमीभाव कागदोपत्रीच राहिला. त्यातच नाफेड खरेदीलादेखील विलंब झाला. अखेरीस कुठलाच फायदा आम्हाला झाला नाही. पुढील आर्थिक अडचणी टाळण्यासाठीच माल विक्री करण्यात आली,' अशी खंत शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे'.

---

## प्रभुजी इसळ यांचे निधन



**कुऱ्हा**-वऱ्हा येथील जेष्ठ नागरिक तथा सेवानिवृत्त शिक्षक प्रभुजी आत्मारामजी इसळ यांचे वयाच्या ६४ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले.त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी भाऊ, असा बराच मान आप्त परिवार आहे. स्व.प्रभुजी इसळ यांच्या अंत्यविधी करिता सर्वच स्तरावरील नातेवाईक व गावकरी उपस्थित होते. यावेळी सामूहीक श्रध्दांजली देण्यात आली.

---

# देशातील ४३ टक्के श्रमशक्तीला शेतीचा आधार

## 'स्टेट बँक ऑफ इंडिया'च्या अहवालातून ग्रामीण रोजगाराचे चित्र समोर

**नवी दिल्ली** - देशातील रोजगार रचनेत आमूलाग्र बदल होत असले तरी शेती मात्र अजूनही भारतातील सर्वांत मोठे रोजगार देणारे क्षेत्र असल्याचे चित्र समोर आले आहे. 'स्टेट बँक ऑफ इंडिया'च्या 'पीएलएफएस २०२५'च्या (नैमित्तिक श्रमशक्ती अहवाल) आकडेवारीवर आधारित अहवालानुसार, २०२५ मध्ये देशातील ४३ टक्के कामगार शेती क्षेत्रात कार्यरत आहेत.

१९८७-८८ मध्ये हे प्रमाण ६६ टक्के होते. म्हणजे गेल्या ३७ वर्षांत शेतीवरील रोजगार अवलंबित्वात तुलनेने मंद गतीने घट झाली आहे. या अहवालानुसार ग्रामीण भागात रोजगारासाठी शेतीवरील अवलंबित्व अद्याप मोठ्या प्रमाणावर कायम आहे. विशेषतः महिला कामगारांचा सहभाग ग्रामीण भागात अधिक असल्यामुळे शेतीतील रोजगाराचे प्रमाण वेगाने कमी झालेले नाही.

ग्रामीण महिलांचा श्रमशक्ती सहभाग दर (लेबर फोर्स पार्टिसिपेशन रेट एलएफपीआर) ४५.९ टक्के आहे. शहरी भागातील रोजगारावर असणाऱ्या महिलांचे हेच प्रमाण २७.७ टक्के आहे.

**अनौपचारिक रोजगारांत शेतीचा वाटा सर्वाधिक**

अहवालात नमूद करण्यात आले आहे, की देशातील अनौपचारिक कामगारांपैकी तब्बल ४२ टक्के कामगार शेती क्षेत्रात कार्यरत आहेत. यामुळे शेती अजूनही सामाजिक सुरक्षा, लिखित करारांप्रतीची कटिबद्धता आणि रोजगार संरक्षणापासून मोठ्या प्रमाणावर दूर असल्याचे स्पष्ट होते. या अहवालात मांडण्यात आलेल्या विश्लेषणानुसार, पंजाब, उत्तर प्रदेश, बिहार, राजस्थान आणि मध्य प्रदेशसारख्या राज्यांमध्ये अनौपचारिक रोजगारांचे प्रमाण अधिक आहे. यामागे शेती व मजुरीवर आधारित रोजगार रचना हे एक प्रमुख कारण असल्याचे निरीक्षण भोंदवण्यात आले आहे.

**किमान वेतनाच्या अंमलबजावणीत त्रुटी**

शेती आणि अस्थायी मजुरी क्षेत्रात किमान वेतन कायद्याची अंमलबजावणी अनेक राज्यांत प्रभावीपणे होत नसल्याचेही अहवालातून स्पष्ट झाले आहे. छत्तीसगडमध्ये सुमारे ७० टक्के, ओडिशात ६६ टक्के आणि झारखंडमध्ये ६५ टक्के अस्थायी कामगारांना किमान वेतनापेक्षा कमी मजुरी मिळत असल्याचे आढळले. महाराष्ट्रातही जवळपास एकतृतीयांश कामगारांना किमान वेतनापेक्षा कमी मजुरी मिळते.



**ग्रामीण महिलांसाठी शिक्षण महत्त्वाचे**

या अहवालानुसार, शिक्षणामुळे महिलांचे अस्थायी मजुरीवरील अवलंबित्व कमी होत आहे. उच्च माध्यमिक आणि त्यापुढील शिक्षण घेतलेल्या महिलांमध्ये नियमित वेतनाधारित रोजगाराचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून आले.

**रोजगाराला चालना**

कौशल्य प्रशिक्षण घेतलेल्या व्यक्तींमध्ये अनौपचारिक रोजगारात जाण्याची शक्यता ४.८ टक्क्यांनी कमी झाल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. विशेषतः सरकारी प्रशिक्षण योजनांमुळे महिलांच्या स्वयंरोजगार संधींमध्ये वाढ होत असल्याचे निरीक्षण नोंदवण्यात आले आहे.

**अहवालातील ठळक बाबी**

| मुद्दा- | निष्कर्ष |
| --- | --- |
| शेतीतील रोजगार- | ४३ टक्के |
| ग्रामीण महिलांचा- श्रमशक्तीतील सहभाग | ४५.९ टक्कें |
| अनौपचारिक - रोजगारांतील शेतीचा वाटा | ४२ टक्के |
| किमान वेतनातील उल्लंघनाचे प्रमाण | -छत्तीसगड ७० टक्के, |
| ओडिशा- | ६६ टक्के |
| महाराष्ट्रातील किमान वेतनातील उल्लंघनाचे प्रमाण | -३३ टक्के |

# ‘गाजीपूर फाईल्स’मध्ये नेमकं दडलंय काय?

## अभयारण्याच्या उंबरठ्यावर खदान; कोट्यवधींचा दंड असूनही प्रशासनाची संशयास्पद नरमाई

### संतोष चांडक प्रकरणाने महसूल, वन आणि प्रदूषण यंत्रणांची विश्वासार्हता संशयाच्या भोवऱ्यात; लोकप्रतिनिधींच्या मौनानेही वाढले प्रश्न

**ॲड. समीर ठाकूर**

**अकोला :** अकोट तालुक्यातील गाजीपूर येथील खदान, स्टोन क्रशर आणि डांबर हॉट मिक्स प्लांट प्रकरण आता केवळ स्थानिक पातळीवर मर्यादित राहिले नसून राज्यभर चर्चेचा विषय बनू लागले आहे. कारण या प्रकरणात एकीकडे कोट्यवधी रुपयांचा दंड आकारला जातो, वन विभागाकडून गंभीर हरकती नोंदवल्या जातात, विधानसभेत प्रश्न उपस्थित होतात, तर दुसरीकडे संबंधित उद्योग मात्र कोणत्याही दडपणाशिवाय सुरू राहत असल्याचे चित्र समोर येत आहे. त्यामुळे ‘नेमकं संरक्षण कुणाचं आणि कोणाकडून?’ हा प्रश्न आता जनतेतून उघडपणे विचारला जाऊ लागला आहे.

पोपटखेड ग्रामपंचायत अंतर्गत मौजे गाजीपूर येथील गट क्रमांक २७ आणि ३८ या आदिवासी जमिनींवर उद्योगपती संतोष चांडक यांनी ‘मे. साई स्टोन क्रशर’च्या नावाने उद्योग सुरू केल्याची माहिती आहे. विशेष म्हणजे, आदिवासी जमिनींच्या भाडेपट्टा व्यवहारासाठी शासनाची पूर्वपरवानगी बंधनकारक असताना ती घेण्यात आली होती का, याबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. या व्यवहारांबाबत विधानसभेत तसेच विधान परिषदेतही आवाज उठविण्यात आला होता. मात्र इतक्या गंभीर आक्षेपांनंतरही महसूल प्रशासनाने कठोर भूमिका घेतल्याचे चित्र दिसून आले नाही.

या प्रकरणातील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे अवैध उत्खनन प्रकरणात संबंधित उद्योगांवर तब्बल ४८ कोटी रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. सुरुवातीच्या ETS मोजणीत हा दंड तब्बल ६४ कोटी रुपये असल्याचे सांगितले जात होते. मात्र नंतर ही रक्कम कमी होऊन ४८ कोटींवर कशी आली, याबाबत महसूल विभागाकडून कोणताही स्पष्ट खुलासा करण्यात आलेला नाही. एवढ्या मोठ्या आर्थिक तफावतीमागे नेमके कोणते दबाव किंवा सवलती कामाला आल्या, याची चौकशी व्हावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने संबंधित प्राधिकरणाकडे दाद मागण्याचे निर्देश दिल्यानंतरही प्रत्यक्ष कारवाईला अपेक्षित वेग मिळालेला दिसत नाही. उलट दंडातील तफावत, फाईलस्तरीय हालचाली आणि प्रशासकीय विलंबामुळे या प्रकरणात यंत्रणा हेतुपुरस्सर वेळकाढूपणा करत असल्याचा आरोप होत आहे. आदिवासी जमिनींच्या व्यवहारात शासन परवानगी अनिवार्य असतानाही संबंधित जमीन ताब्यात घेणे किंवा व्यवहार रद्द करण्यासंदर्भातील कठोर पावले उचलली गेली नसल्याने महसूल प्रशासनाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

गाजीपूर प्रकरणात स्थानिक राजकीय मौनही तितकेच चर्चेचा विषय ठरत आहे. विविध विषयांवर आक्रमक भूमिका घेणारे लोकप्रतिनिधी, विरोधक आणि पर्यावरणवादी संघटना या प्रकरणात मात्र असामान्य शांत दिसत असल्याने संशय अधिक गडद होत आहे. ‘कोट्यवधींचा दंड, वन विभागाचे आक्षेप, न्यायालयीन निर्देश आणि तरीही उद्योग सुरूच’ हे समीकरण जनतेला अस्वस्थ करणारे ठरत आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र आणि उच्चस्तरीय चौकशी करून जबाबदार अधिकारी, संबंधित उद्योगसमूह आणि परवानगी प्रक्रियेत सहभागी यंत्रणांची भूमिका तपासावी, अशी मागणी आता अधिक तीव्र होत आहे.

#### तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी सील केलेला उद्योग पुन्हा सुरू झाला कसा?

अकोल्याच्या तत्कालीन जिल्हाधिकारी निमा अरोरा यांनी २४ ऑक्टोबर २०२१ रोजी मध्यरात्री थेट धडक कारवाई करत संबंधित उद्योगावर बंदीचे आदेश दिले होते. दंडाची रक्कम प्रलंबित असणे आणि रात्रीच्या वेळी उद्योग सुरू असल्याचे निरीक्षण नोंदवत हा उद्योग सील करण्यात आल्याची माहिती त्या काळात समोर आली होती.

मात्र त्यानंतर हा उद्योग नेमक्या कोणाच्या आदेशाने पुन्हा सुरू करण्यात आला, याबाबत महसूल प्रशासनाने अद्याप कोणताही खुलासा केलेला नाही. एवढी मोठी कारवाई झाल्यानंतरही उद्योग पुन्हा सुरू होणे ही बाबच अनेक शंकांना जन्म देणारी ठरत आहे. त्यामुळे त्या काळातील आदेश, नोंदी, परवानग्या आणि त्यानंतरची प्रशासकीय प्रक्रिया सार्वजनिक करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

#### धुळीत नियम, धुरात प्रदूषण नियंत्रण मंडळ ?

गाजीपूर परिसरातील नागरिकांच्या मते, स्टोन क्रशरमधून उडणारी धूळ, डांबर हॉट मिक्स प्लांटमधून होणारे वायू प्रदूषण आणि सततचा कर्णकर्कश आवाज यामुळे स्थानिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. श्वसनविकार, डोळ्यांची जळजळ आणि शेतीवरील परिणाम याबाबत नागरिकांकडून सातत्याने तक्रारी होत असल्याचे सांगितले जात आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निकषांचे पालन प्रत्यक्षात झाले का? आवश्यक प्रदूषण नियंत्रण यंत्रणा कार्यरत होत्या का? नियमित तपासण्या करण्यात आल्या का? या प्रश्नांची स्पष्ट उत्तरे मात्र अद्याप समोर आलेली नाहीत. परिणामी ‘प्रदूषण नियंत्रण मंडळाने डोळेझाक केली का?’ अशी चर्चा आता उघडपणे सुरू झाली आहे.

विशेष म्हणजे, याच गट क्रमांकाला लागून असलेल्या गट क्रमांक ३७ वर प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नाहरकत प्रमाणपत्राविना क्रशर सुरू असल्याची माहिती समोर आली आहे. या संदर्भात वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर संबंधित उद्योगाला नाहरकत प्रमाणपत्र मिळवून देण्यासाठी काही अधिकारी स्वतः पुढाकार घेत असल्याच्या चर्चांनाही उधाण आले आहे. त्यामुळे ‘अधिकारी वर्ग नेमका शासनासाठी काम करतोय की उद्योगांसाठी?’ हा सवाल आता सामान्य नागरिकांमधून विचारला जात आहे.

#### ‘शून्य अंतरावर’ उद्योग? वन विभागाच्या नोंदींनी वाढवली धास्ती

नरनाळा अभयारण्यालगत सुरू असलेल्या या उद्योगांबाबत वन विभागाच्या अहवालाने अनेक गंभीर प्रश्न निर्माण केले आहेत. संबंधित खदान उद्योग अभयारण्याच्या सीमेलगत असल्याचे नमूद करण्यात आले असून काही अहवालांमध्ये हे अंतर ‘शून्य मीटर’ असल्याची नोंद असल्याचे समोर आले आहे.

वन विभागाने महसूल प्रशासनाला उत्खनन परवाने देऊ नये, असे स्पष्ट पत्र दिल्याची माहिती समोर आली आहे. मात्र त्या पत्रानंतरही उद्योग सुरूच राहिल्याने प्रशासनातील समन्वय आणि प्रामाणिकतेवरच प्रश्न निर्माण झाले आहेत. वन्यजीव संवर्धनासाठी संवेदनशील समजल्या जाणाऱ्या पट्ट्यात मोठ्या प्रमाणावर उत्खनन आणि प्रदूषणकारी उद्योग सुरू राहणे ही अत्यंत गंभीर बाब मानली जात आहे. वन्यप्राणी स्थलांतरित होत असल्याच्या तक्रारीही समोर येत असून वन्यजीव संरक्षण धोरणालाच हरताळ फासला जात असल्याचा आरोप पर्यावरणप्रेमींनी केला आहे. मात्र संबंधित यंत्रणांची शांत भूमिका संशय अधिक गडद करणारी ठरत आहे.

वरुड तालुक्यात हृदयद्रावक दुर्घटना

# पुसली धरणात तीन भावंडांचा बुडून मृत्यू




### सातनूर परिसर शोकमग्न

**वरुड/प्रतिनिधीः-** उन्हाळ्याच्या सुट्टीत आई-वडिलांकडे आलेल्या तीन निष्पाप चिमुकल्यांचा पुसली धरणात बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदय पिळवटून टाकणारी घटना वरुड तालुक्यातील सातनूर गावाजवळ रविवारी (दि. १८) उघडकीस आली. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत असून उईके कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संतुलाल उईके हे सातनूर शिवारातील मनोहर निमकर यांच्या शेतात रखवालदार म्हणून कुटुंबासह वास्तव्यास होते. त्यांची तीन मुले -पंकज संतुलाल उईके (वय १०), प्रिया संतुलाल उईके (वय ८) आणि पवन संतुलाल उईके (वय ७) ही नरखेड येथील आश्रम शाळेत शिक्षण घेत होती. उन्हाळ्याच्या☞(पान २ वर)

# १८ जून रोजी स्थानिक प्राधिकारी मतदारसंघासाठी मतदान

## जिल्ह्यात आचारसंहिता लागू

**अमरावती/प्रतिनिधीः-** भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधान परिषदेच्या १६ स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांतील द्विवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. यात अमरावतीचा समावेश असल्याने मतदारसंघांमध्ये आदर्श आचारसंहिता तातडीने लागू करण्यात आली आहे.



अमरावती जिल्ह्यामध्ये स्थानिक प्राधिकारी मतदारसंघात ही निवडणूक प्रक्रिया पार पडणार आहे. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी आदर्श आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करण्याचे आवाहन केले आहे.☞(पान २ वर)

# मेळघाट विकासासाठी प्रशासनातील समन्वय वाढवा




### -मंत्री डॉ. अशोक उईके

**अमरावती/प्रतिनिधीः-** चिखलदरा आणि धारणी हे आदिवासी बहूल तालुके दत्तक घेतलेले आहेत. त्यामुळे या भागाच्या विकासकामांना गती देऊन नागरिकांच्या मुलभूत समस्या दूर करण्यासाठी प्रकल्प कार्यालयाने सर्व विभागांशी समन्वय ठेवावा. यामुळेच त्यांचे प्रश्न सुटण्यास मदत होईल, असे मत आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांनी व्यक्त केले.

मंत्री डॉ. उईके यांच्या अध्यक्षतेखाली धारणी येथे आढावा बैठक पार पडली. बैठकीत कुपोषण, सिकलसेल, थॅलेसेमिया आणि क्षयरोग या गंभीर विषयांवर स्वतंत्रपणेचर्चा करण्यात आली. आदिवासी भागातील आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रांची आवश्यकता, वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे आणि उपचार सुविधांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.☞(पान २ वर)

# धन्वंतरी रुग्णालयावर सहकार पॅनल चा झेंडा



## -सर्वच जागा मिळवत एक हाती सत्ता

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती येथील सुप्रसिद्ध धन्वंतरी सहकारी रुग्णालयाच्या संचालक मंडळासाठी झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये एक हाती सत्ता मिळवत सहकार पॅनलच्या उमेदवारांनी दणदणीत विजय मिळवत सत्ता काबीज केली. धन्वंतरी सहकारी रुग्णालयाच्या सन २०२६-२०३१, संचालक मंडळाच्या निवडणुकीसाठी विविध मतदारसंघातून धन्वंतरी रुग्णालय सहकार पॅनलने उमेदवार विजयी करून एक☞(पान २ वर)

# तिन्ही आरोपी गुन्हे शाखेच्या ताब्यात

### खोलापुरी गेट हद्दीतील खुन प्रकरण

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील खोलापुरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीत झेंडा चौक, माळीपुरा परिसरात घडलेल्या खुनाच्या थरारक घटनेचा उलगडा अमरावती शहर गुन्हे शाखेने अवघ्या दोन तासांत केला आहे. या प्रकरणी तिघा आरोपींना वेगवेगळ्या ठिकाणांहून ताब्यात घेत गुन्ह्याचा छडा लावण्यात पोलिसांना यश आले.



१७ मे २०२६ रोजी रात्री नियंत्रण कक्षाला माळीपुरा परिसरात एका युवकाचा खून झाल्याची माहिती प्राप्त झाली होती. माहिती मिळताच गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वातील पथकाने तात्काळ घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला. मृत युवकाची ओळख तेजस श्रीकृष्ण बिलबिले (रा. माळीपुरा, अमरावती) अशी पटली. घटनास्थळी☞(पान २ वर)

# गाडगेनगर हल्ला प्रकरणातील चार आरोपींना जामीन

### अमरावती सत्र न्यायालयाचा आदेश; ॲड. हसीब मिर्झा यांच्या युक्तिवादाला यश

**अमरावती/प्रतिनिधीः-** गाडगेनगर पोलीस ठाणे हद्दीतील दोन तृतीयपंथीय गटांमध्ये झालेल्या तलवार-कोयत्याच्या हल्ला प्रकरणातील चार आरोपींना अमरावती सत्र न्यायालयाने नियमित जामीन मंजूर केला आहे. या प्रकरणात नागपूर उच्च न्यायालयातील विधिज्ञ ॲड. हसीब के. मिर्झा यांनी केलेल्या युक्तिवादानंतर न्यायालयाने हा निर्णय दिला.



अतिरिक्त सत्र न्यायाधीश अमित जी. जोशी यांनी अब्दुल सलीम अब्दुल सलाम, राशी उर्फ राज शाह रेहमान शाह, शिवानी उर्फ अमीन खान आणि शाबुस्ता उर्फ☞(पान २ वर)

# श्वास बंद झाल्याने फाजिला जाबिनचा मृत्यू

**प्रकरणाला आता नवीन वळण**

### पोस्टमार्टमचा प्राथमिक अहवाल आला समोर

**अमरावती/प्रतिनिधीः-** सौदागर पुरा परिसरातील १९ वर्षीय नवविवाहिता फाजीला जाबीनच्या संशयास्पद मृत्यू प्रकरणात नवीन वळण आले आहे. सुरुवातीला हार्ट अटॅकमुळे मृत्यू झाल्याचे सांगण्यात आले होते मात्र पोस्टमार्टमच्या प्राथमिक माहितीत मृत्यू श्वास बंद झाल्यामुळे झाल्याचे समोर आले आहे. यामुळे अनेक गंभीर प्रश्न समोर आले आहे.




माहिती नुसार सौदागर पुरा येथील फाजिलाचा निकाह नागपूर येथील जाबिन अहमद सोबत जानेवारी☞(पान २ वर)

# पीडीएमसी मध्ये परिचारिकांचे अचानक काम बंद

### वेतन आणि पुनर्नियुक्तीच्या मागणीसाठी आंदोलन



**अमरावती/प्रतिनिधीः-** स्थानिक डॉ.पंजाबराव देशमुख मेडिकल कॉलेज ॲण्ड हॉस्पिटलमध्ये कार्यरत परिचारिकांनी आज सोमवार १८ मे रोजी अचानक कामबंद आंदोलन सुरू केल्याने रुग्णालय प्रशासनात मोठी खळबळ उडाली आहे. कोणतीही पूर्व सूचना न देता करण्यात आलेल्या या आंदोलनामुळे रुग्णसेवा विस्कळीत☞(पान २ वर)

# कंत्रादारांची थकीत १४.६६ कोटी रक्कम मजीप्राच्या एसबीआय खात्यात जमा

### आ.संजय खोडके यांच्या प्रयत्नाने मजीप्रा कंत्राटदारांना मोठा दिलासा

**अमरावती/प्रतिनिधी: -** अमरावती अमरावती जिल्हा जीवन प्राधिकरण कंत्राटदार असोसिएशनच्या वतीने मागील वर्षभरापासून रखडलेल्या कामांच्या देयकांसाठी अखेर १४ कोटी ६६ लाखांची रक्कम महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अमरावतीच्या एसबीआय बँक खात्यात जमा करण्यात आली आहे. या बाबत महाराष्ट्र विधान परिषद आमदार संजय खोडके यांच्या प्रयत्नांना यश मिळाले असल्याने मजीप्रा कंत्राटदारांना मोठा दिलासा मिळाला आहे.



अमरावती जिल्हा जीवन प्राधिकरण कंत्राटदार असोसिएशनच्या वतीने मागील वर्ष २०२५-२०२६ च्या १५.३१ कोटींची देयके मागील वर्षभरापासून☞(पान २ वर)

# दारुड्या पतीने पत्नीला धक्का देत केले जखमी

अमरावती/प्रतिनिधीः- वलगांव पोलीस ठाणे हद्दीत येणाऱ्या खारतळेगाव मध्ये कौटूंबिक वादात दारुड्या पतीने पत्नीला धक्का देऊन जखमी केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणात पोलिसांनी पत्नीच्या तक्रारी वरून आरोपी पती पुंडलिक बाळू जुमळे (वय ३२) विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. माहितीनुसार शनिवारी दुपारी आरोपी पुंडलिक जुमळे दारू पिऊन रस्त्यावर शिवीगाळ करत होता. यावेळी पत्नी त्याला समजवण्यासाठी गेली असता उलट आरोपीने तिलाच धक्का दिला. यामुळे ती रस्त्यावर पडली. यामुळे तिच्या डोक्याला मार लागला आणि रक्त वाहू लागले. पिडितेने आरडाओरड केल्यामुळे आरोपी तेथून पळाला. तिची आई सुशीला तिथे पोहचली आणि तिला जखमी अवस्थेत प्राथमिक उपचारासाठी आरोग्य केंद्रात घेऊन गेली. तिथे तिच्यावर प्राथमिक उपचार करण्यात आले. यानंतर तिने पोलीस ठाण्यात जाऊन आरोपी पती विरुद्ध तक्रार दिली. पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.